सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २८६ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि आपल्या चुका दुरुस्त करताना कार्यकर्त्याने नटाची भूमिका ठेवली पाहिजे. नाटक सुरू असताना नट आपल्या भूमिकेशी समरस झालेला असतो. प्रेक्षकांमधून कोणी चूक दाखवली तर प्रतिवाद न करता सुधारणा करतो. तसेच आपल्या कार्यकर्त्याने भूमिकेशी समरस होऊन कार्य करीत राहिले पाहिजे. समाजातील लोक आपल्याकडे बारकाईने पाहत आहेत याची जाणीव ठेवली पाहिजे व आपली चूक कोणी दाखवून दिली तर प्रतिवाद न करता, स्वत:मध्ये सुधारणा केली पाहिजे.

**- श्रीकृष्ण मोतलग**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. प्रचारक प्रमुख

# १५ जानेवारीला 'महा'मतदान

**मनपा निवडणूक रणधुमाळी**

## ● २९ महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले ● १६ तारखेला लागणार निकाल
## ● सोलापुरात ९ लाख २४ हजार ७०६ मतदारांचा समावेश, इच्छुक लागले कामाला

◆ **मुंबई, १५ डिसेंबर**
मुंबई, पुणे आणि सोलापूरसह राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत याबाबतची अधिकृत घोषणा केली. १५ जानेवारीला मतदान होणार असून १६ रोजी मतमोजणी होणार आहे. तसेच सोमवारपासूनच आचारसंहिता लागू झाली आहे.

राज्यातील २९ पैकी २७ महापालिकेची मुदत संपलेली होती. यातील ५ महापालिकेची मुदत २०२० मध्येच तर मुंबईसह १८ महापालिकांची २०२२ मध्ये मुदत संपलेली होती. तसेच ४ महापालिकांची मुदत २०२३ मध्ये संपलेली होती. त्यामुळे या सर्व निवडणुकांसोबतच जालना आणि इचलकरंजी या दोन नवीन महापालिकांच्या निवडणुका होणार आहेत. या महापालिका निवडणुकांसाठी १ जुलै २०२५ रोजीची मतदान यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. ही यादी केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आली असल्याने त्यामध्ये नावे वगळण्याचे अधिकार राज्य आयोगाला नाहीत, असे आयुक्त वाघमारे यांनी यावेळी स्पष्ट केले. तर, चुकून या वार्डातलं नाव त्या वार्डात गेलं असल्यास त्यात दुरुस्ती करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाला असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज फक्त ऑफलाईन पद्धतीने करता येणार आहेत. तसेच ज्या उमेदवारांकडे सध्या जात वैधता प्रमाणपत्र नाही, त्यांना निवडणुकीपासून सहा महिन्यांच्या आत सादर करता येणार असल्याचेही आयुक्त वाघमारे यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)



### मतदान केंद्र, ईव्हीएम

महानगरपालिका निवडणुकांसाठी एकूण ३ कोटी ४८ लाख ७८ हजार १७ मतदार असून त्यासाठी सुमारे ३९ हजार १४७ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ४३ हजार ९५८ कंट्रोल युनिट आणि ८७ हजार ९१६ बॅलेट युनिटची उपलब्धता केली आहे.

### असा आहे निवडणूक कार्यक्रम

- अर्ज दाखल करण्याची मुदत- २३ ते ३० डिसेंबर २०२५
- अर्जांची छाननी- ३१ डिसेंबर २०२५
- अर्ज मागे घेण्याची मुदत- २ जानेवारी २०२६
- चिन्ह वाटप/उमेदवारी अंतिम यादी- ३ जानेवारी २०२६
- मतदानाची तारीख- १५ जानेवारी २०२६
- मतमोजणी- १६ जानेवारी २०२६

### निवडणुका होणाऱ्या महानगरपालिका

नागपूर, अकोला, अमरावती, चंद्रपूर, बृहन्मुंबई, भिवंडी निजामपूर, छत्रपती संभाजीनगर, धुळे, इचलकरंजी, जळगाव, जालना, कल्याण-डोंबिवली, कोल्हापूर, लातूर, मालेगाव, मीरा भाईंदर, अहिल्यानगर, नांदेड वाघाळा, नवी मुंबई, नाशिक, पनवेल, परभणी, पिंपरी चिंचवड , पुणे, सांगली मिरज कुपवाड , सोलापूर, ठाणे, उल्हासनगर, वसई विरार

एकूण मतदार
**३.४८ कोटी**

एकूण मतदार केंद्र
**३९ हजार १४७**

### आरक्षण

| | |
|---|---|
| **एकूण जागा** | **२ हजार ८६९** |
| महिला- | १ हजार ४४२ |
| अनु. जाती- | ३४१ |
| अनु. जमाती- | ७७ |
| नामा प्रवर्ग- | ७६९ |

### खर्चाची मर्यादा

| | | |
|---|---|---|
| अ वर्ग | - | १५ लाख |
| ब वर्ग | - | १३ लाख |
| क वर्ग | - | ११ लाख |
| ड वर्ग | - | ९ लाख |

### ज्येष्ठ नागरिक, दिव्यांगासाठी...

मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, तान्ह्याबाळासह असणाऱ्या स्त्रिया, गरोदर स्त्रिया आदींना मतदानासाठी प्राधान्य दिले जाईल. दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी मतदान केंद्रावर कायमस्वरुपी रॅम्पची व्यवस्था नसल्यास तात्पूर्ती सुविधा उभारली जाईल. व्हिलचेअरचीही व्यवस्था असेल. मतदान केंद्रावर विजेची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची, सावलीची सुविधा, शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल. सर्व म तदान केंद्रांमध्ये किमान सुविधा असणे आवश्यकच असेल; परंतु याशिवाय शक्य असेल तिथे आदर्श मतदान केंद्र उभारण्याचा प्रयत्न असेल. महिला मतदारांची संख्या जास्त असलेल्या ठिकाणी सर्व निवडणूक अधिकारी-कर्मचारी व पोलिस कर्मचारी महिला असतील, असे मतदान केंद्र 'पिंक मतदान केंद्र' म्हणून ओळखले जाईल. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल दूरध्वनी नेण्यास बंदी असेल.

## महत्त्वाचे

### बाजारात क्षुल्लक घसरण

**मुंबई** : मागील काही सत्रांच्या तुलनेत सोमवारी भारतीय शेअर बाजार क्षुल्लक घसरणीसह बंद झाला. सकाळच्या सत्रातील ४०० अंकांची घसरण भरून काढत निर्देशांकात अवघ्या ५४ अंकांची घट नोंदविण्यात आली. निर्देशांक ८५,२१३ वर स्थिरावला तर निफ्टी २० अंकांनी खाली आला. तो २६,०२७ वर बंद झाला. मागील तीन दिवसांपासून परदेशी गुंतवणूकदार बाजारातील पैसा काढून घेत आहेत. सोबतच अमेरिकेसोबतच्या व्यापार कराराचा मुद्दा अद्याप अंतिम टप्प्यात न पोहोचल्याने गुंतवणूकदार चिंतेत आहेत. त्यामुळे बाजाराची भावना कमकुवत राहिली. म्हणून मोठी वाढ होऊ शकली नाही. ऑटो क्षेत्रातील शेअर्सना सर्वाधिक तोटा सहन करावा लागला. तरीही तज्ज्ञांच्या मते, बाजार बऱ्यापैकी सावरलेल्या स्थितीत होता.

### राम मंदिर आंदोलनाचे अध्वर्यू डॉ. रामविलास वेदांती कालवश

**रीवा** : अयोध्या राम मंदिर चळवळीत प्रमुख सहभाग असलेले भाजपाचे माजी खासदार डॉ. रामविलास वेदांती यांचे निधन झाले आहे. मध्यप्रदेशातील रीवा येथील संजय गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये अनेक दिवसांपासून आजारी होते. त्यांनी सोमवारी दुपारी अखेरचा श्वास घेतला. त्यांचे पार्थिव अयोध्येत आणले जात आहे आणि मंगळवारी शरयू नदीत विसर्जित केले जाईल. ६७ वर्षीय रामविलास गेल्या दोन दिवसांपासून रामकथेसाठी मध्यप्रदेशातील रीवा येथे



वास्तव्यास होते. रविवारी त्यांना लघवी करण्यास त्रास होत होता. या घटनेनंतर त्यांना संजय गांधी मेमोरियल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्या आजाराची माहिती मिळताच मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी त्यांना भोपाळला विमानाने नेण्याची व्यवस्था केली. तथापि, दृश्यमानता कमी असल्याने विमान भोपाळमध्ये उतरू शकले नाही. परिणामी, त्यांना पुन्हा एअरलिफ्ट करून रीव्याला आणावे लागले. दरम्यान, मध्यरात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचे निधन झाले.

### आता 'व्हीबी जी राम जी' योजना

**नवी दिल्ली** : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) रद्द करत त्याबदल्यात ग्रामीण रोजगारासाठी 'विकसित भारत रोजगार आणि आजीजिका हमी मिशन (ग्रामीण) विधेयक- २०२५' असे नवे विधेयक लवकरच सरकारतर्फे संसदेत सादर करण्यात येणार आहे. या विधेयकाच्या प्रती आज लोकसभा सदस्यांना वितरित करण्यात आल्या. नवीन विधेयकाचे नाव विकसित भारत गॅरंटी फॉर रोजगार ॲण्ड आजीविका मिशन व्ही बी जी राम जी असे राहणार आहे. हे विधेयक म्हणजे मनरेगाची सुधारित आवृत्ती राहणार आहे. या योजनेतून १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. मनरेगात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी होती.

# ...तर भारतीय जनता पार्टीची 'एकला चलो'ची भूमिका

- ✓ पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे स्पष्ट प्रतिपादन
- ✓ 'महायुती'बाबत स्थानिक नेतृत्वाशी चर्चा करुनच निर्णय
- ✓ 'भाजपा'ला बाहेरच्या नेतृत्वाची आवश्यकता नाही

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**
सोलापूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने 'महायुती' करणे वा न करणे याबाबत स्थानिक नेतृत्वाशी चर्चा करुनच निर्णय घेतले जाणार आहे. यदाकदाचित महायुती न झाल्यास भारतीय जनता पार्टी 'एकला चलो'ची भूमिका राहणार आहे. अब की बार ७५ पार या ध्येयानुसार सोलापूर महापालिकेवर 'भाजपा'चा झेंडा फडकेल, असे स्पष्ट प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले, 'भाजपा'च्या सत्ताकाळात सोलापूर शहराचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. आ. विजयकुमार देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आणि अन्य पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते महापालिकेच्या येत्या निवडणुकीला सामोरे जाण्याकरिता सक्षम आहेत. त्यामुळे पक्षसंघटनेला बाहेरच्या नेतृत्वाची अजिबात आवश्यकता नाही. महापालिका निवडणुकीसाठी भाजपकडे सुमारे बाराशे जणांची अर्ज आले आहेत. ही भाजपवरील जनतेच्या विश्वासाची प्रचिती आहे. याउलट इतर पक्षसंघटनांना महापालिकेच्या एकूण १०२ जागांवर उमेदवार मिळणे अवघड झाले आहे. महापालिका निवडणुकीसाठी सर्वसंमतीने उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. शहरातील दोन उड्डाणपूलांचे काम भूसंपादनाअभावी रखडले आहे. बाधित होणाऱ्या मिळकतींच्या हस्तांतरणाची प्रक्रिया



पूर्ण झाल्यावर या प्रकल्पाचे काम सुरु करण्यात येणार आहे. पार्क स्टेडियमसंदर्भात कुठलाही घोटाळा झाला नाही. भाडे करारासंदर्भातील मुद्रांक शुल्क भरणे अपेक्षित आहे. ते भरले जाईल, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

दरम्यान, शहराला दररोज पाणीपुरवठा करण्यासाठी अंतर्गत वितरण व्यवस्था सुधारण्याकामी शासनाने ८९२ कोटींचा प्रकल्प मंजूर केला. महापालिका निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी टेंडर काढावे, यासाठी माझ्यासह भाजपचे सर्व आमदारांनी मुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरला. मुख्यमंत्र्यांनी ते मान्य केले, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी आ.सुभाष देशमुख, आ.देवेंद्र कोठे, भाजपचे जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे आदी उपस्थित होते.



### सोनिया गांधींनी माफी मागावी

**नवी दिल्ली** : डिसेंबर मतचोरीच्या विषयावर काँग्रेसतर्फे रविवारी रामलीला मैदानावर झालेल्या मेळाव्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह घोषणा दिल्याच्या मुद्यावरून सोमवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांत गदारोळ झाला. सोनिया गांधी यांनी याप्रकरणी माफी मागावी, अशी मागणी भारतीय जनता पक्षाने केली आहे. तसेच दोन्ही सभागृहाचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित करावे लागले.

या मुद्यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहात सत्ताधारी भाजपाचे सदस्य अतिशय आक्रमक झाले होते. आज राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच सत्तापक्षनेते जे. पी. नड्डा यांनी रामलीला मैदानावरील काँग्रेसच्या मेळाव्यात मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह घोषणा दिल्याचा मुद्दा उपस्थित केला. 'मोदी तेरी कब्र खुदेंगी, आज नाही तो कल खुदेंगी', अशा घोषणा या मेळाव्यात देण्यात आल्या.

# प्रशासकीय राजवट आली संपुष्टात

## ●सोलापुरात प्रत्येक उमेदवाराला ९ लाख रुपये खर्चाची मर्यादा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**
या महिन्यात होणार... पुढच्या महिन्यात होणार... असे म्हणता म्हणता अखेर सोलापूरसह महाराष्ट्रातील विविध महापालिकांचे निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. लोकप्रतिनिधीविना सोलापूर महापालिकेवर प्रदीर्घ म्हणजे तीन वर्षे नऊ महिन्यांच्या प्रशासकीय कारकीर्द सुरु होती. आजरोजी निवडणुकीचे बिगुल वाजल्याने प्रशासकीय राजवट संपुष्टात आल्यात जमा आहे. सोलापूर महापालिकेसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार असल्याचे निवडणूक आयोगाने जाहीर केले.

राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या निवडणूकविषयक कार्यक्रमाविषयी माहिती देताना सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी सांगितले की, सोलापूर महापालिकेच्या २६ प्रभागातील एकूण १०२ जागांसाठी निवडणूक होणार आहे. यासाठी आजरोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. यामध्ये ४ लाख ५७ हजार ९९ पुरुष, ४ लाख ६७ हजार ४७१ महिला आणि १३६ इतर असे एकूण ९ लाख २४ हजार ७०६ मतदारांचा समावेश आहे. प्रारुप मतदार यादीवर एकूण ५५५ हरकती प्राप्त झाल्या होत्या.

प्राप्त हरकतींपैकी ४६४ हरकती मान्य तर ९१ हरकती अमान्य करण्यात आल्या. एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात हस्तांतरित झालेल्या मतदारांची संख्या ३२ हजार १४० (एकूण मतदारांशी टक्केवारी



३.५ टक्के ) इतकी आहे. अंदाजे १०८८ मतदान केंद्र अपेक्षित आहेत. येत्या चार दिवसात मतदान केंद्रांची निश्चिती करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक कार्यालय राहणार आहे. या कार्यालयच्या ठिकाणी अर्ज भरण्यापासून ते छाननीपर्यंतची प्रक्रिया राबविली जाणार आहे. मागील निवडणुकीत १००८ मतदान यंत्रे वापरण्यात आली होती. यंदा अंदाजे १२०० ईव्हीएम मशीन उपलब्ध करण्यात येत आहेत. यावेळी व्हीव्हीपॅट नसणार आहेत. अर्ज भरण्याच्या तारखेपासून प्रत्येक उमेदवाराला ९ लाख रुपये इतकी खर्च मर्यादा राहणार आहे. सोमवार, १५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजल्यापासून आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी सुरु झाली असून राजकीय पक्षसंघटनांचे बॅनर्स, डिजिटल, झेंडे आदी साहित्य काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली. सर्वांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे. नागरिकांची तक्रार असल्यास महापालिकेच्या संबंधित वेबसाईटवर व माय सोलापूर ॲपवर तक्रार करता येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, वीणा पवार, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित आदी उपस्थित होते

### सई जाधव पहिली महिला लेफ्टनंट

**डेहराडून** : कोल्हापूरच्या रहिवासी सई जाधव या प्रादेशिक सैन्यात पहिल्या महिला लेफ्टनंट झाल्या आहेत. डेहराडूनमधील इंडियन मिलिटरी अकादमी (आयएमए) मध्ये महिला अधिकारी कॅडेटने यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केलेली ही पहिली वेळ आहे. सई जाधवने प्रादेशिक सैन्याच्या विशेष अभ्यासक्रमांतर्गत कठोर प्रशिक्षण पूर्ण केले असून आता तिला लेफ्टनंट म्हणून कमिशन मिळाले आहे.

# नितीन नबीन यांनी स्वीकारला पदभार

## भाजपा मुख्यालयात झाले दणदणीत स्वागत

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**
भाजपाचे नवनियुक्त कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी आज भाजपा मुख्यालयात आपल्या नव्या पदाची सूत्रे स्वीकारली.

नितीन नबीन यांची रविवारी भाजपाचे नवे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. आज दुपारी पाटण्यातून त्यांचे दिल्ली विमानतळावर आगमन झाले त्यावेळी भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि दिल्लीतील भाजपा खासदारांनी त्यांचे विमानतळावर दणदणीत स्वागत केले. विमानतळावरुन नितीन नबीन दिनदयाल उपाध्याय मार्गावरील भाजपा मुख्यालयात आले. भारत माता की जयच्या घोषणात गुलाबाच्या फुलांची उधळण करत भाजपा कार्यकर्त्यांनी अतिशय उत्साहात त्यांचे स्वागत केले.

भाजपा मुख्यालयात केंद्रीय मंत्री पियुष गोयल, धर्मेंद्र प्रधान, भाजपाचे विद्यमान राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे स्वागत केले.

नंतर भाजपाचे विद्यमान अध्यक्ष जे.पी. नड्डा आणि गृहमंत्री अमित शाह तसेच अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत नितीन नबीन यांनी भाजपाचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली. नितीन नबीन यांच्या स्वागतासाठी भाजपा मुख्यलयात माजी केंद्रीय मंत्री रविशंकरप्रसाद, डॉ. हर्षवर्धन यांच्यासह अनेक मंत्री आणि खासदार उपस्थित होते.

४५ वर्षीय नितीन नबीन यांनी ४५ वर्षाच्या भाजपाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारत देशात इतिहास घडवला. पाटण्यातील बांकीपूर विधानसभा मतदारसंघातून सलग पाचवेळा विजयी झालेले नबीन सध्या बिहारमधील नितीशकुमार मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम खात्याचे मंत्री आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)




नितीन नबीन यांचे दिल्ली येथील भाजपा कार्यालयात स्वागत करताना जे. पी. नड्डा आणि गृहमंत्री अमित शाह




आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांच्या हस्ते अर्जेंटिनाचा दिग्गज फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीला टी-२० विश्वचषकाचे निमंत्रण तिकीट प्रदान केले

# मेस्सी म्हणतो, मी पुन्हा येईन!

## ● मेस्सीचा दिल्लीत सन्मान ● जय शहांनी दिले टी-२० वर्ल्ड कपचे तिकीट

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**
आयसीसीचे अध्यक्ष जय शहा यांच्या हस्ते अर्जेंटिनाचा दिग्गज फुटबॉलपटू लियोनेल मेस्सीला टी-२० विश्वचषकाचे निमंत्रण तिकिट प्रदान करण्यात आले. सोमवारी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये मेस्सीचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी त्याला भारतीय क्रिकेट संघाची जर्सी भेट देण्यात आली. शहा यांनी मेस्सीला दिग्गज क्रिकेटपटूंनी स्वाक्षरी केलेली बॅटही भेट दिली.

मेस्सीने प्रथम स्टेडियममधील चाहत्यांना अभिवादन केले. त्यानंतर त्याने रॉड्रिगो डी पॉल आणि लुईस सुआरेझसह फुटबॉलला किक मारली, त्यातील एक थेट स्टेडियमच्या दुसऱ्या मजल्यावर पडला. मेस्सीने मुलांसोबत फुटबॉल खेळून वातावरण आणखी वाढवले.

तत्पूर्वी, मेस्सीची एक झलक पाहण्यासाठी स्टेडियमबाहेर चाहत्यांची मोठी गर्दी जमली होती. तो सकाळी राष्ट्रीय राजधानीत पोहोचणार होता, परंतु दिल्लीत दाट धुक्यामुळे त्याचे विमान रद्द करण्यात आले, ज्यामुळे मेस्सीला काही काळासाठी मुंबई विमानतळावर थांबावे लागले. तो दुपारी तीन वाजताच्या सुमारास दिल्लीत पोहोचला. मेस्सी लीला पॅलेस येथे मुक्कामी होता. त्याच्यासाठी एक संपूर्ण मजला बुक करण्यात आला होता. या प्रेसिडेंटल सूट्सचे एका रात्रीचे भाडे तीन ते सात लाख रुपयांच्या घरात आहे.

भारतातील मुक्कामादरम्यान येथील लोकांना भेटून अतिशय आनंद झाला, असे सांगून मेस्सीने पुन्हा येण्याचे आश्वासन दिले. मेस्सीला दिल्लीत भेटण्यासाठी अनेक मान्यवर उत्सूक होते. त्याच्या बंदद्वार भेटीसाठी शुल्क आकारण्यात आल्याचीही चर्चा आहे. काही बड्या उद्योगपती आणि कॉर्पोरेट जगतातील दिग्गजांनी मेस्सीच्या भेटीसाठी प्रत्येकी एक कोटी रुपये मोजल्याचेही सांगितले जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

## स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालकास अपहरण प्रकरण

# २ कोटी खंडणी मागितल्याप्रकरणी ९ जणांची निर्दोष मुक्तता

### माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्यासह ११ जणांविरुध्द दाखल करण्यात आलेला खटला



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**
मौजे दहिटणे, ता. अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचे तत्कालीन कार्यकारी संचालक प्रल्हाद चवतराव लावंड यास अपहरण करुन त्याचेकडील रिव्हॉल्वर व रोख रक्कम काढून घेवून त्यास सोलापूर येथील वाडधामध्ये डांबुन ठेवून मारहाण करुन २ कोटी रुपये खंडणी मागितल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातुन १) बसलिंगप्पा शिवशरण खेडगी, २) अशोक भद्रप्पा मुलगे, ३) चंद्रकांत नामदेव मिसाळ, ४) शोएब इसाक पटेल, ५) अमोल गोविंद नाईकोडे, ६) मारुती नारायण माने, ७) सचिन कृष्णा शिंदे, ८) कुणाल काशिनाथ जगताप व ९) अजय सुभाष सारंगमठ यांची मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.जे. कटारिया यांनी निर्दोष मुक्तता केली.

यात हकीकत अशी की, श्री स्वामी समर्थ सरकारी कारखान्याचे तत्कालीन कार्यकारी संचालक प्रल्हाद चवतराव लावंड यास दि. ८ फेब्रुवारी २०१३ रोजी सायंकाळी ०४.३० वा. सुमारास तत्कालीन चेअरमन सिद्रामप्पा पाटील यांनी कारखानास्थळी त्यांचे केबिनमध्ये बोलावून घेवून ऊस पुरवठा करणाऱ्या मजुरांच्या टोळ्या कामास न आल्याने कारखाना ऊस पुरवठा अभावी बंद करावा लागत असल्याने कारखान्याचे २ कोटी रुपयाचे नुकसान झाले असल्याने ते २ कोटी रुपये दे असे त्यास म्हणून तत्कालीन संचालक बसलिंगप्पा खेडगी व सशस्त्र अंगरक्षक अमोल नाईकोडे यांना प्रल्हाद लावंड यांची अंगझडती घ्यायला लावून त्याचेकडील रोख ७ हजार एटीएम कार्ड, गाडीची चावी व रिव्हॉल्वर काढून घेवून त्यास बेशुध्द होईपर्यंत बेदम मारहाण करण्यास लावून तेथुन त्यास कारमध्ये जबरदस्तीने घालुन सोलापूर येथील इन चॅनलचे कार्यालय असलेल्या वाडधामध्ये आणून डांबुन ठेवले व तेथेदेखील मारहाण करुन त्याचे रखवालीस सचिन शिंदे व कुणाल जगताप यास ठेवून त्याचेकडे व त्याच्या पत्नीकडे रोख रक्कम रुपये २ कोटीची खंडणी मागितली. त्यानंतर ११ फेब्रुवारी २०१३ रोजी प्रल्हाद लावंड याने त्यास सोलापूर येथील वाड्यात डांबुन ठेवले असून त्याचा घातपात होण्याची शक्यता आहे व त्याला वाचवावा असा मेसेज मोबाईलद्वारे तत्कालीन पोलीस उपअधिक्षक संजीवकुमार पाटील यांना पाठवून मदत मागितल्याने त्या संदेशाच्या आधारे पोलीस उपअधिक्षक अशोक जाधव यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक नितीन कौसडीकर व पोलीस निरीक्षक चंद्रकांत शिंदे यांच्या संयुक्त पथकाने कारवाई करत सदर बंद वाडचात बाजुच्या इमारतीवरुन प्रवेश करुन प्रल्हाद लावंड यांची तेथुन सुटका केली व सचिन शिंदे व कुणाल जगताप यांना अटक केली. अशा आशयाची फिर्याद सुरुवातीस प्रल्हाद लावंड यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला व त्यानंतर सदर गुन्हा अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक मिलिंद खोडवे यांनी करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. खटल्याचे सुनावणी दरम्यान मा.आमदार सिद्रामप्पा पाटील, काशिनाथ भरम शेट्टी व हुसेन भैरामडगी यांचे निधन झाले. खटल्याचे सुनावणी दरम्यान सरकार पक्षातर्फे एकुण १४ साक्षीदार तपासण्यात आले.



खटल्याचे अंतिम युक्तीवादावेळी ॲड. मिलिंद थोबडे यांनी आरोप ठेवण्यात आलेल्या घटना पाहणारा स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही, फिर्यादीचे रिव्हॉल्वर, एटीएम कार्ड, गाडीची चावी त्याचे राहते घरातून जप्त करण्यात आली आहे, सचिन शिंदे व कुणाल जगताप यांना घटनास्थळावरुन अटक केल्याचा पुरावा नाही, २ कोटी रुपयाची मागणी खंडणी नसुन कारखान्याची येणेरक्कम असल्याचे पुराव्यावरुन दिसुन येत असल्याचे सांगुन अनोळखी आरोपींची ओळख परेड घेण्यात आलेली नाही, फिर्यादीने पोलीस उपअधिक्षक यांना पाठविलेल्या मेसेजबाबत कोणताही पुरावा मिळुन आला नाही असे मुद्दे मांडून त्या पृष्ठर्थ मे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे सादर केले ते ग्राह्य धरुन मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री. आर.जे. कटारिया यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे व ॲड. राजकुमार मात्रे यांनी तर सरकारपक्षातर्फे ॲड. प्रकाश जन्नु यांनी काम पाहिले.

### निकाल ऐकायला अप्पा हवे होते : ॲड. मिलिंद थोबडे

प्रस्तुत खटल्यामध्ये दि.११ फेब्रुवारी २०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला व दि. १५ नोव्हेंबर २०१४ रोजी दोषारोप पत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. सदर खटल्याची सुनावणी ११ वर्षे २१ दिवस चालली व दरम्यान माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांची प्रकृती खालावल्याने दि. १८ आक्टोंबर २०२५ रोजी मे. न्यायालयाने त्यांचा जबाब त्यांचे राहते घरी व्हिडीओ कॉन्फरन्सीद्वारे नोंदविला व त्यानंतर दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी सदर खटल्याचे निकालाकरीता तारीख नेमण्यात आली होती. परंतु त्यापुर्वीच दि.१३ नोव्हेंबर २०२५ रोजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांचे निधन झाले. त्यामुळे प्रदिर्घ चाललेल्या खटल्यातुन निर्दोषत्व ऐकण्यासाठी अप्पा हवे होते, अशी खंत ॲड. मिलिंद थोबडे यांनी व्यक्त केली.

---

## महत्त्वाचे...

### नाभिक वधू-वर पालक परिचय मेळाव्याच्या अध्यक्षपदी राजू शुक्लवार

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**
श्री संतसेना नाभिक बहुउद्देशीय सेवाप्रतिष्ठान आणि महाराष्ट्र नाभिक महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १५ व्या राज्यस्तरीय मोफत नाभिक वधू-वर पालक परिचय मेळावा २०२६ च्या अध्यक्षपदी राजू शुक्लवार यांची निवड करण्यात आली. नाभिक वधू-वर पालक परिचय मेळावा २ मार्च २०२६ रोजी सोलापुरातील इरण्णा उपलप मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आलेला आहे. या निवडीच्या सभेच्या अध्यक्षस्थानी सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष हिंदुराव गोरे हे होते. मेळाव्याच्या खजिनदार म्हणून ॲड. पवनकुमार शिंदे, प्रकाश जोगीपेठकर यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी निलकंठ हल्लाळीकर, सुशांत क्षीरसागर, सिद्राम रुद्रार, मोहन जमदाडे, मल्हारी राऊत, महेश श्रीमंगले, राम राऊत, गितेंद्र बेनाळकर, डॉ. माधुरी पारपल्लीवार, अल्का ताटे शोभा राऊत, भारती हडपद, सुनिता दळवी, मिनाक्षी जाधव, कांचन जाधव, परशुराम श्रीमंगले, निखील दळवी, निलकंठ पुलकर्ते, वरदराज स्वामी, नागनाथ कोरे, डी.टी.राऊत, भिमराव रणदिवे उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव सिद्राम रुद्रार यांनी केले तर आभार सुशांत क्षीरसागर यांनी मानले.





### बुरुड शक्ती सेनेतर्फे संत केतय्या स्वामी महाराजांच्या मूर्तीचे वाटप

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**
बुरुड शक्ती सेनेतर्फे बुरुड संत श्री. केतय्या स्वामी महाराजांच्या १ फुटाची ५१ मूर्ती वाटप खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. व पाच फूटी फायबरची संत केतय्यास्वामी महाराजांच्या पूर्णाकृतीचे अनावरण करण्यात आले. यावेळी सुनील वडतिले, नगरसेवक अनंत जाधव, प्रिया बवसंती, दर्शन दुबे, पत्रकार दशरथ वडतिले, मनोज वडतिले, रोहित कुकडे, रमाकांत वडतिले, संजिविनी कुकडे, विलास रोहिटे, सोमा वडतिले उपस्थित होते.

### ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर सांस्कृतिक संवादांना आकार देण्यात आघाडीवर

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**
ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर आता पुढे सरकला जयपूरमध्ये, उच्च दर्जाची-फॅशन आणि मोटरस्पोर्टच्या एकत्रिकरणामध्ये रूपांतरित झाला आहे.सीमा पार करून, जयपूर आवृत्तीने मोटरस्पोर्ट्स-प्रेरित डिझाइन,ग्लॅमरस परफॉर्मन्स वेअर आणि उच्च दर्जाचे-ऑक्टेन फॅशन शोकेसचा शोध लावला, ज्यावरून 'फॅशनचे पुढचे पाऊल' काय असेल ते लक्षात येते ते म्हणजे-वेगाने आणि अचूकतेने पुढे धावणे.फॅशन डिझाईन कौन्सिल ऑफ इंडिया च्या सहकार्याने, या शोकेसने रनवेला स्टाईल आणि शक्तीच्या हाय-स्पीड स्वरूपात पुन्हा मांडले आहे.सुप्रसिद्ध डिझायनर्स नम्रता जोशीपुरा आणि अभिषेक पाटणी यांनी उच्च दर्जाच्या-ऑक्टेन मोटरकोर सौंदर्यशास्त्राची पुनर्व्याख्या केली, रेसिंग संस्कृतीचे स्टेटमेंट-मेकिंग फॅशनमध्ये रूपांतर केले. बॉलीवूड स्टार हरनाज संधू ने अंतिम शोस्टॉपर म्हणून या रनवेचे नेतृत्व केले. देबश्री दासगुप्ता, सीएमओ, पेर्नोड रिकार्ड इंडिया म्हणाल्या, ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूर नेहमीच फॅशन आणि सांस्कृतिक संवादांना आकार देण्यात आघाडीवर राहिला आहे. डिझायनर अभिषेक पटणी म्हणाले,ब्लेंडर्स प्राइड फॅशन टूरने नेहमीच क्रिएटिव्हीटीच्या सीमा पार करण्यासाठी समर्थन केले आहे.

---

## देश रक्षणासाठी शहीद झालेल्या कुटुंबियांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी ध्वजदिन निधीचा वापर

**कर्नल रणधीर सतीश यांचे प्रतिपादन**

**सोलापूर जिल्ह्याला २०२५ चे १ कोटी ७२ लाखाचे निधी संकलन उद्दिष्ट**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१५ डिसेंबर-**
सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलनासाठी जिल्हयासाठी शासनाने रुपये १ कोटी ७२ लाख इतके उद्दिष्ट दिले आहे. मागील वर्षी शासनाने दिलेल्या एक कोटी ७२ लाख उद्दिष्टापेक्षा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली दोन कोटी १७ लाख १५ हजार ४७० म्हणजेच उद्दिष्टाच्या १२६टक्के पूर्तता झालेली आहे. तरी सन २०२५ निधी संकलनाचे उद्दिष्ट सर्व शासकीय यंत्रणांनी वेळेत पूर्ण करावे, असे आवाहन एनसीसीच्या महाराष्ट्र बटालियन ९ चे कमान अधिकारी कर्नल रणधीर सतीश यांनी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२५ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रम आज बहुउद्देशीय सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे कर्नल रणधीर सतिश, कमान अधिकारी, ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रशासकीय अधिकारी, ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसी, सोलापूर ले. कर्नल शरब बाचर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर मेजर मिलिंद देवदत्त तुंगार (निवृत्त),पोलीस उप आयुक्त अश्विनी पाटील, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, सोलापूर शहर वैष्णवी पाटील, पोलीस निरीक्षक ,राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १० सोरेगांव, सोलापूर दिलीप तडाखे, नालसा विधिज्ञ लक्ष्मण पाटील, अध्यक्ष, माजी सैनिक संघटना सोलापूर अरुणकुमार तळीखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. सुत्रसंचालन सिध्देश्वर इंग्लिश मेडीयम हायस्कूलच्या सह शिक्षिका अंजली खानापूरे यांनी केले. सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पवार संजीव व्यंकटराव यांनी आभार मानले.



## कठोर शिस्त आणि सातत्यपूर्ण अभ्यासच यशाची खरी गुरुकिल्ली

**उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**
विद्यार्थ्यांनी प्रेरणा आणि शिस्त यातील फरक ओळखणे अत्यंत गरजेचे आहे. प्रेरणा ही उर्मी देणारी शक्ती आहे. पण कठोर शिस्त आणि रोज केलेला सातत्यपूर्ण अभ्यास हाच प्रत्यक्षात यशाचा पाया आहे. असे प्रतिपादन पंढरपूर येथील उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत डगळे यांनी केले.

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात रयत स्पर्धा परीक्षा अकादमीच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य डॉ. सदाशिव कदम होते. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, दिलीप चौधरी यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या ढेपे यांनी केले. प्रा. देवराव मुंडे यांनी आभार मानले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रदीप जगताप यांनी करून दिला.

---



## यंदाची यात्रा प्रकाशमय करण्याचे वीरशैव व्हिजनचे आवाहन

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर -**
ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धेश्वर यांची यात्रा २०१९ मध्ये शहरात जशी प्रकाशमय यात्रा साजरी झाली. तशीच यंदाची यात्रा देखील प्रकाशमय यात्रा करण्याचे आवाहन वीरशैव व्हिजनने केले आहे.

वीरशैव व्हिजनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या उपक्रम नियोजनासाठी भुसार गल्ली येथील श्री मन्मथेश्वर मंदिर येथे बैठक घेण्यात आली. वीरशैव व्हिजनची २०१९ची संकल्पना सोलापूरकरांनी स्वीकारली. संपूर्ण नंदीध्वज मार्ग आणि १० हजार भक्तांच्या घरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. बैठकीस वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, सोमनाथ चौधरी, सोमेश्वर याबाजी, सचिव नागेश बडदाळ, शिवानंद सावळगी, राजेश नीला, अमित कलशेट्टी, अविनाश हत्तरकी आदी उपस्थित होते.

## डॉ. कोटणीस यांच्या लष्करी रुग्णसेवेचा आम्हाला अभिमान

**भारतातील चीनचे कॉन्सुल जनरल चिन जिये यांचे सोलापूर भेटीत प्रतिपादन**

तभा वृत्तसेवा,
**सोलापूर दि. १५ डिसेंबर-**
डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांनी दुसऱ्या जागतिक महायुद्धात जपानी आक्रमणावेळी चीनमध्ये येऊन केलेल्या लष्करी रुग्णसेवेचा आम्हाला अभिमान आहे व त्या सेवेकरीता चीन शासन सदैव डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांच्या ऋणात राहील, असे प्रतिपादन चीनचे कॉन्सुल जनरल चिन जिये यांनी केले.



चिन जिये यांनी आपल्या प्रतिनिधीमंडळासह आंतरराष्ट्रीय कीर्तीचे मानवतावादी डॉ. द्वारकानाथ कोटणीस त्यांच्या स्मारकाला स्मारकाला भेट देऊन अभिवादन केल्यानंतर ते बोलत होते.त्यांच्या या भेटीमुळे भारतचीन मैत्रीचं ऐतिहासिक बंध अधिक दृढ झाल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली. यावेळी महापालिकेचे आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

कॉन्सुल जनरल चिन जिये यांना स्मारकातील विविध विभागांची माहिती डॉ. कोटणीस मेमोरियल सोलापूरचे सदस्य प्रा. गणेश चन्ना यांनी दिली. त्यांच्या भेटीदरम्यान त्यांनी दोन्ही देशांतील संस्कृती, आरोग्य सेवा, मानवतावादी कार्य याबाबत अधिक सहकार्य वाढविण्याची इच्छाही व्यक्त केली.चीनचे जनरल माओ स्ते यांनी त्यावेळी पाठविलेले कृतज्ञता संदेश पत्राचे अवलोकन केले व सोलापूर महानगरपालिकेतर्फे जतन केलेल्या स्मारकाबाबत कृतज्ञता व्यक्त करून स्मारकाबद्दल समाधान व्यक्त केले. यावेळी झोउ वेन्टिंग, चिन जिये यांची पत्नी, चेन हुआझू, सीईओ यॅप इंडिया,वांग जिनशेंग, कॉन्सुल, जी झ्यूकुई, कॉन्सुल, शियोंग फांगशिंग, उप- कॉन्सुल,डोंग ली, व्हाईस कॉन्सुल, व्हाईस,झू युचियान,व्हाईस कॉन्सुल, नगर अभियंता सारिका आकूलवार, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, सह.अभियंता प्रकाश दिवानजी, जयदीप टाव्हरे, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, स्वप्नील सोलनाकर, गणेश बिराजदार उपस्थित होते.

---

## दृष्टी नाही पण स्वप्ने मोठी आहेत : अन्नपूर्णा एकबोटे

### अंधारातही प्रकाश शोधणाऱ्या मुलांच्या संघर्षातून विद्यार्थिनींना मिळाला जीवनधडा

**एल.बी.पी.एम. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींची अंध शाळेस भेट**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर -**
डोळ्यांना दिसत नाही म्हणून स्वप्ने मरत नाहीत. दृष्टी नसली तरी इच्छा शक्ती अपरंपार आहे. ते पाहू शकत नाहीत, परंतु त्यांच्या स्वप्नांना डोळे नाहीत; तर पंख आहेत. अडथळे त्यांच्या वाटेत येतात, पण ते पायरी बनून पुढे जातात. अंधार त्यांच्या आयुष्यात असला तरी त्यांच्या मनातला सूर्य कधी मावळत नाही. दृढनिश्चय, आत्मविश्वास व स्वप्नांची उंच भरारी मात्र तशीच तेजस्वी आणि मोठी आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या अन्नपूर्णा एकबोटे यांनी केले.

सातरस्ता मोदीखाना येथील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयातील समाजशास्त्र आणि इतिहास विभागातील विद्यार्थिनींनी राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाईंड येथे भेट दिली यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सौरभ शिंगाडे, रमेश पाटील, डॉ. दशरथ रसाळ, डॉ. नागोराव भुरके, प्रा. संतोष मारकवाड हे उपस्थित होते.

या विशेष उपक्रमाने अंधारातही प्रकाश शोधणाऱ्या मुलांच्या संघर्षातून विद्यार्थिनींना जीवनधडा मिळाला.

### पुस्तकी ज्ञानाबरोबर संवेदनशीलतेचा नवा अंकुर फुलणे गरजेचे

महाविद्यालयामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमाबाबत सांगताना प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे म्हणाले की, अशा भेटीद्वारे विद्यार्थिनींचे भावविश्व विस्तारते आणि समाजातील विविध घटकांविषयी समज वाढते. मानवी मूल्ये, संवेदनशीलता आणि सहानुभूती यांचे मौल्यवान धडे मिळून समाजात बदल घडविण्याची जाणीव निर्माण होते. अभ्यासक्रमीय पुस्तकी ज्ञानाबरोबर संवेदनशीलतेचा नवा अंकुर फुलणे गरजेचे असून यातूनच शिक्षण खऱ्या अर्थाने पूर्ण होते.



## प्रभाग क्र. २२मध्ये टकारी समाजासाठी सांस्कृतिक हक्काचे स्वप्न साकारणार

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष निधीतून ५० लाखांचे सांस्कृतिक भवन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**
प्रभाग क्रमांक २२ येथे लोकशाहीर अणणाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत टकारी समाजासाठी उभारलेल्या सांस्कृतिक भवनाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष व प्रभाग क्र. २२चे माजी नगरसेवक किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या विशेष प्रयत्नातून हा विकासप्रकल्प साकारला आहे. उपमुख्यमंत्री पवार यांच्या विशेष विकास निधीतून ५० लाख रुपयांचा भरीव निधी या सांस्कृतिक भवनासाठी मंजूर करण्यात आला असून त्यामुळे टकारी समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांना कायम स्वरूपी व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. याप्रसंगी टकारी समाजाच्या वतीने नगरसेवक किसन जाधव व नगरसेवक नागेश गायकवाड यांचा सन्मान करण्यात आला.

# हल्ल्यामागे पाकिस्तानी बाप-लेक

## • ऑस्ट्रेलियातील दहशतवादी कृत्य • इसिससोबत संबंध असल्याचा संशय

◆ **सिडनी, १५ डिसेंबर**

ऑस्ट्रेलियात ज्यू समुदायाच्या उत्सवादरम्यान बॉन्डी बिचवर बेछूट गोळीबार करीत १५ जणांची हत्या करणारे हल्लेखोर पाकिस्तानी बाप-लेक असल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. कठोर शस्त्र नियंत्रण असलेल्या या देशात जवळपास तीन दशकांनंतर झालेला हा सर्वांत भीषण हल्ला होता.



साजीद अक्रम   नावेद अक्रम

५० वर्षीय साजिद अक्रम याला पोलिसांनी गोळ्या घालून ठार केले. त्याचा २४ वर्षीय मुलगा नावीद अक्रम जखमी असून, त्याच्यावर माल लॅन्यॉन येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती न्यू साऊथ वेल्स पोलिस आयुक्तांनी दिली. हे दोघे मुळचे पाकिस्तानी आहेत, अशी माहिती अमेरिकी गुप्तचर अधिकाऱ्यांच्या हवाल्याने येथील एका वृत्तपत्राने दिली. अक्रमच्या चालक परवान्याचे छायाचित्र समाज माध्यमावर व्हायरल झाले आहे. त्यात त्याने पाकिस्तानी क्रिकेट संघ घालतो, तशी हिरवी जर्सी घातल्याचे दिसत आहे.

मुलगा ऑस्ट्रेलियात जन्मलेला नागरिक आहे, तर वडील १९९८ मध्ये विद्यार्थी व्हिसावर गेले होते. २००१ मध्ये भागीदार व्हिसा आणि नंतर तो रहिवासी परती व्हिसात रूपांतरित करण्यात आला, अशी माहिती ऑस्ट्रेलियाचे गृहमंत्री टोनी बर्क यांनी दिली.

हनुक्काच्या पहिल्या दिवशी हल्लेखोरांनी जाणीवपूर्वक ज्यू समुदायाला लक्ष्य केले, असे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी सांगितले.

नावीद अक्रम हा फळविक्रेता होता, असे पोलिस तपासात निष्पन्न झाले आहे. कंपनी दिवाळखोर झाल्याने त्याच्या मुलाला दोन महिन्यांपूर्वी कामावरून काढून टाकण्यात आले होते. साजिदने १० वर्षांपूर्वी बंदुकीचा परवाना मिळवला होता. (वृत्तसंस्था)

### दहा मिनिटांचा थरार

गोळीबाराचा थरार जवळपास दहा मिनिटे सुरू होता, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. गोळीबार सुरू होताच लोक बिचवरून सैरावैरा धावू लागले. हनुक्का सोहळ्यासाठी जवळपास दहा हजार लोक गोळा झाले होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### सहा वर्षांपूर्वी झाली होती नावीद अक्रमची चौकशी

ऑस्ट्रेलियाच्या गुप्तचर अधिकाऱ्यांनी इसिससोबत संबंध असल्याच्या संशयावरून नावीद अक्रमची सहा वर्षांपूर्वी चौकशी केली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली. तेव्हापासून तो सुरक्षा यंत्रणांच्या रडारवर होता. मात्र, पकडल्या जाण्याच्या भीतीमुळे तो लपून बसला असावा. मोठा हल्ला घडवण्यासाठी त्याने योग्य संधीची प्रतीक्षा केली असावी, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### ऑस्ट्रेलियात कठोर राष्ट्रीय शस्त्र कायदा लागू होणार

सिडनीच्या बाँडी बीचवर झालेल्या सामूहिक गोळीबारात किमान १५ लोकांचा मृत्यू झाल्यानंतर ऑस्ट्रेलियात कठोर राष्ट्रीय शस्त्र कायदा लागू होणार आहे. ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान ॲन्थनी अल्बानीज यांनी सोमवारी अधिक कठोर राष्ट्रीय शस्त्र कायद्यांचा प्रस्ताव मांडला. परवानाधारक मालक किती शस्त्रे बाळगू शकतो यावर मर्यादा घालण्यासह आपण नवीन निर्बंधांचा प्रस्ताव मांडणार असल्याचे अल्बानीज म्हणाले. सरकार कोणतीही आवश्यक कारवाई करण्यास तयार आहे. यामध्ये कठोर शस्त्र कायद्यांची आवश्यकता समाविष्ट आहे, असे अल्बानीज यांनी पत्रकारांना सांगितले. लोकांची परिस्थिती बदलू शकते. कालांतराने लोकांचे विचार कट्टरपंथी होऊ शकतात. परवाने कायमस्वरूपी नसावेत, असेही ते म्हणाले.



पंतप्रधान नरेंद्र मोदी जॉर्डनच्या दौऱ्यावर आहेत. राजधानी अम्मान येथे दाखल झाल्यानंतर भारतीय समुदायाने त्यांचे जोरदार स्वागत केले.

# नवीन संधी हा पक्षाचा आशीर्वाद : नितीन नबीन

◆ **पाटणा, १५ डिसेंबर**

आपल्याला मिळालेली बढती हा पक्षाचा आशीर्वाद आहे आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना प्रगती करण्याची संधी देणारा हा एकमेव राजकीय पक्ष आहे, अशी प्रतिक्रिया नव्यानेच नियुक्त करण्यात आलेले भाजपाचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष नितीन नबीन यांनी सोमवारी दिली.



दिल्लीला रवाना होण्यापूर्वी त्यांनी विश्वास दाखवल्याबद्दल भाजपाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे त्यांनी आभार मानले. भाजपा केवळ तरुणांना प्रोत्साहन देत नाही, तर त्यांना मोठी ध्येये साध्य करण्यासाठी मार्गदर्शन आणि तयारही करते. तळागाळातील कार्यकर्त्यांना प्रगती करण्याची संधी देणारा हा एकमेव राजकीय पक्ष आहे, असे नितीन नबीन यांनी सांगितले.

पक्ष संघटना बळकट करण्यासाठी संयमाने काम करा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले. दिवंगत वडील आणि भाजपाचे माजी आमदार नबीन किशोर प्रसाद सिन्हा यांचे कार्य समोर नेण्याची प्रतिज्ञा त्यांनी आज सुरुवातीला केली. ते बिहारचे सार्वजनिक बांधकाम मंत्री आहेत.

मी नेहमीच माझ्या वडिलांच्या कल्पनांनुसार काम केले. ते नेहमी पक्षाला मातेप्रमाणे मानायचे आणि त्यांचे देशाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्यामुळेच पक्षाने मला आशीर्वाद दिला, असे मला वाटत असल्याचे नबीन म्हणाले. (वृत्तसंस्था)

# जपानमध्ये दोघांवर चाकू हल्ला; ३० वर्षीय संशयिताला अटक

◆ **टोकियो, १५ डिसेंबर**

फुकुओका या दक्षिणेकडील शहरातील एचकेटी या महिला पॉप संगीत गटाच्या मनोरंजन संकुलात दोन लोकांवर चाकू हल्ला झाला. या हल्ल्याप्रकरणी एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे, असे जपानच्या पोलिसांनी सोमवारी सांगितले. या हल्ल्यात जखमी झालेल्या दोघांना जखमा झाल्या आहेत.

फुकुओका पोलिसांनी एका ३० वर्षीय संशयिताला रविवारी त्या संकुलात एका ४४ वर्षीय व्यक्तीच्या छातीत स्वयंपाकघरातील चाकूने भोसकल्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. या प्रकरणाचा संभाव्य खुनाचा प्रयत्न म्हणून तपास करीत आहेत, परंतु त्यांनी संशयिताचा हेतू यासह पुढील तपशील देण्यास नकार दिला. तसेच, त्यांनी दुसऱ्या चाकू हल्ल्याबद्दलही कोणतीही टिप्पणी केली नाही.

संकुलातील एचकेटी थिएटरमध्ये काम करणाऱ्या जखमी व्यक्तीला, जेव्हा त्याने संशयिताला अनधिकृत भागात पाहिले आणि त्याला तेथून जाण्यास सांगितले, तेव्हा त्याच्यावर चाकू हल्ला करण्यात आला, असे क्योटो न्यूज एजन्सी आणि इतर जपानी माध्यमांनी सांगितले.

माध्यमांच्या वृत्तानुसार, संशयिताने घटनास्थळावरून पळून जाण्यापूर्वी त्याच संकुलातील लिफ्टच्या हॉलमध्ये एका २७ वर्षीय महिलेच्या पाठीतही चाकू भोसकल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे रविवारी रात्री नियोजित असलेला कार्यक्रम रद्द करण्यात आला, असे एचकेटी गटाने सांगितले. जपानमध्ये हिंसक गुन्हे दुर्मिळ आहेत. कारण तेथे कठोर शस्त्र नियंत्रण कायदे आहेत. परंतु अलिकडच्या वर्षांत चाकू हल्ले आणि घरगुती स्फोटकांशी संबंधित अनेक हाय-प्रोफाईल प्रकरणे समोर आली आहेत. (वृत्तसंस्था)

# न्या. यशवंत वर्मांना अखेरचा 'अल्टिमेटम'

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

लोकसभेत त्यांच्याविरुद्ध मांडण्यात आलेल्या प्रस्तावानंतर, न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी आरोपांवर उत्तर देण्यासाठी वेळ मागितला आहे. रोख घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने त्यांना सहा आठवड्यांची मुदत देण्याचा निर्णय घेतला आहे तसेच आणखी वेळ दिला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी १२ ऑगस्ट रोजी समितीची स्थापना केली. न्यायमूर्ती वर्मा यांच्या हकालपट्टीच्या समर्थनार्थ १४६ खासदारांनी या प्रस्तावावर स्वाक्षरी केली. तत्कालीन सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनीही एक समिती स्थापन केली. त्यांची बदनामी करण्यासाठी रोख रक्कम लपवून ठेवण्यात आली होती, असा न्यायमूर्ती वर्मा यांचा दावा सभागृह समितीने फेटाळून लावला.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अरविंद कुमार यांच्या नेतृत्वाखालील तीन सदस्यीय चौकशी समितीने न्यायमूर्ती वर्मा यांना त्यांच्यावरील आरोपांवर उत्तर देण्यास सांगितले होते. ५ डिसेंबर रोजी झालेल्या कामकाजादरम्यान, न्यायमूर्ती वर्मा यांनी समितीच्या गैरव्यवहाराच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी आणखी आठ आठवड्यांची मुदत मागितली. समितीने आता त्यांना सविस्तर उत्तर देण्यासाठी सहा आठवड्यांची मुदत दिली आहे. त्यांना आणखी कोणतीही मुदतवाढ मिळणार नाही. जानेवारी २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात कार्यवाही सुरू होण्याची अपेक्षा आहे.

चौकशी समितीने पुराव्यांसह आरोपांचा मेमो दाखल केला आहे. यामध्ये १४-१५ मार्चच्या रात्री दिल्ली पोलिस आणि अग्निशमन दलाने घेतलेल्या आग विझविण्याच्या कामांचे व्हिडीओ आणि साक्षीदारांचे जबाब समाविष्ट आहेत. (वृत्तसंस्था)

# नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाई उणे ०.३२ टक्के

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

डाळी आणि भाज्यांसारख्या खाद्यपदार्थांच्या किमतींमध्ये मासिक आधारावर वाढ झाल्याने नोव्हेंबरमध्ये घाऊक महागाईचा दर वाढून तो उणे ०.३२ टक्क्यांवर गेल्याचे सोमवारी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

मागील वर्षी ऑक्टोबरमध्ये घाऊक महागाईचा दर उणे १.२१ टक्के आणि नोव्हेंबरमध्ये २.१६ टक्के होता. नोव्हेंबर २०२५ मधील महागाईचा नकारात्मक दर हा प्रामुख्याने अन्नपदार्थ, खनिज तेल, कच्चे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, मूलभूत धातूंचे उत्पादन आणि वीज इत्यादींच्या किमतींमध्ये झालेल्या घसरणीमुळे आहे, असे उद्योग मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे. घाऊक किंमत निर्देशांकाच्या आकडेवारीनुसार, नोव्हेंबरमध्ये खाद्यपदार्थांच्या किमतीमधील घट ४.१६ टक्के होती, तर ऑक्टोबरमध्ये ती ८.३१ टक्के होती. (वृत्तसंस्था)



उत्तराखंडमधील अल्मोडा येथील रहिवासी कविता चंदने अंटार्क्टिका खंडावरील माऊंट व्हिन्सन या सर्वांत उंच शिखरावर तिरंगा फडकावला

# विद्यार्थ्यांना शारीरिक अन् मानसिक शिक्षा देण्यावर बंदी

## शिक्षण विभागाने जारी केली नवी नियमावली

◆ **मुंबई, १५ डिसेंबर**

वसई येथील एका शाळेतील सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा शाळेत उशिरा आल्याबद्दल शिक्षा म्हणून १०० उठाबशा करायला लावल्यामुळे मृत्यू झाला. या घटनेमुळे पालकांमध्ये संताप पसरला. या प्रकाराची सरकारनेही गांभीर्याने दखल घेतली असून वसई येथील या शाळेची नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्याशिवाय शालेय शिक्षण विभागाने सर्व शाळांसाठी नियमावली जारी करत विद्यार्थ्यांना शारीरिक आणि मानसिक शिक्षा देण्यास बंदी घातली आहे.

राज्य शिक्षण विभागाने जारी केलेल्या नवीन निर्देशांनुसार महाराष्ट्रातील शाळांना आता अधिक कठोर बाल सुरक्षा आराखड्याचे पालन करावे लागेल; ज्यात शारीरिक शिक्षा आणि मानसिक छळावर बंदी घातली आहे. त्याशिवाय जर अशा घटना घडल्या तर या गंभीर प्रकरणांमध्ये पोलिसांना वेळेत अहवाल देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे निर्देश केंद्र सरकारच्या शालेय सुरक्षा आणि संरक्षणावरील मार्गदर्शक तत्त्वे (२०२१) सर्व शाळांवर, मग त्या कोणत्याही



मंडळाच्या किंवा व्यवस्थापनाच्या असोत, त्यांच्यासाठी हे नियम बंधनकारक आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा प्रमुख, कर्मचारी आणि व्यवस्थापनावर थेट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. शिक्षक आणि शाळेतील कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांवर शारीरिक किंवा मानसिक शिक्षा करण्यास मनाई आहे.

प्रतिबंधित कृत्यांमध्ये मारहाण करणे किंवा कानशिलात लावणे, कान किंवा केस ओढणे, विद्यार्थ्यांना उठाबशा काढायला लावणे, त्यांना जास्त वेळ उन्हात किंवा पावसात वर्गाबाहेर उभे करणे, विद्यार्थ्यांना ढकलणे, त्यांना गुडघे टेकवत जमिनीवर बसायला लावणे, शिक्षेच्या स्वरूपात अन्न किंवा पाणी जप्त करणे आणि वारंवार तोंडी अपमान करणे किंवा धमक्या देणे यांचा समावेश आहे.

दरम्यान, शैक्षणिक किंवा सुरक्षिततेशी संबंधित कारणांसाठी अपरिहार्य असल्याशिवाय खाजगी संदेश, चॅट किंवा सोशल मीडियाद्वारे विद्यार्थ्यांशी वैयक्तिक संवाद टाळण्याचे निर्देश शाळांना देण्यात आले आहेत. पालकांच्या आणि संस्थेच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांचे फोटो अथवा व्हिडीओ घेणे किंवा ते वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. सर्व शाळांनी सुलभ पायाभूत सुविधा आणि सोयीसुविधा सुनिश्चित केल्या पाहिजेत आणि तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देणारी स्पष्ट, पारदर्शक तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित केली पाहिजे. शाळा प्रमुखांनी सुरक्षिततेशी संबंधित कोणतीही घटना तत्काळ नोंदविणे, सीसीटीव्ही फुटेज, उपस्थिती नोंदी आणि लेखी तक्रारींसारखे पुरावे जतन करणे आणि प्राथमिक चौकशी करणे आवश्यक आहे. लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा किंवा बाल न्याय कायद्यांतर्गत येणाऱ्या गंभीर प्रकरणांमध्ये शाळांनी २४ तासांच्या आत पोलिसांत तक्रार दाखल करणे आवश्यक आहे, असंही सांगण्यात आले आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### इमरान हाश्मीसोबत दिसणार अमृता

**मुंबई** : अभिनेत्री म्हणून अमृता खानविलकर यांनी अनेकविध भूमिका साकारल्या आहेत. त्यामुळे अनेकांची आवडती आहे. आता नव्या वर्षात रंगभूमीवर पदार्पण करणार असून वर्ष संपत असताना ती नेटफ्लिक्सच्या नव्या वेबसीरिजमध्येही झळकणार आहे. 'तस्करी' या वेबसीरिजमध्ये ती अभिनेता इमरान हाश्मीसोबत मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या निमित्ताने अमृता आणि इमरान यांची जोडी प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे. अमृताने समाज माध्यमांवर 'तस्करी'चा टीझर शेअर केला असून ही सीरिज आपल्यासाठी अतिशय महत्त्वाची ठरणार असल्याचे लिहिले आहे. यात तिची भूमिका नेमकी कशी असणार, याविषयी प्रेक्षकांना उत्सुकता आहे.



### 'धुरंधर'ने मोडला 'छावा'चा विक्रम




**मुंबई** : सध्या 'धुरंधर' चित्रपटाने तिकीटबारीपासून तर समाजमाध्यमांपर्यंत सगळीकडेच नुसता धुमाकूळ घातला आहे. १० दिवसात या चित्रपटाने कमाईचे मोठे आकडे मिळविले आहे तसेच अनेक चित्रपटांचे विक्रमही मोडीत काढले आहेत. या चित्रपटाने १० दिवसात ३५१ कोटींची कमाई केली आहे. 'छावा' चित्रपटाने १० दिवसात ३२६ कोटींचा गल्ला जमवला होता. प्रत्यक्षात 'धुरंधर'चा सुरुवातीचा गल्ला 'छावा'पेक्षा कमी होता. पण, नंतर चित्रपटाने इतका वेग घेतला आहे की, सर्वत्र याच चित्रपटाची चर्चा सुरू आहे. दुसऱ्या आठवड्यात त्याने 'छावा'चा विक्रम मोडला आहे. अगदी मध्यरात्रीचे शोदेखील हाऊसफुल्ल होत आहेत.

### समाजमाध्यमांवर अक्षय खन्नाचे राज्य

**मुंबई** : 'धुरंधर' चित्रपटातील मुख्य भूमिकेमुळे रणवीरसिंह चर्चेत असताना यातील प्रमुख खलनायकाच्या भूमिकेत अक्षय खन्ना जास्त प्रसिद्ध झाल्याचे चित्र दिसत आहे. चित्रपटातील खलनायकाची जास्त चर्चा होणे ही बाब फारच दुर्मिळ असते. त्यातही अक्षय खन्ना हा समाज माध्यमांवर किंवा प्रसिद्धीच्या झोतात कमीच दिसतो. तरीही आता त्याने ज्या पद्धतीने चित्रपटात रहमत डकैतची भूमिका साकारली आहे, त्यानंतर संपूर्ण चित्रपटात त्याचाच दबदबा दिसून येत आहे. समाजमाध्यमांवर सर्वत्र त्याच्या बलुचमधील प्रवेशाचा व्हिडीओ फिरत असून त्यात त्याने केलेल्या उत्स्फूर्त नृत्याने तर लोक जाम खुश आहेत. या चित्रपटासाठी रणवीरसिंहला ३० कोटी रुपये मिळाले तर अक्षयला केवळ अडीच कोटी मिळाले. तरीही या चित्रपटात फक्त अक्षयला पाहण्यासाठी लोक थिएटरमध्ये जात आहेत.



## बॉन्डी बिच गोळीबार प्रकरण

### जयशंकर यांची पेनी वाँग यांच्यासोबत चर्चा

◆ **नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

बॉन्डी बिचवर झालेल्या गोळीबार प्रकरणी भारताचा ऑस्ट्रेलियाला पूर्ण पाठिंबा असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी सोमवारी ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री पेनी वाँग यांच्यासोबत सोमवारी चर्चा करताना सांगितले.

दूरध्वनीवर झालेल्या संभाषणात जयशंकर यांनी हल्ल्यात झालेल्या प्राणहानीबद्दल शोक व्यक्त केला. मी आताच ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र मंत्री पेनी वाँग यांच्यासोबत चर्चा केली. बॉन्डी बिचवर झालेल्या भीषण हल्ल्याबाबत भारताचा पूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांना सांगितले, अशी माहिती एस. जयशंकर यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये दिली.

दोन हल्लेखोरांनी रविवारी केलेल्या बेछूट गोळीबारात १५ जण ठार झाल्याची माहिती ऑस्ट्रेलियाच्या प्रशासनाने दिली. हल्ला झाल्यानंतर जयशंकर यांनी त्याबाबत निषेध केला. बॉन्डी बिचवर हनुक्का साजरा होत असताना झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करीत आहे. आम्ही पीडित आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

हा हल्ला म्हणजे देशातील काळा अध्याय असल्याचे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी म्हटले होते. आनंद आणि श्रद्धेच्या उत्सवाचा दिवस असायला हवा होता, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# आक्षेपार्ह पोस्ट; एकाला अटक

◆ **मंगळुरू, १५ डिसेंबर**

विदेशात राहून हिंदू धर्माबद्दल अपमानास्पद आणि उत्तेजक मजकूर पोस्ट केल्याच्या आरोपाखाली एकाला भारतात आल्यावर अटक करण्यात आली, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

मंगळुरूमधील उलाईबेट्टू येथील रहिवासी असलेला आरोपी अब्दुल खादर नेहाद हा सौदी अरेबियात काम करीत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टीम एसडीपीआय २०२५ या इंस्टाग्राम अकाऊंटवर हिंदू धर्माशी संबंधित कथित अपमानास्पद आणि उत्तेजक पोस्ट अपलोड झाल्या. यानंतर ११ ऑक्टोबर रोजी बाजपे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान, तांत्रिक विश्लेषणातून असे दिसून आले की, ही पोस्ट त्यावेळी सौदी अरेबियात राहणाऱ्या नेहादने अपलोड केली होती. या आधारे, त्याच्याविरुद्ध लूक आऊट सर्क्युलर जारी करण्यात आला, असे त्यांनी सांगितले. १४ डिसेंबर रोजी नेहाद विदेशातून केरळमधील कालिकत आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचला. तिथे पोहोचताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पुढील तपास सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# ११.५ कोटी वर्षांपूर्वी शार्क होता २६ फूट लांब

## • अभ्यासातून झाला खुलासा • उत्तर ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्यावर होते वास्तव्य

◆ **ॲडलेड, १५ डिसेंबर**

उत्तर ऑस्ट्रेलियाच्या किनाऱ्यावर व्हेल, पांढरे शार्क म्हणजेच महाकाय मेगालोडॉन दिसण्यापूर्वी एक प्रागैतिहासिक शार्क होता, असे संशोधकांचे म्हणणे आहे. आधुनिक शार्क वंशातील हा शार्क आता सर्वात जुना ज्ञात मेगा-प्रिडेटर म्हणजेच 'महाशिकारी' असल्याचे मानले जात आहे.

हा मासा ११.५ कोटी वर्षांपूर्वी अस्तित्वात होता. याआधी १५ लाख वर्षांपूर्वीचा मोठे शार्क सापडले होते. २० फूट लांब पांढऱ्या शार्कपेक्षा या शार्कची लांबी २६ फुटांपर्यंत वाढू शकत असल्याचा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. कार्डाबायोडोन्टिड्स हे प्राचीन आणि शिकारी शार्क होते. यांचे अस्तित्व सुमारे ११.५ कोटी



वर्षांपूर्वी क्रेटेशियस काळाच्या उत्तरार्धात होते. हा निष्कर्ष स्वीडिश म्युझियम ऑफ नॅचरल हिस्ट्री येथील पॅलेओबायोलॉजीचे वरिष्ठ क्युरेटर आणि अभ्यासाचे सह-लेखक बेंजामिन किअर यांनी काढला. या शोधावरून असे दिसून येते की, महाकाय शिकारी शार्कच्या लुप्त झालेल्या कुटुंबातील शार्कपेक्षाही आधी यांचे अस्तित्वात होते, असे त्यांनी सांगितले. पृथ्वीवर शार्क सुमारे ४० कोटी वर्षांपासून अस्तित्वात आहेत, परंतु लॅम्निफॉर्म्स हे शार्क, यामध्ये आजच्या पांढऱ्या शार्कचा समावेश आहे. याच्या प्रथम जीवाश्म अहवालामध्ये ते सुमारे १३५ कोटी वर्षांपूर्वी अस्तित्वात असल्याचे दिसून आले.

उत्तर ऑस्ट्रेलियातील डार्विनजवळील समुद्रकिनाऱ्यावर या माशाच्या मणक्यांचा काही भाग सापडला. यामुळे या पांढऱ्या शार्कचा शोध लागला. येथे लांब मानेचे प्लेसिओसॉर आणि इक्टियोसॉरसह प्रागैतिहासिक सागरी प्राण्यांच्या समृद्ध जीवाश्म सापडतात. (वृत्तसंस्था)

### शार्कच्या मणक्याचे सापडले भाग

१९८० आणि १९९० काळात या शार्कच्या मणक्याचे पाच भाग सापडले, परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आले. या सापडलेल्या शार्कच्या प्रत्येक मणक्याच्या भागाची रुंदी अंदाजे ४.७ इंच इतकी होती. प्राचीन शार्कचा अभ्यास करताना मणके हा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. कारण त्यांच्या सांगाड्याची रचना हाडांऐवजी कूर्चांपासून बनलेली असते, असे किअर यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# दक्षिण दिग्विजयाचे नवे दार!

केरळच्या सत्ताकारणावर साम्यवाद्यांचा वरचष्मा असेलही; पण तेथील जनतेच्या धार्मिक भावना संवेदनशील असल्याने, सत्ताकारणाच्या डावपेचांत त्या भावनांना धक्का पोहोचतो तेव्हा ही जनता राजकारणाच्या पठडीपल्याड जाऊन धर्मभावनेला संवेदनशीलतेने जपते आणि प्रसंगी ठोस भूमिका घेते असा अलिकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक निकालांचा अर्थ आहे. केरळची राजधानी असलेल्या तिरुवनंतपुरमच्या महापालिका निवडणुकीत कम्युनिस्टप्रणीत डाव्या लोकशाहीवादी आघाडीची तब्बल साडेचार दशकांच्या सत्तेची मक्तेदारी संपुष्टात आणून मतदारांनी भारतीय जनता पार्टीला दिलेला कौल ही या राज्याच्या राजकारणाला मिळालेली ऐतिहासिक कलाटणी होय. येत्या वर्षात केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांचा रागरंग कसा असेल, याची स्पष्ट जाणीवही या निकालांनी करून दिल्याने, कम्युनिस्टांच्या उरल्यासुरल्या सत्तास्थानांस सुरुंग लागण्यास सुरुवात झाल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. निवडणूक आयोगाने वारंवार आव्हाने दिल्यानंतर आणि स्पष्टीकरणे केल्यानंतरही मतचोरीचा बिनबुडाचा आरोप सतत करून जनतेच्या मनात गैरसमज पसरविण्याचे व मतदान प्रक्रियेच्या विश्वासार्हतेविषयी संभ्रम माजविण्याचे देशव्यापी प्रयोग केरळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही मतदारांनी हाणून पाडले. परिणामी कम्युनिस्टांपाठोपाठ काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीलाही आपली नेमकी जागा कळून चुकली आहे. तिरुवनंतपुरम हा काँग्रेसचे नेते शशी थरूर यांचा बालेकिल्ला मानला जातो. २००९ पासून या लोकसभा मतदारसंघात ते सातत्याने विजयी होत आले आहेत. या महापालिकेच्या १०१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत मात्र, भाजपाने घेतलेली आघाडी कम्युनिस्टांप्रमाणेच थरूर यांनी केलेल्या बांधणीला सैल करणारीही ठरली आहे. तब्बल ५० जागांवर भाजपला मिळालेला विजय म्हणजे भाजपच्या गेल्या दोन दशकांतील दक्षिण दिग्विजय संकल्पांतर्गत सातत्याने राबविलेल्या मोहिमेचे सर्वाधिक तेजस्वी यश म्हणावे लागेल.

केरळसारख्या राज्यात, जेथे जेमतेम शिरकाव करणेदेखील फारसे साध्य झाले नव्हते, तेथेही राजधानीचे शहर असलेल्या महापालिकेवर सत्तेचा झेंडा रोवण्याएवढी मजल मारणाऱ्या भाजपाच्या दक्षिण दिग्विजयाच्या संकल्पपूर्तीची पताका आता या राज्यातही फडकू लागली आहे. केरळच्या निवडणुकांच्या राजकीय इतिहासात प्रथमच, १०१ पैकी ५० जागांवर बाजी मारून महापालिकेची सत्ता ताब्यात घेण्याचा भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा हा विक्रम प्रस्थापित कम्युनिस्टांच्या सत्तेस अनपेक्षित धक्का देणारा आहेच. शिवाय, तो भविष्यात कम्युनिस्टांचा सत्तेवरील झेंडा उतरविण्याची वेळ आल्याचा इशारादेखील आहे. धर्मभावनेशी संबंधित संवेदनशील बाबींमधील राजकीय हस्तक्षेपाच्या विरोधात नोंदविलेल्या निषेधाचा स्पष्ट संदेशही या निवडणुकीच्या निमित्ताने जनतेने कम्युनिस्ट सत्ताधीशांना दिला. धार्मिक भावनांशी खेळ करून संवेदनांची खिल्ली उडविणे सहन होणार नाही याची जाणीवही या निमित्ताने जनतेने करून दिली आहे. महापालिकेच्या मावळत्या सत्तेवर माकपप्रणीत डाव्या लोकशाही आघाडीचे १०१ पैकी ५१ सदस्य होते, तर काँग्रेसप्रणीत संयुक्त लोकशाही आघाडीचे १९ सदस्य होते. भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीची सदस्यसंख्या ३५ ची मजल गाठू शकली होती. आता नव्या निकालांनी संख्याबळाचे गणित पुरते उलटे झाले आहे. भाजपने ५० जागांवर, तर माकपप्रणीत डाव्या आघाडीने २९ जागांवर विजय मिळविला आहे. काँग्रेसप्रणीत आघाडीला नऊ जागांचा फायदा झाला असला, तरी भविष्यातील कोणत्याही निवडणुकीत माकपप्रणीत आघाडी व काँग्रेसप्रणीत आघाडी यांच्यात कोणत्याही प्रकारची युती वा आघाडी होण्याची शक्यता माकपने पुरती फेटाळून लावलेली असल्याने काँग्रेसच्या नीतीचा कोणताही उपयोग या राज्यात होणार नाही. तसेही, राहुल गांधी यांच्या हट्टामुळे व्होटचोरीसारख्या निराधार मुद्याचे बांडगूळ काँग्रेसच्या निवडणूक नीतीला चिकटून राहिल्याने त्या पक्षाची फरफटच सुरू आहे. ही नीती निष्फळ असल्याचे केरळच्या नव्या निकालांनी स्पष्ट झाले आहे. काँग्रेससोबत आघाडी करून तिरुवनंतपुरमची सत्ता राखण्याच्या चर्चेस तर माकपचे केरळ प्रदेश सरचिटणीस एम. व्ही माधवन् यांनी केव्हाच पूर्णविराम दिला आहे. भाजपला आपला पाया मजबूत करण्यासाठी ही भूमिका पथ्यावरच पडणार आहे. येत्या काही दिवसांतील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नियोजित केरळ दौऱ्यानंतर भाजपच्या स्थानिक राजकारणास आणखी बळ मिळेल आणि केरळच्या स्थानिक सत्ताकारणाची गणिते नव्याने आखण्यासाठी आगामी विधानसभा निवडणुकांपर्यंतच्या काळात भाजपला बळ मिळेल यात शंका नाही. केरळच्या लोकसंख्येच्या दृष्टीने बहुसंख्य मानला जाणारा इझावा समाज हा डाव्या आघाडीचा आणि विशेषत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचा हुकमी मतदार मानला जातो. आता हा समुदाय भाजपाकडे वळल्याचे या निकालांतून दिसू लागले आहे. समाजसुधारणा चळवळीत महत्त्वाचा सहभाग असलेल्या या समुदायाचे राजकीय वजन ज्या पक्षाकडे झुकेल, त्यास केरळच्या राजकारणात आपले स्थान भक्कम करता येईल, असे म्हटले जाते. येत्या वर्षभराच्या आतच केरळ विधानसभेच्या निवडणुकीत भक्कम बहुमत मिळविण्याचे डाव्या आघाडीचे मनसुबे या निकालांनी निकालात निघतील अशी चर्चा आहे.

या निकालांचे विश्लेषण करताना, सामाजिक भावनांचा एक नाजूक कंगोरा नजरेआड करून चालणार नाही. केरळच्या जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या शबरीमाला मंदिरातील सोन्याच्या मुलाम्यात झालेल्या कथित गैरव्यवहार किंवा चोरीच्या आरोपांमुळे केरळचे राजकारण ढवळून निघाले आहे. काँग्रेसप्रणीत लोकशाही आघाडी आणि भाजप यांनी या प्रकरणात सत्ताधारी डाव्या आघाडीवर आणि त्रावणकोर देवस्थान समितीवर सातत्याने आरोपांच्या फैरी झाडून मुख्यमंत्री पिनाराई विजयन् यांचे सरकार हे प्रकरण दडपू पाहात असल्याचा आरोप केला आहे. शबरीमाला मंदिर हा भाविकांचा संवेदनशील मुद्दा असल्याने, या मंदिरातील कथित सोनेचौर्य प्रकरणास मिळालेले राजकीय वळण हा मुद्दाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयन् सरकारच्या विरोधातील जनमानसाच्या भावनांना साद घालणारा ठरला. भाविकांच्या संवेदनशीलतेचा मुद्दा या निवडणुकीत उचलला गेल्याने सत्ताधारी डाव्या आघाडीच्या विरोधातील रोष आणि धार्मिक भावनांचा आदर करून मतदारांस आपलेसे करण्याचे भाजपप्रणीत आघाडीचे धोरण यामुळे भाजप आघाडीचा विजय अधिक सोपा झाला. शबरीमाला हे केवळ धार्मिक स्थळ नसून केरळच्या राजकारणातील आस्था आणि संस्कृतीचा केंद्रबिंदू मानला जातो. सोन्याच्या कथित चोरीचा मुद्दा थेट भाविकांच्या भावनांशी जोडला गेला आणि मंदिरांच्या सुरक्षेत डाव्या आघाडीचे सरकार सपशेल अपयशी ठरल्याचा तसेच हिंदू देवतांच्या मालमत्तांचे संरक्षण करण्यात सरकारकडून ढिलाई होत असल्याचा थेट आरोपही केला गेला. साहजिकच, हिंदुबहुल विभागांतील मतदार डाव्या आघाडीपासून व काँग्रेसप्रणीत आघाडीपासून दुरावला आहे. आता या मतदारांच्या धार्मिक भावनांचा आणि देवतांविषयीच्या संवेदनांचा आदर करून आपली कटिबद्धता दाखविण्याची भाजपची जबाबदारी या निकालांमुळे साहजिकच वाढली आहे. राजकारणाच्या जागी राजकारण करावे, ही केरळच्या जनतेची मानसिकता आहेच. त्यामुळेच धार्मिक वृत्ती जपतानाही या राज्याने कम्युनिस्टांच्या हाती सत्ता सोपविली होती. जेव्हा धर्माच्या संदर्भातील संवेदनशील बाबींना धक्का पोहोचल्याचे दिसू लागले, तेव्हा मात्र, समाजाने धार्मिक संवेदनांना महत्त्व दिले हे स्पष्ट झाले आहे. केरळच्या राजधानीत डाव्यांना मिळालेला धक्का हा केवळ स्थानिक निवडणुकीच्या निकालापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांच्यासाठी एक मोठी धार्मिक व राजकीय धोक्याची घंटा ठरला आहे. भाजपच्या दक्षिण दिग्विजयात मंदिर सुरक्षेच्या मुद्याचा मोठा वाटा आहे, हे स्पष्ट झाले आहे

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# चीनच्या नौदलाची धास्ती

गेल्या महिन्यात चीनने त्यांचे 'फुजियान' हे आतापर्यंतचे सर्वांत प्रगत विमानवाहू जहाज लाँच केले. ते मागील दोन जहाजांपेक्षा खूपच प्रगत आहे. 'फुजियान' ही देशातील तिसरी अशी युद्धनौका आहे, जी इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटापल्ट्सने सुसज्ज आहे. ती विमानांना जास्त वेगाने उड्डाण करण्यास सक्षम करते. तज्ज्ञांच्या मते, यामुळे चीन पश्चिम पॅसिफिक भागामध्ये अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्याच्या ध्येयाच्या जवळ येतो. हे जहाज ऐंशी हजार टन वजनाचे आहे. तैवानच्या सर्वांत जवळ असलेल्या चिनी प्रांताच्या नावावरून त्याला 'फुजियान' असे नाव देण्यात आले. ते ७० विमाने वाहून नेऊ शकते. यामध्ये लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर आणि पूर्वसूचना देणारी विमाने समाविष्ट आहेत. ती लांब पल्ल्याच्या धोक्यांचा शोध घेऊ शकतात. ते हवाई संरक्षण प्रणालींचे चांगले समन्वय साधण्यास आणि अचूक हल्ले करण्यास सक्षम आहे. 'फुजियान' हे 'फ्लॅट फ्लाईट डेक' आणि 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' तंत्रज्ञानासह चीनचे पहिले विमानवाहू जहाज आहे. त्यामुळे ते जादा वजनाची विमाने लाँच करू शकते. अधिक इंधन आणि शस्त्रे वाहून नेऊ शकते. जगात फक्त अमेरिकेकडेच ही क्षमता आहे. यामुळे चीनच्या वाहक 'स्ट्राईक ग्रुप'ला एका नवीन पातळीवर नेण्यात आले आहे. ते लिओनिंग आणि शेडोंगला मागे टाकत आहे. चीनमध्ये बनवलेली ही युद्धनौका जड शस्त्रे आणि इंधनाने सुसज्ज विमाने लाँच करू शकते आणि लांब अंतरावरून शत्रूच्या लक्ष्यांना लक्ष्य करू शकते. हे चीनच्या दोन विद्यमान युद्धनौकांपेक्षा अधिक शक्तिशाली आहे. यापूर्वीच्या युद्धनौका लिओनिंग आणि शेडोंग या दोन्ही रशियन मदतीच्या बांधण्यात आल्या होत्या.

दखल घेण्याजोगी बाब म्हणजे या नौका 'फ्लॅट डेक' आणि 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' विमानाच्या टेकऑफ आणि लॅण्डिंग क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ करतात. स्की-जंप प्लॅटफॉर्म असलेल्या डेकवर उड्डाण करताना, वैमानिकांना वजन कमी करण्यासाठी आपली शस्त्रे खाली करावी लागतात. त्यामुळे ऑपरेशनल लवचीकता मर्यादित होते. चिनी माध्यमांनी 'फुजियान'चे वर्णन चिनी नौदलाच्या विकासातला एक प्रमुख टप्पा असे केले आहे. चीनच्या तिन्ही विमानवाहू जहाजांवर डिझेल इंजिन चालतात. त्यामुळे त्यांना वेळोवेळी इंधन भरण्याची आवश्यकता असते; परंतु चीन आता अमेरिकेप्रमाणे 'गनबोट डिप्लोमसी' करू शकेल आणि 'न्यू यॉर्क टाईम्स'ने म्हटल्याप्रमाणे, हे चीनच्या 'बचावात्मक आधुनिकीकरण'वरून 'आक्रमक शक्ती प्रक्षेपण'कडे जाण्याचे संकेत देते. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांनी एक विधान केले. त्यात म्हटले होते की, पॅसिफिक महासागर इतका मोठा आहे की अमेरिका आणि चीन दोघांसाठीही जागा आहे. हे विधान अमेरिकेशी स्पर्धा करण्याची



चीनची महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित करते. शी जिनपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने आपल्या नौदलाचा वेगाने विस्तार केला आहे आणि आता त्यांच्याकडे जगात सर्वांत जास्त जहाजे आहेत. त्यामुळे अमेरिका आणि मित्रराष्ट्रांवर दबाव वाढत आहे. सरकारी माध्यमांनुसार, शी जिनपिंग यांनी स्वतः 'फुजियान'मध्ये 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक कॅटपल्ट' बसवण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियन 'स्ट्रॅटेजिक पॉलिसी इन्स्टिट्यूट'ने 'फुजियान'चे वर्णन जलद-प्रतिक्रिया प्रतिबंधक शक्ती म्हणून केले आहे. ते लढाऊ विमाने तैनात करण्यास आणि जमीन आणि समुद्रातून हल्ले करण्यास सक्षम आहे.

चीन तैवानला आपल्या भूभागाचा भाग मानतो आणि त्याने हा देश कधीही जोडण्याचा आपला हेतू व्यक्त केला आहे. त्यासाठी बळाचा वापर करावा लागला तरी त्याची तयारी आहे. 'फुजियान' तैवानच्या पूर्वेकडील संरक्षण रेषांना धोका निर्माण करू शकते. तथापि, ओकिनावा, दक्षिण कोरिया, गुआम आणि फिलीपिन्स हे अमेरिकन लष्करी तळ चीनला कोणत्याही हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यास सक्षम आहेत. अमेरिकेची सर्व ११ विमानवाहू जहाजे अणुऊर्जेवर चालतात. याउलट, चीनची तीन विमानवाहू जहाजे डिझेल इंजिनवर चालतात. त्यांना वारंवार इंधन भरावे लागते. त्यामुळे त्यांची लढाऊ क्षमता मर्यादित होते. जपानच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डिफेन्स स्टडीज'च्या इटा मोरिकी यांनी ऑक्टोबर २०२५ मध्ये केलेल्या मूल्यांकनात म्हटले आहे की चीनला अजूनही अनेक तांत्रिक आणि मानवी संसाधन आव्हानांना तोंड द्यावे लागते. फुजियान आणि चीनच्या इतर विमानवाहू जहाजांची एकूण लढाऊ क्षमता आणि अनुभव अजूनही अमेरिकेपेक्षा खूप मागे आहे. अमेरिकेचे रिअर ॲडमिरल ब्रेट मियाटस यांनी 'वॉशिंग्टन पोस्ट'ला सांगितले की चीनकडे तीन विमानवाहू जहाजे आहेत तर अमेरिकेकडे ११ आहेत आणि आम्ही हे अनेक दशकांपासून करत आहोत. क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाने विमानवाहू जहाजांचे धोरणात्मक महत्त्व काहीसे कमी केले असले आणि ड्रोन (मानवरहित विमान) साठी एआय तंत्रज्ञान पूर्णपणे विकसित झाले, तर विमानवाहू जहाजे आणखी प्रभावी होऊ शकतात.

चीन चौथे विमानवाहू जहाज बांधत असून भविष्यात अणुऊर्जेवर चालणारा वाहक सादर करण्याची योजना आखत आहे. येत्या काळात अमेरिका आणि चीनमधील नौदल शस्त्रास्त्रांची स्पर्धा आणखी तीव्र होईल अशी भीती तज्ज्ञांना आहे. चीनशी वाढत्या धोरणात्मक स्पर्धेच्या वेळी 'खूप जलद आणि लवकरच' अधिक जहाजे बांधण्याचे आवाहन ट्रम्प यांनी नुकतेच केले. 'आमचा जहाजबांधणी उद्योग सध्या अगदी कमी प्रमाणात आकुंचन पावला आहे,' असे 'मरीन कॉर्प्स'चे कमांडंट जनरल एरिक स्मिथ यांनी गेल्या वर्षीच्या अखेरीस पेंटागॉन येथे दिलेल्या विशेष मुलाखतीत सांगितले होते. ट्रम्प यांच्या घोषणेपूर्वी अनेक महिन्यांपर्यंत अमेरिकन लष्करी आणि उद्योग अधिकाऱ्यांच्या डझनभराहून अधिक मुलाखतींद्वारे अमेरिकन जहाजबांधणी आणि जहाज देखभालीची अशक्त स्थिती आणि त्यांच्यामुळे लष्कराला होणारे धोके पुढे आले होते. अमेरिकेचे नौदल अजूनही अण्वस्त्रशक्ती आणि टनेजच्या बाबतीत जगातील सर्वांत शक्तिशाली मानले जाते; परंतु नौदलाच्या जहाजांची संख्या चीनपेक्षा कमी झाली आहे. अमेरिकेच्या ताफ्यात २९६ जहाजे आहेत, तर चीनच्या जहाजांची संख्या या वर्षी चारशेच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

२०२५ च्या अर्थसंकल्पात सहा नवीन जहाजांना निधी देण्यात आला होता, तर १९ जहाजे काढून टाकण्यात आली होती. उद्योजकांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्याकडे अधिक जहाजे बांधण्यासाठी आणि दुरुस्त करण्यासाठी जागा आहे; परंतु नौदलाचे करार दुर्मिळ आहेत. 'आम्ही जवळजवळ अर्ध्या क्षमतेने काम करत आहोत,' असे 'बीएई सिस्टिम्स शिप रिपेअर'चे उपाध्यक्ष ब्रॅड मोयर म्हणाले. ही कंपनी अमेरिकेतील जहाज दुरुस्तीसाठी सर्वांत मोठ्या कंपन्यांपैकी एक आहे. 'हजारो पुरवठादार व्यवसायाबाहेर गेले आहेत आणि हा एक खरा धोका आहे,' असे 'फेअरबँक्स मोर्स डिफेन्स'चे सीईओ जॉर्ज व्हिटियर यांनी सांगितले. ही कंपनी उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील सर्वांत मोठी इंजिन उत्पादक आहे आणि लष्कराच्या उभयचर युद्धनौकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या सर्वांत मोठ्या इंजिनांचा पुरवठा करणारी एकमेव अमेरिकन कंपनी आहे. 'आपल्याकडे दोन इंजिन पुरवठादार असले पाहिजेत; पण वास्तव असे आहे, की नौदल वर्षाला फक्त सहा जहाजे बांधणार असेल, तर दोन तर सोडाच, एक इंजिन पुरवठादार व्यवसायात ठेवणे ही एक संघर्षाची बाब आहे. आपल्याला यातून बाहेर पडण्याचा मार्ग काढावा लागेल,' असे एका अमेरिकन अधिकाऱ्याचे मत अमेरिकेची हताशा दाखवते.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# वाळू तस्करांना पोलिसी हिसका

वाळू तस्करांकडून महसूल आणि पोलिस अधिकाऱ्यांवर हल्ले होणे, त्यांना धमकावणे आणि सरकारी कामात अडथळा आणणे असे प्रकार महाराष्ट्रात वारंवार घडतात, कारण या व्यवसायात मोठा पैसा गुंतलेला असतो. या हल्ल्यांमध्ये प्रशासनाच्या पथकांवर, अधिकाऱ्यांवर गाड्या चढवणे, शस्त्रांचा वापर करणे, धमकावणे यांसारख्या घटनांचा समावेश असतो. जळगाव, अहमदनगर (श्रीरामपूर), सातारा यासारख्या जिल्ह्यांमध्ये अशा घटना घडल्या आहेत. अवैध उत्खनन व वाहतूक, नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करणे आणि तिची चोरटी वाहतूक करणे ही हल्ल्यांची मुख्य कारणे आहेत.

काही ठिकाणी अधिकाऱ्यांकडून हप्तेखोरी होत असल्यामुळे वाळू व्यावसायिकांचा अधिकाऱ्यांवरचा राग वाढून हल्ले होतात असेही समोर आले आहे. नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथे महसूल विभागाला काळिमा फासणारी घटना घडली आहे. अवैध रेती वाहतूक रोखण्यासाठी गेलेल्या प्रभारी तहसीलदारावरच त्यांच्या हाताखालील तलाठ्याने हल्ला चढवला. महसूल विभागाचा कणा समजला जाणारा तलाठीच जर वाळू तस्करांच्या वतीने तहसीलदारावर हात उगारत असेल तर सामान्यांनी कोणाकडे तक्रार करायची असा प्रश्न निर्माण झाला आहे. या गंभीर प्रकारानंतर तहसीलदार राजेश शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुजोर तलाठी प्रदीप पाटील याच्यावर अर्धापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्यातील वाळू चोरी रोखण्यासाठी पुढील आठवड्यात नवीन वाळू धोरण आणण्यात येणार आहे. नवीन वाळू धोरणात आता महसूल विभागाप्रमाणे पोलिसांना कारवाईचे अधिकार असणार आहेत. तसेच घरकूल बांधणाऱ्यांनी अर्ज केल्यानंतर १५ दिवसांत पाच ब्रास वाळू मिळाली नाही तर संबंधित तहसीलदारांवर कारवाईचा बडगा उगारण्यात येईल, असा इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिला. विधानसभा सदस्य नरेंद्र मेहता यांनी सभागृहात लक्षवेधी सूचना मांडली. भंडारा जिल्ह्यातील तुमसर, भंडारा, साकोली येथे वैनगंगा खोऱ्यातील वाळूला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे या ठिकाणी अनधिकृत वाळू व्यवसायाचा बोलबाला आहे. राज्यातील अनेक भागांत बेकायदा वाळू व्यवसाय फोफावला आहे. त्यामुळे अशा वाळू माफिया व वाळू तस्करीत सहभागी लोकांवर कारवाई करण्यात येणार का असा सवाल आ. नरेंद्र मेहता यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे यांच्या निलंबनाची घोषणा विधानसभेत केली. भंडारा जिल्ह्यातील वाळू डेपोच्या अवैध उत्खननाला जबाबदार धरून उपविभागीय अधिकारी गजेंद्र बालपांडे यांना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच तत्कालीन तहसीलदार यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्वांत मोठा प्रकल्प खडकपूर्णा धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाळूचा उपसा होत असल्याच्या अनेक तक्रारी दिवसेंदिवस वाढत होत्या. परिसरातील नागरिकांनी अवैध रेती उपसा संदर्भात ३०० च्या वर तक्रारी करूनही महसूल प्रशासनाने दखल घेतली नाही. मात्र तक्रार प्राप्त होताच पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांनी दखल घेत खडकपूर्णा धरण क्षेत्रातील वाळू माफियांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने कारवाई केली आहे. अलिकडच्या काळात ही सर्वांत मोठी कारवाई असून जवळपास सात वाळू उपसा करणाऱ्या बोटीसह ९० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई महसूल प्रशासनाने करणे अपेक्षित असताना पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने ही कारवाई केल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वत: अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करून घरकूल बांधकामासाठी रेती उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. त्यामुळे रेती माफियांच्या व्यवसायावर परिणाम झाला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांच्या धडक कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

९८८१७१७८२८

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# कौशल्य विकासाला नवी चालना!

विकसित भारताचे उद्दिष्ट अपेक्षित पद्धतीने साध्य करण्यासाठी केंद्र सरकारने देशांतर्गत कामगार-कारागिरांच्या कौशल्य विकासासाठी ११ प्रमुख मुद्यांवर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला असून, त्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात करण्यात आली आहे. या संदर्भात केंद्र सरकारने राज्यांच्या मुख्य सचिवांना पाठविलेल्या पत्रात राज्यस्तरावर आवश्यक अशा कौशल्य विकास विषयक उपक्रम राबविण्यासाठी राज्यनिहाय कौशल्य गरजांचा अभ्यास करून त्यानुसार, प्राधान्य तत्त्वावर उपाययोजना करण्यासाठी सूचनावजा निर्देश देण्यात आले आहेत, हे विशेष.

या संदर्भात केंद्र सरकारतर्फे प्रामुख्याने नमूद केलेली बाब म्हणजे, कौशल्यपूर्ण काम करणारे कर्मचारी व कारागिरांमध्ये महिलांची अद्याप अपुरी असणारी संख्या व टक्केवारी. यासंदर्भात उत्पादनक्षेत्र व सेवा उद्योगात महिलांच्या कौशल्य प्रशिक्षणाच्या संदर्भात समान अनास्था असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. सरकारी तपशील व आकडेवारीनुसार, सद्य:स्थितीत केंद्र व राज्य सरकारांच्या संयुक्त प्रयत्न आणि पुढाकारातून विविध टप्प्यांवरील व विविध स्वरूपातील २० उपक्रमांच्या माध्यमातून सर्व स्तरांवर कौशल्य विकासासाठी प्रयत्न होत असूनही या प्रयत्नांना अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. या संदर्भात कौशल्य विकासाला अधिक प्रभावी व गतिमान करण्यासाठी पाचव्या राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या पृष्ठभूमीवर केंद्र सरकारने नव्याने व नव्या संदर्भासह पुढाकार घेतला आहे. औद्योगिक व ग्रामीण विकास या उभय क्षेत्रांमध्ये व्यापक प्रमाणात समयबद्ध स्वरूपात कौशल्य विकास साधण्यासाठी केंद्र सरकारच्या विशेषत: कौशल्य विकास, उद्योजकता विकास व ग्रामीण विकास मंत्रालयांनी आता खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली असून, त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध राज्य सरकारांना निर्देश दिले आहेत.

**अपर्याप्त कौशल्य विकास :** देशांतर्गत कौशल्य विकासाच्या पडताळणीत असे आढळून आले आहे की, देशपातळीवर १५ ते २९ वर्षे या विद्यार्थी वयोगटात कौशल्यप्राप्त उमेदवारांचे प्रमाण सध्या देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत केवळ ४.४२ टक्के आहे. तुलनात्मकदृष्ट्या दक्षिण कोरियातील औपचारिक कौशल्यप्राप्त उमेदवारांची टक्केवारी ९६ टक्के, जपानची ८० टक्के, तर जर्मनीतील कौशल्यप्राप्त उमेदवारांचे प्रमाण ७५ टक्के आहे. यावर तातडीने व प्राधान्य तत्त्वावरील उपाययोजना म्हणून राज्य सरकारांना कौशल्यविषयक



पडताळणी घेऊन संबंधित राज्यांमधील गरजांनुरूप मुख्य शिक्षण व शैक्षणिक अभ्यासक्रमाची सांगड कौशल्यविषयक शिक्षणाशी घालण्याचे आग्रही निर्देश देण्यात आले आहेत.

**नव-उद्योगांसाठी नवे कौशल्य :** नव्याने विकसित होणाऱ्या वा प्रचलित व विकसित होणाऱ्या उद्योगांना पूरक ठरून अशा उद्योगांच्या विकासासाठी व त्याचवेळी अशा उद्योगांना पूरक अशा कौशल्यप्राप्त उमेदवारांची सांगड घालण्यावर भर दिला जाणार आहे. या संदर्भात प्रामुख्याने व वानगीदाखल विस्तारित होणाऱ्या हवाई वाहतूक व त्यासाठी आवश्यक.

**उमेदवारांची रोजगारक्षमता वाढविणे :** नव्याने विविध अभ्यासक्रमांसह उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची उमेदवार म्हणून रोजगारक्षमता वाढविण्यावर भर देणे अत्यंत आवश्यक आहे. सद्य:स्थितीत आपल्याकडे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी साधारणपणे ४१ टक्के, तर शासकीय तंत्रनिकेतनमधून पदविकाधारक उमेदवारांपैकी सुमारे २९ टक्के उमेदवारच रोजगारयोग्य असतात.

**कौशल्य विकासामध्ये उद्योगांची भागीदारी :** केंद्र व राज्य स्तरावरील विभिन्न मंत्रालये, शासकीय विभाग, विद्यापीठांतर्गत तंत्रज्ञान-व्यवस्थापन संस्था इत्यादींमध्ये शिक्षणासह कौशल्य विकासासाठी विशेष प्रयत्न करण्याचे उपक्रम व अभ्यासक्रम सुरू होऊनही या प्रयत्नांचा प्रत्यक्ष कौशल्यविकासावर फारसा परिणाम झालेला नाही. यावर अधिक प्रभावी व परिणामकारक उपाययोजना म्हणून या कामी उद्योगांनी पुढाकार घेणे गरजेचे ठरले आहे. त्याशिवाय, विद्यापीठ व शैक्षणिक संस्थांनी उद्योगांची वाढती व बदलती गरज लक्षात घेता, तंत्रज्ञान व शैक्षणिक अभ्यासक्रमातच कौशल्यांचा समावेश करणे आता काळाची गरज ठरली आहे. अशी उपाययोजना करणे राज्य सरकारांनी प्राधान्यक्रमावर हाती घ्यावे, हे मात्र आवश्यक आहे.

**शिक्षण-कौशल्याचा समन्वय :** केंद्र सरकारच्या कौशल्य विकास व शिक्षण विभागातर्फे केंद्र व राज्य या उभय स्तरांवर शिक्षण आणि कौशल्याचा समन्वय साधण्यावर वेळोवेळी भर दिला आहे, याला अधिक गतिमान करण्याची गरज आहे. यासाठी विविध स्तरांवर व गरजांनुरूप शिक्षण - शैक्षणिक वा तंत्रज्ञानविषयक अभ्यासक्रमावर आधारित कौशल्य विकास-विषयक उपक्रम घेऊन त्यांची कालबद्ध स्वरूपात अंमलबजावणी व्हायला हवी.

**कौशल्य विकास प्रयत्नातील सातत्य :** कौशल्य विकास-विषयक प्रयत्नांना केवळ तात्कालिक स्वरूपात व उपक्रम स्वरूपाचे न ठेवता, या प्रयत्नांमध्ये सातत्य आणणे आणि टिकविणे गरजेचे ठरते. यातून उमेदवारांपासून उद्योगांपर्यंतच्या प्रमुख घटकांच्या गरजा पूर्ण होण्यास मदत होईल. अशा प्रकारच्या प्रत्यक्ष कौशल्यवाढीतून रोजगारवाढीला पण चालना मिळेल, हे महत्त्वाचे.

**कौशल्यविषयक प्रशिक्षकांचा अभाव व अपुऱ्या प्रशिक्षण सुविधा :** राज्य व देशपातळीवर आज व आगामी काळातील कौशल्य प्रशिक्षणाच्या गरजा लक्षात घेता, आजच कौशल्यक्षेत्रातील प्रशिक्षणाची वाढती चणचण आहे. विशेषत: विविध संदर्भात कौशल्य विकास हे क्षेत्र परंपरागत व चाकोरीबाहेरील असे क्षेत्र असल्याने त्यासाठी केवळ संबंधित विषयातील पात्रताधारकच नव्हे, तर कौशल्यांचा थेट व प्रत्यक्ष सराव-संबंध असणारे प्रशिक्षक आवश्यक असतात. ही गरज तातडीने पूर्ण करण्याचे काम विशेषतः राज्यस्तरावर पूर्ण व्हायला हवे.

**कौशल्य विकासातील समतोल :** कौशल्य विकासाच्या संदर्भात विचार करताना साधारणपणे तंत्रज्ञानासह व्यवसाय-व्यवस्थापन इ. वरच अधिक भर दिला जातो. मात्र, नव्या मार्गदर्शक सूचनांनुसार, केंद्र सरकारने राज्य सरकारांना कौशल्य विकासासाठी व ग्रामीण व कृषीशी संबंधित कौशल्यांचा समावेश करण्याची महत्त्वपूर्ण सूचना केली आहे, हे विशेष.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-७४

मंगळवार, १६ डिसेंबर २०२५

### सिंधु स्रोत से हिन्दु सिन्धु तक, रहते आये...

सिंधु स्रोत से हिन्दु सिन्धु तक, रहते आये रहते हैं
इस धरती को मां कहते जो, हिन्दू उनको कहते हैं ।

हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं
सम्प्रदाय हो चाहे जो भी, पूजा का कुछ ढंग रहे
प्रांत जाति का प्रश्न नहीं, कुछ काला गोरा रंग रहे
सब समाज से अपनापन हो, सुख-दुःख में नित संग रहे
राष्ट्र देह परिपुष्ट बनाने, जुटे सदा जो अंग रहे
मिलकर बढ़ते चरम शिखर तक, मिलकर संकट सहते हैं
हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं ॥

एक हमारा रक्त, रक्त में, एक भारती धारा है
एक हमारा शील, शील में, एक भरी मर्यादा है
आजादी है बसी प्राण में, प्राण योग से बांधा है
भौतिकता के मस्त गज़ों को, संयम द्वारा साधा है
मानवता के अडिग उपासक, दानवता को दहते हैं
हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं ॥

आज संघ फिर जुटा यत्न में, हिन्दू भाग्य जगाने को
सदियों से संचित कष्टों को, जड़ से खोद मिटाने को
खुला निमन्त्रण सभी सुतों को, माँ की लाज बचाने को
आत्मज्ञान जो करता जाय, रोक नहीं है आने को
भारत माँ में निष्ठा जिनकी, हाथ सभी का गहते हैं
हिन्दू उनको कहते हैं हम हिन्दू उन्हें ही कहते हैं ॥

## राष्ट्रभक्तीची ओळख करून देणे ही जबाबदारी

सध्या संसदेतील चर्चांमध्ये भारतीय युवकांना त्यांच्या 'हिंदू' ओळखीची जाणीव पुन्हा दृढ करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आहे. प्राचीन परंपरेत 'हिंदू' हा शब्द केवळ धर्मनाव नसून उत्तम गुणांचा स्वीकार आणि दुर्गुणांचा त्याग अशी जीवनमूल्ये सांगणारी संकल्पना आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सिंधूपासून कन्याकुमारीपर्यंतच्या भारतभूमीला 'पितृभूमी' आणि 'पुण्यभूमी' मानणाऱ्यांना हिंदू म्हटले आहे. परंतु आजच्या राजकीय आणि सामाजिक वातावरणात 'हिंदू राष्ट्र' हा शब्द चर्चेतून लोप पावत असून, जातीय राजकारण व इतिहासाच्या विकृत सादरीकरणामुळे युवकांमध्ये संभ्रम निर्माण होत असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत त्यांना आपल्या संस्कृतीची, परंपरेची आणि राष्ट्रभक्तीची ओळख करून देणे ही गरज नव्हे तर जबाबदारी ठरते. हनुमंताला जामवंतांनी जशी शक्तीची जाणीव करून दिली, तशीच जाणीव आज युवकांना करून देणे काळाची मागणी आहे. 'वंदे मातरम्' म्हणताना जागणारी मातृभूमीविषयीची निष्ठा पुढील पिढीपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे.

**रमा देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### संसदेतून 'वॉकआऊट' हा पळपुटेपणा

काँग्रेसची व एकूणच विरोधी पक्षांची ही वारंवार सवय झाली आहे 'वॉकआऊट'. खरे म्हणजे आता यांना 'वॉकआऊट' केव्हा करणे योग्य ठरते हेही शिकावे लागेल. आपण वारंवार निवडणुका हरत आहोत आणि संख्या घटत आहे याचा जराही विचार हा विरोधी पक्ष व खास करून काँग्रेस करत नाही. महाराष्ट्रात तर उबाठा हा कट्टर हिंदुहृदय म्हणवणारा पक्ष आज सोनियांच्या मागे फिरत आहे. पूर्वजांनी कमावलेले टिकवणे याला सुद्धा हुशारी लागते, ती पण हरवली आहे. पुढची पिढी 'पेग्वीन'सारखी थंड प्रदेशात जाते की काय असे वाटते. काही वर्षांपूर्वी काँग्रेसच नेते मणिपूर... मणिपूर... पंतप्रधान काहीच बोलत नाही असे ओरडत राहिले. आणि एक दिवस ठरवून तब्बल दीड तास मोदी केवळ मणिपूर हाच विषय घेऊन बोलले होते व तेव्हा काँग्रेसचे सर्व नेते आधीच वॉकआऊट करून गेले होते. राहुल गांधी तर पत्रपरिषदेत, मला संसदेत बोलू देत नाही असे म्हणतात अन् त्यांच्या राजकीय सल्लागाराने लिहून दिलेले तेवढेच बोलतात. स्वत:चे काहीच नाही. त्यांची बहीण आपल्या भावाची बाजू घेते, पण त्याला ''थोडे शिक'' असेही म्हणत नाही. संसदेचे प्रत्येक अधिवेशन हे केवळ काँगेसमुळेच बिनाचर्चेचे व वाया जाते. यासाठी काँग्रेसला जबर दंड व्हायला हवा. यावेळी पण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना चार प्रश्न विचारण्यात आले होते. त्याचे उत्तर देण्याच्यावेळी नेमके विरोधी पक्षांनी वॉकआऊट केला. आता बाहेर बोलताना म्हणतील, ''अमित शाह डर गये, मेरे सवाल का जवाब नहीं दिया'' वगैरे. भारतीय जनतेने अमित शाह यांचे भाषण पूर्ण ऐकले आहे. त्यामुळे कितीही आरडाओरड यांनी केली तरी काँग्रेसकडे कोण लक्ष देणार? एक पूर्वज कमवतो आणि नंतर चार पिढ्या त्यांच्याच नावावर जगतात हे आपण बघितले आहे. त्यामुळे उत्तर ऐकून घेण्याचा धीर, संयम विरोधी पक्षनेत्यात असावा. एकूणच विरोधकांनी केवळ मोदी विरोध न करता देशासाठी जे काही चांगले मोदी करतात त्याला पाठिंबा द्यावा. अन्यथा जनतेने त्यांना सत्तेतून तसेही 'वॉकआऊट' केले आहेच व असेच वागत राहिले तर 'फूट'आऊटही करण्याची ताकद आहे.

**मनोज वैद्य**/९८२२१९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# योगदानातूनच मराठी साहित्याची ऊर्जा टिकून : भारत सासणे

## मसाप कृतज्ञता सोहळ्यात सोलापूरच्या ॲड.जे.जे. कुलकर्णी यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे दि. १५ डिसेंबर-**

महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या कृतज्ञता सोहळ्यात, साहित्य आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी नव्या पिढीने पुढे येण्याची आवश्यकता असल्याचे मत ज्येष्ठ साहित्यिक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी उपस्थित ज्येष्ठ साहित्यसेवकांच्या अमूल्य योगदानाचा गौरव यावेळी करण्यात आला. मसापच्या माधवराव पटवर्धन सभागृहात हा कृतज्ञता सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी होते.



श्री. सासणे म्हणाले, साहित्य हा समाजाचा आत्मा आहे. मसापने आजपर्यंत अनेक साहित्य चळवळींना दिशा दिली आहे. आज ज्या ज्येष्ठ साहित्य सेवकांचा सत्कार झाला आहे, त्यांचे कार्य नितांत आदरास पात्र आहे. त्यांनी निष्ठेने केलेली साहित्यसेवा नवीन पिढीसाठी आदर्श आहे. मराठी भाषेची ज्योत अखंड तेवत ठेवण्याची जबाबदारी नव्या पिढीवर आहे. केवळ लेखन नाही, तर वाचनाची संस्कृती वाढीस लागावी. साहित्य सेवकांच्या योगदानातूनच मराठी साहित्याची ऊर्जा टिकून राहिली आहे.

अध्यक्षीय समारोप करताना मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी साहित्यसेवेला 'साधना' असे संबोधले. ते म्हणाले, साहित्यसेवा ही एक साधना आहे, जी भाषेवर आणि संस्कृतीवर असलेल्या निस्सीम प्रेमातून सिद्ध होते. ज्येष्ठ वाङ्मयसेवकांनी आपल्या अनुभवाने आणि कार्यनिष्ठेने मसापच्या कार्याला नवी दिशा दिली आहे. मसाप ही संस्था केवळ जुन्या परंपरेचे संरक्षण करत नाही, तर नवोदितांना व्यासपीठ देऊन मराठी साहित्याला समृद्ध करण्याचे काम करत आहे.

या सोहळ्यात कार्यकारी मंडळातील ज्येष्ठ वाङ्मयसेवक सर्वश्री रवींद्र बेडकिहाळ फलटण, प्रा. सोपानराव चव्हाण पाटण, प्राचार्य तानसेन जगताप चाळीसगाव, डॉ. शशिकला पवार वर्धा, पद्माकर शिरवाडकर ठाणे, डॉ. सतीश देसाई पुणे, ड. जे. जे. कुलकर्णी सोलापूर, रावसाहेब पवार सासवड, चंद्रकांत पालवे अहिल्यानगर, आणि प्रकाश देशपांडे रत्नागिरी, यांचा भारत सासणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याचवेळी फलटणचे अमर शेंडे लिखित 'सह्याद्रीची सावली' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मसापचे प्रमुख कार्यवाह सुनीता राजे पवार यांनी केले तर मसापचे कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी आणि यांनी आभार प्रदर्शन केले. या समारंभाला महाराष्ट्र साहित्य परिषद पुण्यातील सर्व कार्यवाह सोलापूर जिल्ह्याचे प्रमुख पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे, राजन लाखे, पुरुषोत्तम काळे आदी उपस्थित होते.

---


## महत्वाचे...



### गोविंदश्री ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेच्या सभासदांचा अमृत महोत्सव सोहळा

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

गोविंदश्री ज्येष्ठ नागरिक सेवा संस्थेने ७५ पूर्ण केलेल्या सभासदांचा अमृतमहोत्सव २०२५ या कार्यक्रमांमध्ये पंढरीनाथ लुंगारे ८१ वर्ष, अशोक तारापुरे ८० वर्ष, रमाकांत देशपांडे ७९ वर्ष, प्रभाकर ढोबळे, ८० वर्ष, विजयसिंह बायस ७९ वर्ष अशोक भोसले ७६ वर्ष, विठ्ठल गरड ७६ वर्ष, अशोक मराठे ७६ वर्ष, मोहम्मद हुसेन शेख ७५ वर्ष या ज्येष्ठांचा सन्मानचिन्ह, शाल, बुके देऊन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास व सोलापूर महापालिका माजी स्थायी समिती सदस्य शिवलिंग कांबळे यांचे हस्ते गौरव करण्यात आला. ज्येष्ठ नागरिक पोहण्याच्या स्पर्धेत सोलापूर जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष गुरुलिंग कन्नोरकर यांनी प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. तसेच संस्थेस देणगी देणारे देणगीदार सभासद, चत्रवीर सड्डू पंढरीनाथ लुंगारे, अनिल शेट्टी, विजयकुमार राऊत यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी साहित्यिक प्रा. डॉ. राजेंद्र दास यांनी ज्येष्ठ नागरिक म्हणजे उतरतीउन्हे या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी सोलापूर स्वातंत्र्य चळवळीचे दैदिप्यमान इतिहास ग्रंथ निर्मिती कार संजय जोगी पेठकर, कविवर्य मारुती कटकधोंड, कविवर्य गोविंद काळे जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ अध्यक्ष रमाकांत साळुंके उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष भगवानराव काशिद, उपाध्यक्ष अनिल हिरशेट्टी, सचिव विजयकुमार राऊत सहायक सचिव प्रल्हाद हटकर, कोषाध्यक्ष रवींद्र कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. उपाध्यक्ष अनिल हिरशेट्टी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर काळे यांनी केले.



### मध्य रेल्वे सोलापूर विभागाने वाहिली डॉ. आंबेडकर यांना आदरांजली

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने भारतीय संविधानाचे शिल्पकार, समता आणि सामाजिक न्यायाचे जागतिक प्रतीक भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी श्रद्धेने आणि सन्मानाने आदरांजली वाहिली. सोलापूर रेल्वे विभागातील विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयात श्रद्धांजली समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार आणि मुख्य प्रकल्प व्यवस्थापक शैलेंद्र सिंह परिहार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली.

### प्रा. संध्या इंगळे यांना समाजरत्न पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

वंचित बहुजन कामगार संघटना कोल्हापूर जिल्ह्यावतीने शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रा. संध्या आत्माराम इंगळे यांना 'समाजरत्न पुरस्कार २०२५' देऊन गौरविण्यात आले. अर्थशास्त्र विभाग, सी. बी. खेडगीजब कॉलेज अक्कलकोट, जि. सोलापूर येथे मागील पंधरा वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात भरीव आणि उल्लेखनीय कार्य करीत आहेत. ग्रामीण भागातील वंचित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी केलेले अभिनव उपक्रमामुळे अनेक विद्यार्थी घडले आहेत आणि समाजाच्या प्रगतीला हातभार लागला आहे.

---


## CHANGE IN NAME

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Najumma Ibrahim Mulla** HAS BEEN CHANGED TO **Najma Shamshoddin Sayyad** Resi. - Budhale Galli, 87, West Mangalwar Peth, Solapur

**KINDLY NOTE**

**THE SAME. (58921 Dtd.05.12.2025)**



## सोलापुर महानगरपालिका, सोलापुर

'इंद्रभुवन' पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापुर - ४१३ ००१
Mail Id - smcasstlight@gmail.com

### जाहीर प्रसिध्दीकरण

विद्युत विभाग सो.म.पा.कडून 1) Tender ID:- 2025_SMC_1260099_1- सो.म.पा. सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ करीता मतदान केंद्र व मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कक्ष येथे विद्युत व्यवस्था करणे. 2) Tender ID:- 2025_SMC_1259930_1- सो.म.पा. सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ करीता मतमोजणी केंद्र येथे तात्पुरत्या स्वरुपात विद्युत व्यवस्था, स्पीकर व्यवस्था करणे. कामाचे दि. १५/१२/२०२५ रोजी महाराष्ट्र शासन संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in ई निविदा मागविण्यात येते आहे.

निविदा भरण्याची अंतिम तारीख - २०/१२/२०२५
निविदा उघडण्याची तारीख - २२/१२/२०२५

सही/-
**अति. आयुक्त**
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



## उत्तम सेवा — मंगळवार दि. १६ डिसेंबर २०२५ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **१)** | **मुंबई उच्च न्यायालय, BHC** | | | |
| १ | शिपाई (८८७ पदे) | सातवी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | ३८ पर्यंत | ०५/०१/२६ |
| २ | लिपीक (१३३२ पदे) | पदवी व इंग्रजी ४० टायपिंग उत्तीर्ण व MS-CIT कोर्स उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| ३ | वाहनचालक (३७ पदे) | दहावी व हलके वाहन परवाना तसेच ३ वर्षे अनुभव आवश्यक | ३८ पर्यंत | |
| ४ | लघुलेखक (७५ पदे) | पदवी व टायपिंग - स्टेनो उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |
| **२)** | **राष्ट्रीय संरक्षण व नौदल अकॅडमी, NDA & NA** | | | |
| १ | NDA & NA (३९४ पदे) | बारावी उत्तीर्ण किंवा ॲपिअर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | १९ पर्यंत | ३०/१२/२५ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला "जॉईन" असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| **३)** | **केंद्रीय लोकसेवा आयोग, UPSC** | | | |
| १ | संयुक्त संरक्षण सेवा परिक्षा CDS 2026 (४५१ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार किंवा पदवी ॲपिअर असावे. | २३ पर्यंत | ३०/१२/२५ |
| **४)** | **महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, MJP** | | | |
| १ | लिपीक (४६ पदे) | पदवी व इंग्रजी/मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | १९/१२/२५ |
| २ | क. अभियंता (१६० पदे) | डिप्लोमा (सिव्हिल/मेकॅ/ऑटो) | ३८ पर्यंत | |
| ३ | सहा. भांडारपाल (१३ पदे) | दहावी व इंग्रजी/मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी कंपनीत (प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा** — १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१.

www.uttamseva.org



## जाहीर नोटीस

सोलापूर शहरातील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि व सब डि सोलापूर पैकी महानगरपालिका सोलापूर शहर हद्दवाढ मधील ता. उत्तर सोलापूर मजरेवाडी येथील विभाग क्र. ३३/१२३ मधील जुना सर्व्हे नं. २२९/३ नविन सर्व्हे नं. २५/३/३ यापैकी नियोजित विजय नगर (ओम अवंती नगर) या नावाने ओळखले जाणारे प्लॉटनं. ५५ व ५६ यांचे क्षेत्र व हद्द पुढील प्रमाणे :

| प्लॉट नं. | हद्द पुर्वपश्चिम × दक्षिणोत्तर = | क्षेत्र चौ.मी | चौ.फुट |
|---|---|---|---|
| ५५ | २२ मीटर × २० मीटर = | ४४० | ४७३४.४० |
| ५६ | २२ मीटर × २० मीटर = | ४४० | ४७३४.४० |
| | | **८०० चौ.मी** | **९४६८.८० चौ. फुट** |

एवढा क्षेत्र मी तुम्हांस या कुलमखत्यार दस्ताने लिहून दिले होते.

वर नमूद मिळकत ही श्री. राजेश किसन सावंत यांना आमचे अशिल सौ. प्रमिला तुपलवंडे (नंदुरकर) यांनी दि. २२/०१/२०२५ रोजी नोटरी करून दिलेला होता. राजेश सावंत हे सामाजिक कार्यकर्ते व पोलिस मित्र संघटनेचे जिल्हा अध्यक्ष असल्यामुळे आमचे अशिलास ते विश्वासपात्र वाटल्यामुळे त्यांना वरील नमुद मिळकतीचे काम करण्याकरीता कुलमुखत्यारपत्र दिलेले होते. परंतु आजतागायत कुलमुखत्यार पत्रात नमुद केलेले कोणतेही काम केलेले नाही व तसेच चौकशी केल्यावर त्यांना आमच्या अशिलांच्या हिता विरुध्द काम करीत आहे असे आमच्या अशिलास समजले त्यामुळे हे आमचे अशिलांचे विश्वासपात्र राहिले नाही. याची आमची अशिलांना खात्री झाल्याने आमचे अशिल राजेश किसन सावंत यांना दि. २२/०१/२०२५ रोजी दिलेला कुलमुखत्यार पत्र रद्द केलेला आहे. त्याबद्दलची राजेशी सावंत यांना नोटीसही दिलेली आहे यापुढे वर नमुद मिळकतीबद्दल नोटरी मध्ये नमुद केलेले काम करण्याचे अधिकार रद्द केलेले आहे. त्यामुळे सदरचे राजेश सावंत यांनादिलेले नोटरीच्या आधारे कोणतेही प्रकारचे त्यांच्याशी व्यवहार करूनये केल्यास ते आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची जाहीर नोटीसीने कळवण्यात येते की, लोकांची फसगत होऊ नये व राजेश सावंत यांच्याशी वर नमुद कुलमुखत्यारपत्रा आधारे कोणत्याही प्रकारचा व्यवाहार त्यांच्याशी करू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे.

ही जाहीर नोटीस दिली ता. १५/१२/२०२५

**सही/-**
**ॲड.आर.ए. बागबान,**
**बी.ए.एलएल.बी,**
**रा. ४१२/१०, लक्ष्मी नगर, लिमयेवाडी, सोलापूर,**
**मो.नं. ९४२२४६०६३६ / ७९७२३९९०३५**
**ऑफिस पत्ता : १३१, सिध्देश्वर पेठ,**
**कोर्ट कंपाऊंड लगत, सोलापूर-४१३००३.**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी बार्शी शहर व आसपासचे परिसरातील लोकांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१) **मिळकतीचे वर्णन :-** डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु. पल हद्दीतील जमीनीतील प्लॉट गट नं. ८६५/१ यापैकी पुर्व बाजुचा संपुर्ण प्लॉट याचे ७/१२ रेकॉर्डप्रमाणे क्षेत्रफळ १८५.00 चौ.मी. व खरेदीखतानुसार याचे क्षेत्रफळ १८५.३८ चौ.मी., असा संपुर्ण खुला प्लॉट. यासी चतुःसिमा **पूर्वेस-** नारायणकर यांचा प्लॉट, **दक्षिणेस-** वायकुळे यांची मिळकत, **पश्चिमेस-** सदर नंबरपैकी उर्वरीत प्लॉट व उत्तरेस २0.00 फुट रुंदीचा रस्ता, सदर प्लॉटची पाणी व वागणुक ही उत्तर बाजुच्या रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाचा प्लॉट आतील दगड-माती, झाड-झुडुप, वगैरे सर्व तदंगभूत वस्तुसह, मालकी, कब्जे वहिवाटीच्या हक्कासह प्लॉट.

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेला प्लॉट हा श्री. अतुल ज्ञानदेव कानकात्रे, रा. पाटील प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी, ता. बार्शी यांनी श्री. धनाजी केशव चोबे, रा. सिरसाव, ता. परंडा, जि. धाराशिव यांचेकडुन दि. १0/0६/२0२0 रोजी नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. बरस १८८३/२0२0 अन्वये खरेदी केलेला असून, सदर मिळकत श्री. अतुल ज्ञानदेव कानकात्रे यांचे स्वकष्टार्जीत मालकीची असून, मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. मिळकत मालक श्री. अतुल ज्ञानदेव कानकात्रे यांनी वर नमुद मिळकत आमचे अशिल श्री. संजय शहाजीराव पाटील, रा. बार्शी यांना योग्य त्या बाजारभाव किंमतीने खरेदी देण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकत विक्रीबाबत उभयंतामध्ये तोंडी करार झालेला आहे. सदर मिळकत स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १५/१२/२०२५.

**सही/-**
**अशिल**

**सही/-**
**ॲड. प्रशांत पांडुरंग एडके**
B.S.L., LL.M.
कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,
खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.
मो. नं. ७३८५११०१८५/९८२२८१६४७८



## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अ.नं. १३२/२०२५
पुढील नेमली ता. २१/१/२०२५
नि-५

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठस्तर यांचे न्यायालयात

१) **श्रीमती मेघा दत्तात्रय कुलकर्णी,** वय ५७ वर्षे, धंदा-शेती, नोकरी, रा. पिंपळगांव (धस), ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सागर दत्तात्रय कुलकर्णी,** वय ३१ वर्षे, धंदा-नोकरी व शेती, रा. सदर — **-- अर्जदार**
३) **मंथन दत्तात्रय कुलकर्णी,** वय २६ वर्षे, धंदा-शेती/नोकरी.रा. सदर

**विरुध्द**

कोणी नाही — **-- सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ही अर्जदार अर्जदार नं. २,३ यांची आई आहे. अर्जदार नं.१ च्या पतीची बहिण म्हणजे अर्जदार नं. २ व ३ यांची आत्या नामे जमुना जनार्धन कुलकर्णी ही होती त्या दि. ९/११/२०१७ रोजी मौजे पिंपळगांव (धस) ता.बार्शी येथे मयत झालेल्या आहेत. तसेच तिचे पती जनार्धन रामचंद्र कुलकर्णी हे ही ता.१५/१२/२००७ रोजी पिंपळगांव (धस) ता.बार्शी येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं. २ व ३ यांचे वडिल म्हणजे अर्जदार नं.१ यांचे पती ही दत्तात्रय जनार्धन कुलकर्णी हे दि. ३०/१२/२००० रोजी मयत झालेले आहेत. मयत जमुना जनार्धन कुलकर्णी हि मृत्यूसमयी अविवाहीत होती त्यामुळे अर्जदार हेच मयत जमुना जनार्धन कुलकर्णी यांचे वारस आहेत. अर्जदार यांनी तसेच अर्जदार नं.१ चे पती म्हणजेच अर्जदार नं.२,३ यांचे वडिल यांनीच मयत जमुना जनार्धन कुलकणों यांची अखेरपर्यन्त सेवाशुश्रुषा केलेली आहे मृत्यूपश्चातचे सर्व धार्मिक कार्यक्रम देखील केलेले आहेत मृत्यूसमयी मयत जमुना जनार्धन कुलकर्णी हिचे कायम स्वरुपी वास्तव्याचे ठिकाण मौजे पिंपळगांव (घस), ता.बाशी हेच होते. मयतास अर्जदारच एकमेव कायदेशीर वारस असून अर्जदाराशिवाय मयतास अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना त्यांचे शासकीय, निमशासकीय व कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता हेअरशिप/वारस प्रमाणपत्राची गरज भासली परंतु ते अर्जदारांकडे नसलेने अर्जदारांना अनेक अडचणीस सामोरे जावे लागलेले आहे, लागत आहे, असे सांगितले असे कथन करुन अर्जदाराने हेअरशिप वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे कांही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधीतानी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमले तारखेस में कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे तारीखः ११/१२/२०२५

**सही/-**
**वरिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**

**सही/-**
**सहा, अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर, बार्शी**



## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १२१६२३२५१ | मालमत्ता तारण कर्ज | १. जगदीश दिलीप पाटील<br>२. वैभव दिलीप पाटील | २६.११.२०२५ | रुपये १०,३३,१०९.१६/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिळकत क्र. १५३२/१ चे सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण १०८९ चौ. फुट, गावात वसलेलेः महुद , ग्रामपंचायतीच्या मर्यादितः महुद बुद्रुक ., तालुकाः सांगोला, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०६, आणि सीमाः पूर्वः ग्रामपंचायत रोड, पश्चिमः कालवा, उत्तरः अरविंद नारायण पाटील, दक्षिणः विलास नारायण पाटील | | | | | |
| 2 | १२५३०८५२४ | मालमत्ता तारण कर्ज | १.सिद्राम महादेव मदने<br>२. सुरेखा सिद्राम मदने | २६.११.२०२५ | रुपये १०,५०,५४८.१६/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत पुळुजवाडीच्या रजिस्टरमध्ये मालमत्ता क्रमांक २३ येथे नोंदणीकृत असलेल्या मालमत्तेचा/घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ १४०० चौरस फूट, दगड, विटा आणि कॉंक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ १०५०.०० चौरस फूट आहे, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १०५०.०० चौरस फूट, गावः पुळुजवाडी, तालुकाः पंढरपूर, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४ येथे स्थित आहे, आणि अशा प्रकारे सीमाः पूर्वः रस्ता, पश्चिमः मिळकत क्रमांक २२, उत्तरः रस्ता, दक्षिणः मिळकत क्रमांक २१ | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : १६/१२/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**



## SJSB सोलापूर जनता सहकारी बँक लि.

Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी-स्टेट शेड्युल्ड कोऑप. बँक

गगनभरारी, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३००७
फोन क्र.: ०२१७-२७४ ११०१ ते ०५
ई-मेलः info@sjsbbank.com. वेबसाईटः www.sjsbbank.com

(नमुना 'झेड')
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम १०७ [११ (ड-१)] नुसार

### स्थावर मालमत्तेची ताबा नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली व विक्री अधिकारी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** (मल्टी स्टेट शेड्युल्ड को-ऑप. बँक) यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये अधिकार प्राप्त असून, यांना म. स. सं. नियम, १९६१ अन्वये कलम १०७ (३) नुसार **दि. ०४/११/२००४** रोजी मागणी नोटीस थकबाकीदार धारासिंग मोहनसिंग राजपूत जामीनदार १) प्रतापसिंग किरणपालसिंग ठाकूर २) दत्तूसिंग मोहनसिंग राजपूत यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली **रक्कम रु. १९,००,३४२/- (अक्षरी रुपये एकोणीस लाख तीनशे बेचाळीस मात्र) आणि त्यावरील दि.०४/११/२००४** पासूनचे १८% प्रमाणे व्याज, सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून कर्जदाराने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, खाली सही करणाऱ्याने **दि. २८/०१/२०२२** रोजी खालील नमूद स्थावर मालमता जप्तीची नोटीस दिली असून, त्यावर बँकेचा जप्ती बोजाची नोंद आहे. कर्जदाराने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, कर्जदार व जामीनदार व गहाणकार यांना याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमतेचा खाली सही करणाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ [११(ड-१)] अन्वये दिलेल्या अधिकारानुसार **दि. ०२/१२/२०२५** रोजी गहाणकार यांचे मालकीची परंतु बँकेने जप्त केलेली स्थावर मालमत्तेचा **प्रतीकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेषकरून कर्जदार व जामीनदार यांचे वारसदार आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खालील मालमत्तेसंबंधी कोणताही (खरेदी-विक्री अथवा हस्तांतरण) व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कर्जदार यांची दि.३०/११/२०२५ अखेरची व्याजासह एकूण येणेबाकी **रक्कम रु. २,१४,८२,६१२.०० (अक्षरी रुपये दोन कोटी चौदा लाख ब्याऐंशी हजार सहाशे बारा मात्र) आणि त्यावरील दि. ०१/११/२०२५** पासूनचे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**जप्त स्थावर मालमत्तेचे वर्णन**

कर्जदार श्री धारासिंग मोहनसिंग राजपूत यांचे मालकीची मौजे मंगळवेढा ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथील गट न. २९९५/२/अ/१ याचे क्षेत्र १.४५ हे.आर. (आज मितीस ०.९८ हे.आर.) ही स्थावर मालमत्ता बँकेचे वसूली व विक्री अधिकारी यांनी थकीत रक्कम वसूलीपोटी जप्त केली असून त्यांवर बँकेचा जप्ती बोजाची नोंद आहे.

दिनांक : १६/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर

शिक्का

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**( मल्टी स्टेट शेड्युल्ड को- बँक)**



## SJSB सोलापूर जनता सहकारी बँक लि.

Multi-State Scheduled Coop.Bank
मल्टी-स्टेट शेड्युल्ड कोऑप. बँक

गगनभरारी, शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर ४१३००७
फोन क्र.: ०२१७-२७४ ११०१ ते ०५
ई-मेलः info@sjsbbank.com. वेबसाईटः www.sjsbbank.com

(नमुना 'झेड')
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम १०७ [११ (ड-१)] नुसार

### स्थावर मालमत्तेची ताबा नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली व विक्री अधिकारी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** (मल्टी स्टेट शेड्युल्ड को-ऑप. बँक) यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये अधिकार प्राप्त असून, यांना म. स. सं. नियम, १९६१ अन्वये कलम १०७ (३) नुसार **दि. ०४/११/२००४** रोजी मागणी नोटीस थकबाकीदार धारासिंग मोहनसिंग राजपूत जामीनदार- १) गुलाबसिंग भरतसिंग राजपूत २) प्रतापसिंग किरणपालसिंग ठाकूर ३) दत्तूसिंग मोहनसिंग राजपूत, यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली **रक्कम रु. २,७३,२३४/- (अक्षरी रुपये दोन लाख त्रयहत्तर हजार दोनशे चौतीस मात्र) आणि त्यावरील दि.०४/११/२००४** पासूनचे १८% प्रमाणे व्याज, सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून कर्जदाराने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, खाली सही करणाऱ्याने **दि. ०१/०१/२००५** रोजी खालील नमूद स्थावर मालमता जप्तीची नोटीस दिली असून त्यावर बँकेचा जप्ती बोजाची नोंद आहे.

कर्जदाराने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, कर्जदार व जामीनदार व गहाणकार यांना याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ [११(५-१)] अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. ०२/१२/२०२५ रोजी गहाणकार यांचे मालकीची परंतु बँकेने जप्त केलेली स्थावर मालमत्तेचा **प्रतीकात्मक ताबा** घेतला आहे.

विशेषकरून कर्जदार व जामीनदार यांचे वारसदार आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खालील मालमत्तेसंबंधी कोणीही कोणताही (खरेदी-विक्री अथवा हस्तांतरण) व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कर्जदार यांची दि.३०/११/२०२५ अखेरची व्याजासह एकूण येणेबाकी **रक्कम रु. ८४,४१,७०४.०० (अक्षरी रुपये -चौऱ्याऐंशी लाख एकेचाळीस हजार सातशे चार मात्र) आणि त्यावरील दि. ०१/११/२०२५** पासूनचे व्याज याला अधीन राहावे लागेल.

**जप्त व तारण स्थावर मालमत्तेचे वर्णन**

कर्जदार श्री धारासिंग मोहनसिंग राजपूत यांचे मालकीची (सौ. जयश्री दौलतसिंग राजपूत यांचे नांवे हस्तांतरण केलेले आहे.) मौजे व ता. मंगळवेढा जि. सोलापूर येथील शेतजमीन गट न. २९७७ याचे क्षेत्र २.०१ हे.आर. ही रजि. गहाण खताने तारण आहे. सदर स्थावर मालमत्ता बँकेचे वसूली व विक्री अधिकारी यांनी थकीत रक्कम वसूलीपोटी जप्त केली असून त्यांवर बँकेचा जप्ती बोजाची नोंद आहे.

दिनांक : १६/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर

शिक्का

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**( मल्टी स्टेट शेड्युल्ड को- बँक)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विविध शाळांत क्रीडा सप्ताह



**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

शहरातील विविध शाळांत क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला.

### श्री आंध्र भद्रावती विद्यालयात

श्री आंध्र भद्रावती माध्यमिक विद्यालयामध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्‌घाटन ज्ञानविकास शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी व्यंकटेश दुडम, डॉ. अविनाश खासंडेकर यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करुन झाले. यावेळी कैलास चौधरी, कपिल गायकवाड, प्रविण कोंडा, प्रशालेचे म ाजी मुख्याध्यापिका भंडारे होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सहशिक्षिका कांचना आरकेल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक मल्लिकार्जुन मोरड व स्टाफनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नागप्पा मानकर यांनी केले. खंडू भोसले यांनी आभार मानले.

### बटरफ्लाय स्कूल

बटरफ्लाय इंग्लिश मिडीयम स्कूल येथे क्रीडा महोत्सवाचे उद्‌घाटन क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड व आण्णाप्पा काडादी प्रशालेचे मुख्याध्यापक अनिल पाटील यांनी केले. संस्थेचे उपाध्यक्ष व्ही.जे. देवणीकर अध्यक्षस्थानी होते. मुख्याध्यापिका डॉ. रश्मी कुंभार व रश्मी पूर्वत यांच्या अधिपत्याखाली हा कार्यक्रम यशस्वी झाला. सूत्रसंचालन साधना पाटील यांनी केले. प्रास्ताविक व स्वागत सिमरन मुल्ला यांनी केले. पाहुण्यांच्या परिचय स्वप्ना शिंदे यांनी करुन दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रीडाशिक्षक रफिया लंगोटे व आरती मलजी यांचे योगदान लाभले.

### महात्मा विद्या मंदिर

महात्मा विद्या मंदिरात क्रीडा सप्ताहाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थासचिवा तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा चौगुले तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख स्वप्नील चाबुकस्वार, संचालक नागराज चौगुले, सोमनाग प्रशालेचे मुख्याध्यापक शहाजी नीळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात प्रतिमा पूजनाने करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### जय भारत प्राथमिक शाळा

जय भारत प्राथमिक शाळेत खासदार प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त क्रीडा सप्ताहाचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रम ाचे अध्यक्षस्थानी परिवहनचे माजी सभापती बसवराज म्हेत्रे यांनी स्विकारले. प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव सिद्राम फुले, सचिव दिपक फुले, हणमंतु सायबोळू, दिनेश म्हेत्रे, मारुती कुमार, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते मशाल पेटवून, मैदानाचे पूजन करुन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी संचलनाद्वारे मानवंदना दिली. प्रास्ताविक कविता लेंगरे यांनी केले. सत्रसंचालन रेश्मा म्हेत्रे यांनी केले तर आभार शांता कोळी यांनी मानले.



### सम्राट अशोक शिक्षण संकुल

रामवाडी परिसरातील सम्राट अशोक युवक मंडळ संचलित, सम्राट अशोक बालक मंदिर, सम्राट अशोक मराठी विद्यालय, यशोधरा प्रशाला, यशोधरा उच्च माध्यमिक विद्यालय, यशोधरा शिशु अध्यापिका विद्यालय येथे शालेय क्रीडा सप्ताहास सुरवात झाली. संस्थेच्या सचिवा विमल सुतकर, महाराष्ट्र राज्य कबड्डी महिला संघ असोसिएशन सदस्य अंबादास गायकवाड, प्राचार्य सुबोध सुतकर, मुख्याध्यापक शिवानंद डुणगे, क्रीडा शिक्षक सुधीर वाघ, कविता पाटील, सुवर्णा भांगे आदींच्या हस्ते याचे उद्धाटन झाले. श्री. गायकवाड यांनी खेळ मनापासून खेळा, नियम पाळा, प्रतिस्पर्ध्याचा आदर ठेवा आणि विजय-पराजय दोन्हीही समतेने स्वीकारा असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधीर वाघ यांनी केले. सुत्रसंचालन प्रियंका कांबळे यांनी केले. शांतिप्रिया गाडेकर यांनी आभार मानले.

# गिल, सूर्या टी-२० विश्वचषकात चमकदार कामगिरी करतील

## अभिषेक शर्माला विश्वास

**◆ नवी दिल्ली, १५ डिसेंबर**

शुभमन गिल व सूर्यकुमार यादव आगामी टी-२० विश्वचषकात चमकदार कामगिरी करतील, असा विश्वास अभिषेक शर्मानि व्यक्त केला आहे.



शुभमन गिल



अभिषेक शर्मा



सूर्यकुमार यादव

अभिषेक व शुभमन गिल हे १२ वर्षांचे असल्यापासून सोबत खेळत आहे. अभिषेकचा जीवलग मित्र शुभमन सध्या वाईट फॉर्ममध्ये आहे. मात्र गिल पुढील वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकातील सामन्यांसह लवकरच भारतासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय सामने जिंकायला सुरुवात करेल, असा विश्वास अभिषेकने व्यक्त केला.

स्थिर कामगिरी करणाऱ्या संजू सॅमसनला बाकावर बसवल्यानंतर गिलच्या भारतीय टी-२० आंतरराष्ट्रीय संघात निवडीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या फॉरमॅटमधील उपकर्णधार शुभमन गिलने १५ डावांमध्ये केवळ १३७.३ च्या स्ट्राइक-रेटने आणि २४.२५ च्या सरासरीने २९१ धावा केल्या आहेत. या डावांमध्ये त्याला एकही अर्धशतक झळकावता आलेले नाही, ४७ ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या आहे. यापैकी आठ डावांमध्ये त्याने २० पेक्षा कमी धावा केल्या आहेत.

त्या सामन्यांमध्ये त्याने केवळ चार षट्कार मारले आणि रविवारी धर्मशाला येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात गिलने २८ चेंडूत २८ धावांची संथ खेळी केली, ज्याचा फारसा फरक पडला नाही, कारण अभिषेकने (१८ चेंडूत ३५ धावा) ११८ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना संघाला दमदार सुरुवात करून दिली होती.

मी एक गोष्ट स्पष्टपणे सांगतो, माझ्यावर विश्वास ठेवा, शुभमन गिल व सूर्यकुमार यादव हे दोन्ही खेळाडू विश्वचषकांत (फेब्रुवारी-मार्चमध्ये) व या मालिकेतही सामने जिंकून देतील, असे असे उत्तर अभिषेकने गिल व कर्णधार सूर्यकुमारच्या सध्या सुरू असलेल्या पाच सामन्यांच्या मालिकेतील वाईट फॉर्मबद्दल विचारले असता दिले. अभिषेक गिलबद्दल स्वाभाविकपणे बचावात्मक होता. दक्षिण आफ्रिकेविरुद्धघच्या पाच सामन्यांच्या या टी-२० मालिकेत भारत सध्या २-१ ने आघाडीवर आहे. मी विशेषतः शुभमनसोबत खूप दिवसांपासून खेळत आहे, त्यामुळे तो कोणत्या परिस्थितीत, कोणत्याही संघाविरुद्ध, कोणता सामना जिंकू शकतो हे मला माहित आहे. त्यामुळे मला सुरुवातीपासूनच त्याच्यावर खूप विश्वास आहे, आणि मला आशा आहे की प्रत्येकजण त्याला लवकरच पाहिल आणि प्रत्येकाला त्याच्यावर विश्वास बसेल,'' असे जगातील प्रथम क्रमांकाचा टी-२० फलंदाज अभिषेक म्हणाला.

◂(वृत्तसंस्था)

# गोंधळ 'व्यवस्थापनाचे अपयश' : राज्यपाल बोस

## मेस्सी कार्यक्रमातील गोंधळ
## केंद्राला अहवाल सादर करणार

**◆ कोलकाता, १५ डिसेंबर**

पश्चिम बंगालचे राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांनी सोमवारी येथील सॉल्ट लेक स्टेडियममध्ये लियोनेल मेस्सीच्या कार्यक्रमादरम्यान झालेल्या गोंधळाला 'व्यवस्थापनाचे अपयश' म्हटले आणि ते या घटनेबाबत केंद्राला 'जनहितैषी अहवाल' सादर करतील असे सांगितले.

या प्रकरणामुळे 'सर्वत्र फुटबॉलप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या व सामान्य माणसाच्या, विशेषतः फुटबॉल चाहत्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला, असे सी. व्ही. आनंद बोस येथील लोक भवनात पत्रकारांशी बोलताना म्हणाले.



राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस

हा एक जनहितैषी अहवाल असेल व हा अहवाल मी भारत सरकारला सादर करणार आहे व राज्य सरकारलाही सूचना देणार आहे, असे ते म्हणाले.

१३ डिसेंबर रोजी स्टेडियममधील कार्यक्रम मेस्सीच्या अल्प काळ व कडेकोट बंदोबस्तातील उपस्थितीनंतर व्यापक हिंसाचार आणि गोंधळात बदलला, त्यामुळे गर्दीतील मोठा वर्ग निराश झाला. २०११ नंतर मेस्सीची त्या ठिकाणी ही पहिलीच उपस्थिती होती.

दूरदूरवरून प्रवास करून तिकिटांसाठी मोठी रक्कम देऊनही त्यांना आपल्या सुपरस्टारची एक झलक पाहता आली नाही. राज्यपालांनी रविवारी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली होती.

'नियोजन व प्रशासनातील त्रुटींकडे' लक्ष वेधत राज्यपाल म्हणाले, 'पाहा, त्या दिवशी जे घडले ते घडायला नको होते. यामुळे सर्वत्र फुटबॉलप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. यामुळे सामान्य माणसाच्या, विशेषतः फुटबॉल चाहत्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचला आहे. हे व्यवस्थापनाचे अपयश आहे. इतक्या मोठ्या जनसमुदायासाठी कोणतीही प्रमाणित कार्यप्रणाली नसणे आश्चर्यकारक आहे, असेही ते म्हणाले.

आपण राज्य सरकारला न्यायालयीन चौकशीचे आदेश देण्याचे, सर्व दोषींना अटक करण्याचे आणि प्रेक्षकांना तिकिटांचे पैसे परत करण्याचे निर्देश दिले आहेत, असे त्यांनी सांगितले.

◂(वृत्तसंस्था)

# सोलापूर जिल्हा क्रॉस कंट्री स्पर्धा रविवारी सोलापुरात

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने रविवार २१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता शासकीय मैदान नेहरूनगर येथे सोलापूर जिल्हा क्रॉस कंट्री स्पर्धा व निवड चाचणी आयोजित केली आहे.

ह्या स्पर्धेत प्राविण्य मि ळवलेल्या खेडूंची निवड शनिवार १० जानेवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजी नगर येथे होणाऱ्या राज्य क्रॉसकंट्री स्पर्धासाठी होणार आहे. या मध्ये खालील वयोगटातील स्पर्धकांना भाग घेता येईल.

ही स्पर्धा खूला गट पुरुष म हिला,२० वर्षे मुले व मुली (जन्म तारीख २५-१-२००६ ते २४-१-२००८ च्या दरम्यान जन्मलेले), १८ वर्षे मुले व मुली (२५-१-२००८ ते २४-१-२०१०), १६ वर्षे मुले व मुली (२५-१-२०१० ते २४-१-२०१२) या गटात होईल. स्पर्धेसाठी जन्म दाखला ग्रामपंचायत, नगरपालिका, म हानगरपालिका व १० वी बोर्ड प्रमाणपत्रावर असलेले जन्म तारीख ग्राह्य धरले जाईल.

स्पर्धा प्रवेशिका स्पर्धा ठिकाणी स्पर्धा पूर्वी स्विकारले जातील राज्य स्पर्धा साठी थलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया खेळाडू नोंद व यु. आय.डी. असणे आवश्यक आहे.

ही स्पर्धा सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व समृध्दी स्पोर्ट्सच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी (मो.९३२६०५५९४०) यांच्याशी संपर्क साधावा.

# राज्य मास्टर्स जलतरण स्पर्धेत सोलापूरला २१ पदके

## १४ सुवर्ण, ४ रौप्य व ३ कांस्य पदकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

पिंपरी चिंचवड येथे झालेल्या राज्य मास्टर्स जलतरण स्पर्धेत येथील जलतरणपटूंनी १४ सुवर्ण, ४ रौप्य व ३ कांस्य अशी २१ पदकांची कमाई केली. त्यांच्या यशाबद्दल सोलापूर जिल्हा हौशी जलतरण संघटनेने अभिनंदन केले आहे.

**कामगिरी : श्रद्धा यलगम (१ सुवर्ण, २ रौप्य) :** १०० मीटर फ्री स्टाईल सुवर्ण, ५० व १०० मीटर बॅक स्ट्रोक रौप्य.

**सुरेश मिठ्ठाकोल** (३ सुवर्ण) : १०० मीटर बॅक स्ट्रोक, १०० मीटर बटरफ्लाय व २०० मीटर वैयक्तिक मिडले, सुवर्ण).

**चंद्रविलास बिराजदार (२ सुवर्ण, १ रौप्य):** १०० मीटर बटरफ्लाय व २०० मीटर वैयक्तिक मिडले सुवर्ण, १०० मीटर बॅक स्ट्रोक रौप्य.

**जयेश हेडगिरे (१ सुवर्ण, २ कांस्य) :** ५० मीटर बटरफ्लाय सुवर्ण, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक व फ्री स्टाईल

**शंकर कस्तुरी (३ सुवर्ण) :** ५०, १०० मीटर बटरफ्लाय व २०० मीटर वैयक्तिक मिडले सुवर्ण.

**शंकर करजगी (३ सुवर्ण) :** ५० मीटर फ्रीस्टाईल, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, ५० मीटर बटरफ्लाय सुवर्ण.

**अरविंद बुगडे (१ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य) :** ५० मीटर बॅक स्ट्रोक सुवर्ण, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक रौप्य, ५० मीटर फ्री स्टाईल कांस्य.





### सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या दोघांची महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट संघात निवड

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या श्रुतिका मोरे व अक्षरा कांबळे या दोघांची महाराष्ट्र टेनिस बॉल क्रिकेट संघात निवड झाली. ३३ वी ज्युनियर नॅशनल टेनिस बॉल क्रिकेट चॅम्पियनशिप जोहन मेल्टन स्कूल स्पोर्ट्स विभाग आग्रा उत्तर प्रदेश १८ ते २१ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या स्पर्धेत ते भाग घेतील. ५ ते ७ डिसेंबर नंदुरबार येथे झालेल्या राज्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेतून त्यांची निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर, कोमल इचगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, पालक सदस्य प्रभुराज मैंदर्गीकर, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनीता वाले यांनी अभिनंदन केले.

### विद्यानिकेतन हायस्कूलच्या क्रीडा सप्ताहात लाठीकाठी प्रशिक्षण शिबिर



**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

विद्यानिकेतन हायस्कूलच्या क्रीडा सप्ताहामध्ये मुलींसाठी लाठीकाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

संस्थेचे सचिव विजय पुकाळे हे अध्यक्षस्थानी होते. मुख्याध्यापक गोपीनाथ नवले यांनी प्रास्ताविक केले. सचिव विजय पुकाळे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे प्रशालेचे माजी विद्यार्थी जगदीश खैरे व त्यांच्या टीमचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विजय पुकाळे यांनी प्रशिक्षणाचे उद्‌घाटन केले. यावेळी प्रशालेचे माजी विद्यार्थी सागर मडिवाळ, अमर पुलगम, वैभव नल्ला, प्रतिक श्रीमल, ओंकार नल्ला, शिवा कुटमल या प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाचे प्रात्याक्षिक करुन दाखवले. कार्यक्रमास क्रीडाप्रमुख राजशेखर नाटीकर, उप प्रमुख अविनाश वळसंगकर, सांस्कृतिक उपप्रमुख नितीन मुसळे, ज्येष्ठ शिक्षक विद्याधर रंगदाळ, ज्येष्ठ शिक्षिका शोभा अंबुरे, रुपादेवी राजगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सूत्रसंचालन क्रीडा उपप्रमुख अविनाश वळसंगकर यांनी केले. पर्यवेक्षक शंकर गिरी यांनी आभार मानले.



### क्रीडा शिक्षक विठ्ठल कुंभार यांना लायन्स भूषण पुरस्कार प्रदान

**सोलापूर दि.१५ डिसेंबर-**

लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल व शिवसरोज जनमंगल प्रतिष्ठान यांच्यावतीने दिला जाणारा मानाचा लायन्स भूषण पुरस्कार नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेचे क्रीडा शिक्षक विठ्ठल कुंभार यांना प्रदान करण्यात आला. कोषाध्यक्ष सी ए श्रेणीक शहा, अध्यक्ष प्रा. स्वामीनाथ कलशेट्टी, दीनानाथ धुळम,अरविंद कोणसिरसगी व लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रलचे सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते कुंभार यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कुंभार यांच्या विद्याज्ञान व सामाजिक योगदान आणि अतुलनीय कार्यामुळे लायन्स भूषण पुरस्कार दिला जात असल्याचे अध्यक्ष कलशेट्टी यांनी सांगितले.

# महिला गटात किरण स्पोर्टस्‌ला विजेतेपद

## उत्कर्ष स्मृती चषक जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : पुरुष गटात उत्कर्ष क्रीडा मंडळ व किरण स्पोर्ट्सला संयुक्त विजेते

**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

उत्कर्ष स्मृती चषक जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत महिला गटात किरण स्पोर्टस् क्लब व पुरुष गटात येथील किरण स्पोर्टस् आणि उत्कर्ष क्रीडा मंडळ यांना संयुक्त विजेतेपद देण्यात आले.

हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर झालेल्या महिलांच्या अंतिम सामन्यात किरण स्पोर्टस्‌ने वाडीकुरोलीच्या कल्याणराव काळे स्पोर्टस् क्लबचा १०-९ असा १ गुण व ४.१० मिनिटे राखून पराभव केला. पुरुष गटात उत्कर्ष क्रीडा मंडळ व किरण स्पोर्टस्‌ने अंतिम फेरीत प्रवेश केला होता. परंतु तांत्रिक कारणामुळे सामना झाला नसल्यामुळे दोघांना संयुक्त विजेतेपद देण्यात आले.

ही स्पर्धा सोलापूर सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन व उत्कर्ष क्रीडा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उत्कर्ष क्रीडा मंडळाचे गुरुवर्य शरणप्पा तोरवी, अनिल नागणे, रामचंद्र जाधव, विष्णुपंत अवताडे, मोहन किर्तक, गिरीष भोईटे, मोहन पवार, प्रमोद शिवपूजे व धीरज नगरकर या क्रीडा संघटक व खेळाडूंच्या स्मरणार्थ आयोजिली होती.



स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, स्वामी विवेकानंद प्रशालेचे मुख्याध्यापक अंबादास पांढरे, अभियंता संतोष बायस, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे, ज्येष्ठ खेळाडू विजय तडसरे व मनोज संगावार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष अजितकुमार संगवे, सचिव उमाकांत गायकवाड, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहखजिनदार सोमनाथ बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, तांत्रिक समिती सचिव शिवशंकर राठोड, पंच मंडळ सचिव गोकुळ कांबळे, सदस्य सुरेश खुर्द भोसले, प्रा. डॉ. शिवानंद तोरवी, सोनाली केत, गुलाम मुजावर, रवींद्र नाशिककर, शरद व्हनकडे आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत उत्कर्ष क्रीडा मंडळाचे कार्याध्यक्ष सुनील चव्हाण, सचिव अजित शिंदे, सिद्धाराम करजगीकर, आशिष अवधूर्ती, अनुप विभुते, सचिन हार, आनंद मठ्ठे, नानासाहेब पाटील, प्रभाकर माने, भुमन्ना शिरगिरे यांनी केले. पंच म्हणून नागेश माडीकर, पुंडलिक कलखांबकर, किशोर गुंड, लखन कांबळे, राहूल शेवाळे, युसुफ शेख, महेश राऊत, महादेव गुंड, आनंद जगताप, विजय अडगळे, नौशाद, शहानवाज मुजावर, अक्षय पवार, शुभम यांनी काम पाहिले.



### श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये क्रीडा सप्ताह उत्साहात साजरा

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालयाम ध्ये क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे व मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, प्र.मुख्याध्यापक रमेश दिंडोरे या मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे व क्रीडांगणाचे पूजन करून करण्यात आले. प्रमुख अतिथी माजी प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे म्हणाले, खेळाडूंनी खेळाच्या नियमांचे पालन करावे व मोबाईल पासून दूर राहावे व उत्कृष्ट खेळाडू होण्यासाठी सराव करणे गरजेचे आहे.प्रभारी मुख्याध्यापक रमेश दिंडोरे यांनी विद्यार्थ्यांनी खेळ खिलाडूवृत्तीने खेळावे, इतर विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग घ्यावे असे आवाहन केले. या क्रीडा सप्ताहामध्ये खो-खो,कबड्डी, सॉफ्टबॉल,बेसबॉल,क्रिकेट, संगीत खुर्ची,लंगडी,लिंबू चमचा इ.खेळ घेतले जाणार आहेत. या क्रीडा सप्ताहास बसवराज कोरे,अण्णाराया तुप्पद,भारत राऊत,अनिलकुमार गावडे,क्रीडा शिक्षक परमेश्वर चांदोडे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रतीक्षा बिडवे यांनी केले. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. क्रीडा शिक्षक गंगाराम घोडके यांनी आभार मानले.



## सांगोल्यात श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१५ डिसेंबर-**

श्री समर्थ सद्गुरु ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांचा ११२ वा पुण्यतिथी उत्सव श्रीराम व ध्यान मंदिर, सांगोला येथे दि .५ ते १४ डिसेंबर दरम्यान साजरा केला. यानिमित्त भीक्षा, भजन, मौन, गायन, कीर्तन, प्रवचन, उपासना, अखंड १३ तासाचा जप, लहान मुलांच्या पाठांतर स्पर्धा असे कार्यक्रम पार पडले. दररोज स.६.३० वाजता काकडा व सामुदायिक जप राममंदिर येथे संपन्न झाला. हभप अर्चित वैभव साने, कोरेगाव, सातारा याचे नारदीय कीर्तन, समर्थ भक्त मोहनबुवा रामदासी यांचे समर्थ रामदास स्वामी यांचे जीवन कार्य या विषयावर दोन दिवस प्रवचन, हभप डॉ. जयवंत महाराज बोधले यांचे नामस्मरण व अभ्यास या विषयावर तीन दिवस प्रवचन, दयानंद बनकर व त्यांचे सहकारी यांचा भजन संध्या हा भावगीत, भक्तीगीत, अभंग, बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. रविवारी हभप. शुभांगी कवठेकर यांचे पुण्यतिथी कीर्तन व श्री महाराजांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. शुभांगी कवठेकर यांना तबल्याची साथ दत्तात्रय बोत्रे यांनी तर हार्मोनियम साथ शशिकांत लाटणे यांनी केली. सूत्रसंचालन अश्विनी कुलकर्णी यांनी केले. यानंतर श्रीमहारांजांची पालखी व नगर प्रदक्षिणा शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली. दुपारी ध्यान मंदिरात आरती व महाप्रसाद होऊन उत्सवाची सांगता झाली.



## काँग्रेस डी ब्लॉकच्या वतीने उबदार शालीचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

आपण ही समाजाचे काही तरी देणं लागतो या भावनेतून काँग्रेस डी ब्लॉकच्या वतीने सोलापूर शहरात खा. प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. प्रभाग क्रमांक २२ येथे प्रणिती शिंदे यांच्या वाढदिवसाचे ओचित्त साधून दीक्षित हॉस्पिटल समोर लिमेवाडी येथे महिलांना उबदार शाल वाटप करण्यात आले. डी ब्लॉक अध्यक्ष देवीदास गायकवाड यांच्यावतीने उबदार शाल वाटप करण्यात आले. यावेळी माजी महिला अध्यक्ष अरुणा वर्मा, अॅड. करीमुनिसा बागवान, सुभाष वाघमारे शहर अध्यक्ष असंघटित कामगार कर्मचारी काँग्रेस सोलापूर, वार्ड अध्यक्ष नागनाथ सावने, मुमताज शेख, गौरी हादीमणी, विजया लक्ष्मी झाकणे, सुनिता शिगारे उपस्थित होते.

## निधन वार्ता...

### गौराबाई नागूर



**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

विद्या निकेतन प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री अण्णाराव नागूर यांच्या पत्नी गौराबाई अण्णाराव नागूर (वय ७८) यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.

त्यांची अंत्ययात्रा मंगळवार दि. १६ रोजी सकाळी १० वाजता विशाल नगर, जुळे सोलापूर येथून निघणार आहे. तुळजापूर वेस येथील लिंगायत स्मशानभूमी या ठिकाणी अंत्यविधी होणार आहे. त्यांच्या पाश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, सून, जावई, नातवंडे व पणतू असा मोठा परिवार आहे

### सुरेखा हरिदास



**पंढरपूर, दि. १५ डिसेंबर-**

येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते शामराव पांडुरंग हरिदास यांच्या पत्नी सुरेखा हरिदास (वय ७१) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू, दोन पुतणे असा परिवार आहे.


### रामचंद्र दासरी



**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

कुंभारी येथील गोदुताई विडी घरकुल येथील रहिवासी कै. रामचंद्र व्यंकटस्वामी दासरी यांचे सोमवार, दि. १५ डिसेंबर रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे. अक्कलकोट रोड येथील शांतीधाम स्मशानभूमीत पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### नारायण साठे



**माळिशरस, दि. १५ डिसेंबर-**

नारायण साठे (वय ६३ वर्षे) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, चार मुली, जावई, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ते नगर पंचायत कर्मचारी विजय साठे यांचे वडील होत.

### सुवर्णा मंठाळकर



**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

सोन्या मारूती दाक्षिण कसबा येथील स्व. राजीव कुमार मंठाळकर यांच्या पत्नी सुवर्णा मंठाळकर यांचे रविवार दि. १४ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय (६५) होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधीवेळी श्री. सोन्या मारुती गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, राजकिय, सामाजिक, आध्यात्मीक क्षेत्रातील प्रतिष्ठीत नागरिक व हितचिंतक मित्र परिवार सहभागी होते.

# स्मशानभूमी नसल्याने अंत्यसंस्कार ताटकळला

**बार्शी तालुक्यातील शेलगाव (मा) येथील घटना; गावकऱ्यांकडून रास्तारोको**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ डिसेंबर-**

ग्रामीण भागात मृत्यूनंतर अंत्यविधीसाठी स्मशानभूमी नसणे, हे विकासाच्या दाव्यांना काळीमा फासणारे वास्तव आहे. मृत्यूनंतर किमान सन्मानाने अंत्यसंस्कार करण्याचा अधिकारही जर मिळत नसेल तर प्रशासन आणि सरकार कुणासाठी? जिवंतपणी तर विकासाच्या पोकळ गप्पा आहेत, परंतु मरणानंतरही विकास दिसत नाही, असा संतप्त सवाल बार्शी तालुक्यातील शेलगांव (मा.) येथील धक्कादायक घटनेमुळे पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.



बार्शी शहरापासून अवघ्या ५ किमी अंतरावर असणाऱ्या बार्शी-तुळजापूर रस्त्यावरील शेलगांव (मा.) गावात स्वातंत्र्यानंतरही कोणत्याही समाजासाठी स्वतंत्र व अधिकृत स्मशानभूमी उपलब्ध नाही. परिणामी, अंत्यविधीसाठी जागा नसल्याने मृतदेह ताटकळत राहण्याची वेळ आली. सध्या ओढ्याला पाणी असल्याने तिथे अंत्यसंस्कार करणेही अशक्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर गावकऱ्यांना अक्षरशः हतबल परिस्थितीला सामोरे जावे लागले. शुक्रवार, दि. १२ डिसेंबर रोजी शेलगांव (मा) येथील महिला छाया सोनवणे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. उपचारासाठी रुणालयात नेण्यात आले होते, तरी त्यांचे प्राण वाचू शकले नाही. मात्र, निधनानंतरही स्मशानभूमी नसल्याने त्यांच्या अंत्यविधीचा प्रश्न गंभीर बनला. त्यामुळे मृतदेह हा रुणालयातच ठेवण्यात आला होता. शनिवारी अंत्यसंस्कार होऊ न शकल्याने रविवारी संतप्त नातेवाईक व ग्रामस्थांनी थेट ग्रामपंचायत कार्यालयासमोरच अंत्यविधी करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी मृत महिलेचे नातेवाईक व काही गावकऱ्यांनी बार्शी-तुळजापूर रस्त्यावर रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या गोंधळाच्या परिस्थितीत मृत महिलेचा भारतीय सैन्यात सेवेत असलेला जवान मुलाने स्वतःच्या आईच्या निधनाच्या दुःखात असतानाही त्याने संयम व समजूतदारपणा दाखवत ग्रामस्थांशी चर्चा करुन परिस्थिती शांत केली. यावेळी गावातील शेतकरी पंडीत मारकड यांनी माणुसकीचा परिचय देत स्वतःच्या शेतात अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करुन दिली. त्यांच्या या मोठ्या मनामुळे अखेर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले.

आईच्या निधनानंतरही संयम राखणाऱ्या त्या भारतीय जवानाच्या समजूतदार भूमिकेचे तसेच शेतकरी पंडीत मारकड यांनी दाखवलेल्या माणुसकीचे संपूर्ण गावातून कौतुक होत आहे. मात्र, या घटनेने प्रशासनाच्या उदासीनतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही गावखेड्यांतील मूलभूत सुविधांकडे प्रशासन कधी गांभीर्याने पाहणार? मृत्यूनंतर तरी माणसाला सन्मान मिळणार की नाही, हा प्रश्न आता गावकऱ्यांच्या मनात निर्माण झाला आहे.

## श्री सत्य साई प्रशांति निलयमचा कलबुर्गीला थांबा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ डिसेंबर-**

भारतीय रेल्वेने कलबुर्गी-एसएमवीटी बेंगळुरू वंदे भारत एक्स्प्रेस श्री सत्य साई प्रशांती निलयम मार्गे रवाना केली आहे आणि श्री सत्य साई प्रशांति निलयम येथे १ जानेवारी २०२६ पासून कलबुरगि व २ जानेवारीपासून एसएमवीटी बेंगळुरू मधून अतिरिक्त थांबा सुरू केला आहे. यात्रेकरू, भाविक आणि या प्रदेशात ये-जा करणा-या प्रवाशांना फायदा होण्यासाठी आता ही ट्रेन या मार्गावरून धावणार आहे.

कलबुर्गी-एसएमवीटी बेंगळुरू वंदे भारत एक्सप्रेसच्या सुधारित वेळ ही आगमन आणि प्रस्थान हे कलबुरगि येथून प्रस्थान आधीच्या पहाटे ०५:१५ ऐवजी सकाळी ०६:१० वाजता सुटेल. यादगीर सकाळी ०६:४८/०६:५० वाजता, रायचूर ०७:३८/०७:४० वाजता, मंत्रालयम रोड ०७:५८/०८:०० वाजता, गुंटकल ०९:००/०९:०५ वाजता, अनंतपूर १०:०३/१०:०५ वाजता, श्री सत्य साई प्रशांति निलयम नवीन जोडलेला थांबा ११:००/११:०२ वाजता, येलहंका दुपारी १२:२८/१२:३० वाजता, सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनल बेंगळुरू आगमन दुपारी ०२:१० असे असणार आहे.एसएमवीटी बेंगळुरू-कलबुरगि वंदे भारत एक्सप्रेस आगमन आणि प्रस्थान हे सर एम. विश्वेश्वरय्या टर्मिनल बेंगळुरू प्रस्थान दुपारी ०२:४० वाजता, येलाहंका दुपारी ०३:०५/०३:०७ वाजता, श्री सत्य साई प्रशांति निलयम नवीन जोडलेले थांबे दुपारी ०४:२३/०४:२५ वाजता, अनंतपूर ०५:३३/०५:३५ वाजता, गुंटकल ०६:३७/०६:४२ वाजता, मंत्रालयम रोड ०७:४८/०७:५० वाजता, रायचूर ०८:१८/०८:२० वाजता, यादगीर ०९:०३/०९:०५ वाजता, कलबुरगि आगमन १०:४५ वाजता, मागील ११:३० तासांच्या वेळापत्रकापेक्षा आदी पोहोचेल.




## संविधान गौरव परीक्षा उत्साहात

**सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशनचा उपक्रम**

**सोलापूर दि. १५ डिसेंबर-**

भारतीय संविधान दिनानिमित्त सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेली संविधान गौरव परीक्षा सोलापूर शहर आणि जिल्हयात आज उत्साहात संपन्न झाली. सोलापूर शहरात लोकराजा अभ्यासिका आणि विश्वभुषण विद्यालय तसेच माढा तालुक्यातील मातोश्री माध्यमिक विद्यालय म्हैसगाव या केंद्रावर ही परीक्षा संपन्न झाली. शेकडो विद्यार्थ्यांनी या परीक्षेत आपला सहभाग नोंदविला. ही परीक्षा ८ वी ते १२ वी आणि १२ वी पुढील (पदवी, पदव्युत्तर पदवी) अशा दोन गटांत घेण्यात आली होती. भारतीय संविधानाबद्दल जनजागृती करण्यासाठी, संवैधानिक मूल्ये समाजात रुजविण्यासाठी ही परीक्षा गेल्या ५ वर्षांपासून ही परीक्षा आयोजित केली जात राज्यकर निरीक्षक बुद्धजय भालशंकर यांनी सांगितले. या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना १५ हजार रुपयांची रोख शिष्यवृती, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते शनिवार २७ डिसेंबर रोजी शिवस्मारक सभागृह येथे प्रदान येईल. संविधान दररोजच्या जीवनात किती महत्वाचे आहे, संविधान साक्षर झाल्यावर कोणते फायदे होतात आणि कोणते अनर्थ टळतात हे दर्शविण्यासाठी गेली पाच वर्षांपूर्वीपासून हा विचार यज्ञ सुरु केला असल्याचे राज्य कर निरीक्षक बुद्धजय भालशंकर यांनी सांगितले. परीक्षेच्या यशस्वीतेसाठी आशुतोष तोंडसे, मुक्ता आतकरे, विनोद वर, सत्यवान पाचकुडवे, ज्योती चव्हाण, भौरम्मा वाघमारे यांनी परिश्रम घेतले.


## बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री')

### आरोग्य आणि स्फूर्तीसाठी एक आयुर्वेदिक टॉनिक




बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री') हे एक विशेषतः तयार केलेले अवलेह (च्यवनप्राश) आहे, जे आजच्या आरोग्य जागरूक स्त्री-पुरुषांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बनवले गेले आहे विशेषतः त्यांच्यासाठी जे आपल्या साखरेच्या सेवनावर नियंत्रण ठेवू इच्छितात. हे श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन प्रा. लि. यांनी विकसित केले आहे. जी आयुर्वेदिय औषध निर्मितीतील एक अग्रणी संस्था आहे. यात पारंपरिक च्यवनप्राशचे गुण आहेत, पण साखर नाही. बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री') मध्ये साखर नाही, आणि हे कमी कॅलरी असलेल्या नैसर्गिक मधूर द्रव्यांनी बनवले आहे, ज्यामुळे हे कॅलरीबाबत जागरूक लोकांसाठी उत्तम आहे. या अवलेहमध्ये अनेक मौल्यवान व पारंपरिक औषधी वनस्पतींचा समावेश आहे, ज्यापैकी सर्वात महत्त्वाचा घटकद्रव्य म्हणजे आवळा, जो प्रत्येक चमच्यात व्हिटामिन 'C' पुरवतो आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो.

अश्वगंधा, कौंच बीज, बिल्व, दशमूल आणि केशर हे आरोग्यवर्धक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहेत. हे शरीरातील अशक्तपणा कमी करण्यात, पोषण देण्यात आणि एकूण स्फूर्ती वाढविण्यात मदत करतात. दालचिनी, जावित्री, गिलोय, विदारीकंद या वनस्पती शरीराला विविध प्रकारच्या संसर्गापासून संरक्षण देण्यास मदत करतात. रक्तातील साखरेच्या उच्च पातळीमुळे बहुतेक सगळ्या व्यक्तिंना अशक्तपणा आणि कमी रोगप्रतिकारक शक्तीचा त्रास होतो. अशा वेळी नियमितपणे बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री)चे सेवन, संतुलित आहार आणि निरोगी जीवनशैलीसोबत केल्यास शरीरात ऊर्जा, शक्ती आणि सर्वांगीण आरोग्य सुधारण्यास मदत होते. च्यवनफिट (शुगर फ्री) मध्ये असलेले अँटिऑक्सिडंटने समृद्ध वनस्पती, रोगप्रतिकारक शक्ती संतुलित ठेवण्यात मदत करतात. श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन नेहमीच प्रामाणिक आयुर्वेदिक संशोधन आणि नवीन औषधनिर्मिती द्वारे मानवी आरोग्य संवर्धनासाठी समर्पित आहे. बैद्यनाथ संशोधन केंद्राच्या सखोल अभ्यासानंतर, बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री) हा योग तयार करण्यात आला, हा अशा लोकांच्या गरजांनुसार निर्मित आहे जे पारंपरिक अवलेह (च्यवनप्राश)चे फायदे साखरमुक्त स्वरूपात अनुभवू इच्छितात.

**वापरण्याची पद्धत :**

दररोज दोन वेळा १ ते २ चमचे (५-१० ग्रॅम) दूधासोबत किंवा वैद्याच्या सल्लयानुसार घ्यावे. बैद्यनाथ च्यवनफिट (शुगर फ्री') हे नैसर्गिक, सुरक्षित आहे, सर्व ऋतुंमध्ये उपयुक्त आहे आणि सर्व केमिस्ट तसेच आयुर्वेदिक दुकानांमध्ये उपलब्ध आहे. (शुगर फ्री)- अतिरिक्त साखर नाही)

**- वैद्य. प्रतिन पटलवार प्रधान वैद्य** Customer Care No.: ८४४८४४४९३५


## भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने यशवंत आंबेडकर यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

भारतीय बौद्ध महासभा सोलापूर शाखेच्या वतीने सूर्यपुत्र यशवंत आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम भंते बी सारीपुत्त यांच्या उपस्थितीत झाला. न्यू बुधवार पेठेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर महाराष्ट्र संघटक शारदा गजभिये यांनी व्याख्यान दिले. यावेळी मिनाक्षी बनसोडे, विक्रांत गायकवाड यांची भाषणे झाली. नागसेन माने यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राजेंद्र माने, समता सैनिक दलाचे बाबू रणखांबे, रमा ढावरे, मंगल सूर्यवंशी, मंगल दोड्यानुर, आम्रपाली सर्वगोड, रमा शिवशरण,राजू सरवदे, मिलिंद सूर्यवंशी, देविदास लंकेश्वर उपस्थित होते.



# बार्शीत लोकअदालतीमध्ये १४६ प्रकरणे निकाली

## ३ कोटी ७५ लाख २१ हजार ९१६ रुपयांची वसुली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १५ डिसेंबर-**

बार्शी न्यायालयात आयोजित राष्ट्रीय महालोक अदालतीत २३१ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखल पुर्व १ हजार २३८ असे १ हजार ४६९ प्रकरणे तडजोडीने मिटवण्यात आली. यामध्ये प्रलंबित प्रकरणात ३ कोटी २६ लाख ६६ हजार ८२४ तर दाखलपुर्व प्रकरणांत ४८ लाख ५५ हजार ९२ रुपयांची वसुली झाली.



महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानुसार, अध्यक्ष,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे सोलापूर एम. एस. शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर पी. पी. पेटकर यांच्या सहकार्याने, बार्शी तालुका विधी सेवा समिती, बार्शी व वकील संघ बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती बार्शी तथा जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य के. मांडे यांचे अध्यक्षतेखाली ही राष्ट्रीय महा लोकअदालत झाली.

या राष्ट्रीय महालोक अदालतीत बार्शी न्यायालयात प्रलंबित असलेले दिवाणी व फौजदारी असे ३ हजार ७३८ व दाखलपूर्व ४ हजार ६२४ असे ८ हजार ३६२ प्रकरणे लोकअदालत पॅनलमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. या लोकअदालतीमध्ये बार्शी न्यायालयातील एकुण सात पॅनल करण्यात आले होते. त्यात जिल्हा न्यायाधीश-१ विक्रमादित्य के. मांडे, जिल्हा न्यायाधीश-२ श्रीमती व्ही. एस. मलकलपट्टे- रेडड्री, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर पी. बी. लोखंडे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर श्रीमती पी. व्ही. राऊत, २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर जी. एस. पाटील, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एच. यु. यु. पाटील, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती आर.पी. बागडे असे एकुण सात पॅनल होते. विशेष बाब म्हणजे पॅनल क. ३ मधील दिवाणी न्यायालय व स्तर पी. बी. लोखंडे यांचे न्यायालयातील १० वर्षे जुनी दरखास्त तडजोडीने निकाली काढण्यात आले. तसेच पॅनल क. ६ मधील श्रीमती आर.पी. बागडे यांचेकडील ७८ वर्षीय जेष्ठ महिला पक्षकार यांचा वाटपाचा दावा तडजोडीने निकाली करण्यात आला.

जिल्हा न्यायालयातील मोटार अपघात प्रकरणांत एकुण २ प्रकरणे तडजोडीने मिटून त्यात सुमारे ३२ लाख ५० हजार इतक्या रक्कमेची नुकसान भरपाई मंजुर करण्यात आली. एन. आय. अॅक्ट १३८ च्या एकुण १७ प्रलंबित प्रकरणांत तडजोड होवुन त्यात सुमारे ३२ लाख २८ हजार ५१ रुपयांची वसुली, तर रक्कम वसुलीच्या ४२ प्रकरणांत तडजोड होवुन त्यात २ कोटी ५६ लाख ८४ हजार ६६९ रुपयांची वसुली झाली. न्यायालयातील प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी प्रकरणांत १२ इतकी प्रकरणे व कबुलीची ९२ प्रकरणे तडजोडीने निकाली करण्यात आली. त्यात सुमारे ८० हजार ७०० रुपयांची दंड वसुल करण्यात आला. सदर लोकअदालतीमध्ये पक्षकारांनी मोठया प्रमाणांत सहभाग नोंदविला. बार्शी वकील संघाचे अध्यक्ष रणजित गुंड, पॅनल विधीज्ञ, सर्व कर्मचारी, पोलीस, बँका तसेच फायनान्स कंपन्या, पंचायत समिती बार्शी, विज वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी यांचे विशेष सहकार्य लाभले.

## काळवीटचे सहा किलो मांस व वन्यप्राणी पकडण्याचे साहित्य जप्त

**सांगोल्यातील आलेगाव येथे वनविभागाची कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १५ डिसेंबर-**

शुक्रवार दि.१२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान गुप्त माहितीनुसार सांगोला वनपरिक्षेत्र अधिकारी सागर मगर, वनपाल जे. जे. खोंदे, वाघमोडे, वनरक्षक प्रतिभा जलदावार, जगताप, इंगोले, मुंढे यांनी आलेगाव (ता. सांगोला, जि. सोलापूर) येथे नितीन मवाली शिंदे (वय २८) याच्या घराची झडती घेतली असता, त्याच्या घरी काळवीट याचे मांस सहा किलो ८८० ग्रॅम इतके आढळले.

तसेच वन्यप्राणी पकडणेचे लाकडी (जाळे) पिंजरे दोन, नायलॉन दोरी जाळे सहा, सतुर लोखंडी एक, लाकडी ठोकळा एक, लोखंडी सुरी तीन, प्लास्टिक पोते दोन, स्टील पाटी एक असे साहित्य जप्त करण्यात आले.

तसेच नितीन शिंदे याच्या विरोधात वन्यजीव वनगुन्हा नोंद करण्यात आला असून तो फरार झाला आहे. वन्यजीव प्राणी मांस पशुधन विकास अधिकारी वाकी-घेरडी यांच्याकडून शिलबंद करून ते पुढील तपासणीकरिता फॉरेन्सिक लॅबकडे पाठविण्यात येणार आहे. सदर वनगुन्हे कामी पीएसआय संजय राऊत, पोह.जमीर शेख, आलेगाव पोलीस पाटील दिलीप पाटील यांनी मदत केली.

पुढील तपास सोलापूर वनविभागाचे उपवनसंरक्षक कुलराज सिंग, सहा. वनसंरक्षक ऐश्वर्या शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र सांगोला यांच्यामार्फत सुरु आहे.

> वन्यप्राणी तरस, लांडगा, कोल्हा, ससा, काळिवट, हरिण व इतर वन्यप्राणी एखाद्या गावात किंवा वस्तीवर जर आले तर त्यास कोणत्या प्रकारचा त्रास न देता ताबडतोब वनविभाग सांगोला यांच्याशी संपर्क साधावा. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे संरक्षण करणे व वन्यप्राण्यांचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकांचे कर्तव्य आहे.
>
> **- एस.व्ही.मगर,** वनपरिक्षेत्र अधिकारी, सांगोला.

# सिध्देश्वर यात्रा निर्विघ्न पार पाडू दे : धर्मराज काडादी

- श्री सिध्देश्वर यात्रा कार्यालयाचे थाटात उद्घाटन
- लवकरच थाटले जाणार मनोरंजनात्मक, खाद्यपदार्थांचे स्टॉल्स



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ डिसेंबर-**

ग्रामदैवत सिद्धेश्वर महाराजांची सिद्धेश्वर महायात्रा ही आशियातील सर्वात मोठी महायात्रा म्हणून यात्रेकडे पाहिले जाते. सिध्देश्वर यात्रा निर्विघ्न पार पाडू दे, हीच प्रार्थना सिद्धरामेश्वर महाराजांच्या चरणी केली असल्याचे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी केले. सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांच्या गड्डा यात्रेचे कार्यालय पंचकट्टा येथे भक्तीमय वातावरणात श्रीसिद्धरामेश्वरांच्या पूजेने सुरू करण्यात आले. यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सोमशंकर देशमुख आणि सिद्धेश्वर बमणी यांच्या हस्ते पुरोहितांच्या मंत्रोच्चारात श्रींचे पूजन करण्यात आले.

यावेळी श्री सिद्धेश्वर यात्रेच्या कार्यालयाचे कामकाज प्रत्यक्षात सुरू होणार आहे. यात्रा कालावधीत दिली जाणारे स्टॉलची परवानगी देण्यात येणार आहे. यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटीचे अध्यक्ष धर्मराज कडादी, सोमशंकर देशमुख, यात्रा कमिटीचे चेअरमन महादेव चाकोते, डॉ.राजेंद्र घुली, काशीनाथ डोले, सुरेश म्हेत्रे, विश्वनाथ लब्बा, सिद्धेश्वर बामणी, मल्लिनाथ मसरे, रतन रिक्के,पशुपतीनाथ माशाळ आदींची उपस्थिती होती.

**श्री सिध्देश्वर देवस्थान यात्रा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर**

ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्दरामेश्वर यांच्या यात्रेच्या पार्श्वभूमीवर श्री सिध्देश्वर देवस्थान यात्रा कमिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये श्री सिध्देश्वर यात्रा जनरल समितीच्या चेअरमनपदी महादेव चाकोते यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रकाश बिराजदार, अॅड. मिलिंद थोबडे, अॅड. विश्वनाथ आळंगे, प्रा. राजशेखर येळीकर, रतन रिक्के, शिवकुमार पाटील, नीलकंठप्पा कोनापुरे, गुरुराज माळगे यांचा समावेश आहे. जागा देणाऱ्या समितीच्या चेअरमनपदी प्रकाश बिराजदार यांची निवड झाली आहे. या समितीत भीमाशंकर पटणे, बाळासाहेब भोगडे, मल्लिकार्जुन कळके, गुरुराज माळगे आणि रतन रिक्के यांचा समावेश आहे. मिरवणूक समितीच्या चेअरमनपदी अॅड. मिलिंद थोबडे यांची तर महादेव चाकोते, बाळासाहेब भोगडे, मल्लिकार्जुन कळके, सोमशंकर देशमुख, विश्वनाथ लब्बा, सुरेश म्हेत्रे (कुंभार), मल्लिनाथ मसरे यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे. शोभेच्या दारूकाम समिती चेअरमनपदी अॅड. विश्वनाथ आळंगे यांची निवड झाली आहे. अॅड. मिलिंद थोबडे, मल्लिकार्जुन कळके, अॅड. रेवणसिध्द पाटील, डॉ. राजेंद्र घुली, विलास कारभारी हे सदस्य आहेत. प्रचार व प्रसिद्धी समितीच्या चेअरमनपदी प्रा. राजशेखर येळीकर यांची निवड झाली आहे. अॅड. रेवणसिध्द पाटील, प्रा. गंगाधर कुमठेकर, डॉ. राजेंद्र घुली, काशीनाथ डोले, चन्नवसव नाडगौडा हे सदस्य आहेत.

प्रसाद वाटप समितीच्या चेअरमनपदी रतन रिक्के यांची निवड झाली आहे. मल्लिकार्जुन कळके, गिरीश गोरनळ्ळी, सुरेश म्हेत्रे (कुंभार), प्रभूराज मेंदीकर हे सदस्य आहेत. रंग व वीज रोषणाई समितीच्या चेअरमनपदी शिवकुमार पाटील यांची निवड झाली आहे. सुभाष मुनाळे, विश्वनाथ लब्बा, गिरीश गोरनळ्ळी, नितीन उपासे हे सदस्य आहेत. जनावर बाजार समितीच्या चेअरमनपदी नीलकंठ कोनापुरे यांची निवड झाली आहे. तर काशीनाथ दर्गीपाटील, शिवकुमार पाटील, मल्लिनाथ मसरे, प्रकाश बिराजदार हे सदस्य आहेत. कृषी प्रदर्शन समितीच्या चेअरमनपदी गुरुराज माळगे यांची निवड झाली आहे. अॅड. मिलिंद थोबडे, मल्लिनाथ मसरे, काशीनाथ ढोले, विलास कारभारी, पशुपतीनाथ माशाळ हे सदस्य आहेत.




# अभियांत्रिकी महाविद्यालयाचा ४५० कोटींचा तगडा प्रस्ताव आल्याने नाकारण्यात आला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

राज्याचे उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील हे सोलापूरचे पालकमंत्री असताना तत्कालिन प्राचार्य अशोक उपाध्याय यांना सविस्तर प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र प्राचार्य उपाध्याय यांनी सर्व मागण्या एकाच हेडखाली येण्यासाठी तब्बल ४५० कोटींचा तगडा प्रस्ताव तयार पाठविला होता. त्यामुळे त्यावेळी सदर प्रस्ताव नाकारण्यात आला होता.

विशेष म्हणजे, त्यावेळी लातूर आणि कोल्हापूर जिल्ह्यातून प्रत्येकी अवघ्या २५ कोटींचा प्रस्ताव आला होता. यामुळे दोन्ही जिल्ह्यात अभियांत्रिकी महाविद्यालयांना तत्काळ मंजुरी



मिळाली आणि ती सुरुही झाली, असे आमदार देवेंद्र कोठे यांनी सांगितले. १९६६ साली सोलापूरला मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय तब्बल ६० वर्षांच्या प्रतिक्षेनंतरही सोलापूरला मिळालेले नाही. सोलापूरचे तत्कालिन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी त्यास मंजुरी दिली होती. यासाठी तब्बल ३०० कोटींच्या निधीची घोषणाही केली होती. गोरगरीब, कष्टकरी वर्गातील मुला-मुलींना अभियांत्रिकीचे शिक्षण घेता यावे यासाठी आपला पाठपुरावा राहणार आहे. लातूर व कोल्हापूर जिल्ह्याच्या धर्तीवर सोलापूरच्या शासकीय तंत्रनिकेतनमध्ये एकच अकौंट हेड ओपन करुन २५ कोटींची मागणी करण्याच्या सूचना संबंधित प्राचार्यांना देणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

सध्या सुरु असलेल्या शासकीय तंत्रनिकेतनच्या ३४ एकर जागेचा आणि उपलब्ध इमारतींचा उपयोग करून २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सोलापुरात सुरु व्हावे, अशी मागणी आ.देवेंद्र कोठे यांनी हिवाळी अधिवेशनात केली आहे. यासंदर्भात त्यांनी पाठपुरावा केल्यास निश्चित यश येईल, असा आशावाद शिक्षकवृंदांकडून व्यक्त होत आहे.



# १५४ कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांअंतर्गत सुमारे १५४ कोटी रुपयांच्या ५०० हून अधिक विकासकामांचे उद्घाटन व लोकार्पण आज पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, शशिकांत चव्हाण, रोहिणी तळवडकर,अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

हा सोहळा सोलापूर महानगरपालिका प्रांगणात पार पडला. यामध्ये राष्ट्रीय स्वच्छ वायु कार्यक्रम, जिल्हा नागरोत्थान योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना, दलित वस्ती सुधार योजना, चलित नागरी वस्ती सुधारणा योजना, माझी वसुंधरा अभियान ४.०, शाळांचे सुशोभीकरण तसेच स्वच्छ सोलापूर मिशन अंतर्गत विविध कामांचा समावेश होता. पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले, सोलापूर शहरास स्वच्छ, सुंदर आणि विकसित बनवण्यासाठी शासनाकडून पूर्ण सहकार्य मिळत असल्याचे स्पष्ट केले. महानगरपालिकेने नवीन अत्याधुनिक स्वीपर मशीन्स उपलब्ध केल्यामुळे, शहराच्या स्वच्छतेवरील अतिरिक्त ८ लाख रुपये मासिक खर्च वाचणार आहे. सांडपाणी पुनर्वापर: कचरा संकलन व सांडपाणी पुनर्वापरासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. यामुळे शहरातील ७० टक्के सांडपाणी पुनर्वापरासाठी उपलब्ध करण्याचे लक्ष्य आहे. उपायुक्त आशिष लोकरे यांनी प्रमुख विकास कामे आणि महापलिकाच्या वतीने ऑनलाईन स्वरुपात सुरु असलेल्या १४० सेवांविषयीची माहिती विशद केली.

एकूण उद्घाटन झालेली कामे याप्रमाणे : राष्ट्रीय स्वच्छ वायू उपक्रम (४२ रस्त्यांचे काम) कामे ४२ रक्कम ३९.९२ कोटी, दलितेतर नागरी वस्ती सुधारणा (कामे ४७)रक्कम ४०.६०, जिल्हा नगरोत्थान योजना (रस्ते, ड्रेनेज) ( कामे १४१,) रक्कम २५.९७ कोटी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ना.व.सु. योजना ( कामे १०४), रक्कम २१.३९ कोटी, महानगरपालिका नागरी सेवा व सुविधा पुरवणे योजना (३५ कामे) ६. ७२ कोटी, जिल्हास्तर दलितेतर योजना १३ घंटागाडीचे लोकार्पण, माझी वसुंधरा अभियांन ४. ० अंतर्गत हरीत पट्टा (काम ३) १ कोटी, मनपा स्वनिधीतून शौचालय नूतनिकरण (१४० काम) १०.५८ कोटी, मनपा स्वनिधीतून स्वीपर मशीन (१)७. ८० कोटी.

# एकास जातीवाचक शिवीगाळ

## चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

मंगळवेढा येथील एम.आय. डी.सी मधील सोनाई दूध संकलन केंद्रात प्रवेश करुन यश शेंबडे यास जातीवाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी समर्थ खानापूरे (रा.सोलापूर) व अन्य अज्ञात तिघे यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसा गुन्हा दाखल झाला.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी यश नंदू शेंबडे (रा.भीमनगर मंगळवेढा) हे दि.१० डिसेंबर रोजी रात्री ८.१५ वाजता एम.आय.डी.सी.मधील सोनाई दूध संकलन केंद्रात काम करत असताना ओळखीचे समर्थ खानापूरे व त्याच्या सोबत अन्य अज्ञात तिघे येवून बाहेर बोलवत जातीवाचक शिवीगाळ करीत फिर्यादीच्या अंगावर धावून आले. त्यावेळी फिर्यादीने माझे आत्ता काम चालू झाले आहे मी आता बाहेर येणार नाही असे म्हणाल्यावर दूध संकलन केंद्रात प्रवेश करुन तेथील पडलेल्या लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोकीत,पाठीत व पोटावर मारुन जखमी केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.त्याच बरोबर व्हिवो कंपनीचा मोबाईल व पँटच्या खिशातील ४ हजार ५०० रुपये जबरदस्तीने काढून घेतले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी करीत आहेत.

# राष्ट्रीय बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व वाढवा : आ. कल्याणशेट्टी

## ३२० पैकी २०० बाजार समिती ई नामशी जोडली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर**

नवीन राष्ट्रीय बाजाराच्या कायद्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी केवळ ४ असून त्यामध्ये वाढ करून आठ करावी. आरक्षणाची मर्यादेत वाढ करण्याची मागणी अक्कलकोटचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी विधानसभेत केली आहे. हिवाळी अधिवेशनात राष्ट्रीय कृषि बाजाराचे बिल पारित झाले आहे. त्यामध्ये ज्या राज्यातील ८० हजार मेट्रिक टनापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या बाजार समितीमध्ये आणि दोन पेक्षा जास्त राज्याचा जिथे समावेश होतो.



त्या ठिकाणी राष्ट्रीय बाजाराचे बिल आणले त्यांचे स्वागत आमदार कल्याणशेट्टी यांनी केले. सध्या राज्यातील ३२० पैकी २०० बाजार समिती या ई नामशी जोडली आहेत. परंतु या बिलामध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधी केवळ चार ठेवले आहेत. सध्या शेतकऱ्यांचे प्रतिनिधी १५ असताना ते थेट चार वर आले आहेत. बाजारामुळे शेतकऱ्यांमध्ये स्पर्धा वाढेले आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला दर मिळेल. सध्या या बिलामध्ये ओबीसी, व्हीजेएनटी, एससी, एसटीमध्ये एकच सदस्य आहे. आरक्षणाची तरतूद वाढवायला पाहिजे. चार ऐवजी आठ शेतकऱ्यांमधून करावी. जे इतर अधिकारी महसूल व पणन असा गोंधळ न घालता पणनचे अधिकारी द्यावा जेणेकरून त्यांचा फायदा होऊ शकतो. असे म्हणत आमदार कल्याणशेट्टी यांनी या बिलाचे स्वागत केले.






# खरगपूर 'आयआयटी'त सोलापूरच्या 'प्रज्वल'चा झेंडा

**स्मार्ट इंडिया हॅकॅथॉनमध्ये पटकावले दीड लाखाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

खरगपूर (प.बंगाल) येथील आयआयटीमध्ये भरवण्यात आलेल्या अखिल भारतीय पातळीवरील स्मार्ट इंडिया हॅकॅथॉन २०२५ या अंतिम फेरीतील स्पर्धेत मुंबईच्या वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इंस्टिट्यूट (व्हीजेटीआय) तर्फे सहभागी सोलापूरच्या प्रज्वल प्रमोद जोशी याच्या टीमने प्रथम क्रमांक पटकावत झेंडा रोवला.

देशभरातील विविध २५ इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या टीमद्वारे तयार करण्यात आलेले नाविन्यपूर्ण प्रकल्प या स्मार्ट इंडिया हॅकॅथॉनमध्ये सादर करण्यात आले. या अंतिम स्पर्धेत निवड होण्यासाठी शहर,जिल्हा व राज्य पातळीवर चाचणी घेतली गेली. शहर व जिल्हा पातळीवर सहभागींची संख्या मोठी होती. त्यातील ५०० प्रकल्पांची निवड राज्यपातळीसाठी झाली. या ५०० प्रकल्पांतून एका विषयावर आधारीत केवळ पाच प्रकल्प निवडले गेले. त्यामध्ये प्रज्वलच्या टीमने सादर केलेल्या प्रकल्पाचा समावेश होता. दि. ८ ते १२ डिसेंबर दरम्यान ही हॅकॅथॉन स्पर्धा खरगपूर (प.बंगला) येथे झाली. यामध्ये मुंबईच्या व्हीजेटीआय मधील बी.टेक व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी कांद्याच्या टिकाऊपणावर एक वेगळा उपाय शोधणारा प्रकल्प सादर केला. या प्रकल्प सादरीकरणास केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने पाठबळ दिले. या टीमचे नेतृत्व सोलापूरच्या प्रज्वल जोशी याने केले. तर त्याच्या टीममध्ये निलाक्षी लाभाडे, हेरंब ढवळे, तेजस पाटील, तन्मय शिंदे व मंजुषा गोरे यांचा सहभाग होता. त्यांच्या या 'ग्राऊंड झीरो' नावाच्या टीमने सादर केलेला प्रकल्प येथील सादरीकरणात अव्वल ठरला. त्यांच्या या प्रकल्पास दीड लाख रूपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तसेच विजयी चषक मिळाला.

या प्रकल्पाचे परिक्षण सुजीत नाईक व सचिन जयशेखर यांनी केले. हा प्रकल्प सादरीकरणासाठी प्रज्वलच्या टीमला व्हीजेटीआय डायरेक्टर डॉ.सचिन कोरे, विभागप्रमुख प्रा.डॉ.सुषमा वाघ, डॉ.सनिकुमार, अमेय चवेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रज्वल व टीमने मिळवलेल्या या उज्वल यशाबद्दल महाविद्यालायाचे प्राचार्य तसेच प्राध्यापकांनी तसेच सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन केले.

# आ. विजय देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून रस्ताविकास : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

आमदार विजय देशमुख यांच्या विशेष प्रयत्नातून सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातील मुळेगाव रोड येथील १५ कोटी रुपये खर्चाच्या मुळेगाव रोड घरकुल दर्गनहळ्ळी धोत्री या मार्गाच्या मजबुतीकरण व रस्ता विकास कामांचा शुभारंभ ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. जयकुमारजी गोरे आणि आमदार विजय देशमुख यांच्या शुभहस्ते करण्यात आला.



या कार्यक्रमावेळी माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण, भाजपा शहराध्यक्षा रोहिणीताई तडवळकर, भाजपा माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, मंडल अध्यक्ष सिद्धार्थ मंजेली, माजी नगरसेवक विनायक विटकर, राजकुमार भिंगारे यांच्यासह राजकुमार पाटील, शंकर शिंदे, बाबुराव जमादार, प्रसाद कुलकर्णी, बिपिन धूम्मा, जगदीश व्हंड्राव, सुभाष पवार, बाळासाहेब अळसंदे, विजय ईप्पाकायल, सतीश भरमशेट्टी, सतीश सिरसिल्ला, रुचिराताई मासम, रोहन सोमा, नरेश दासरी, प्रकाश म्हंता, राजू हिबारे, किसन गर्जे, विरेश उंबरजे, गौतम कसबे, राहुल शाबादे, चेतन पाटील, शिवराज पवार, प्रवीण वाले, जाकिर सगरी आदी पदाधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तरुणास खोट्या गुन्हात अडकविण्याची धमकी

**मंगळवेढा :** आमच्या विरोधात तक्रार देतो काय? असे म्हणत तुला आम्ही सोडणार नाही तसेच तुला अॅट्रासिटी व बलात्कार सारख्या गुन्ह्यात अडकावू अशी राजकुमार रामचंद्र मेतकुटे (वय ४०) यांना धमकी दिल्या प्रकरणी धनंजय पाटील,बाळासाहेब कोष्टी,जयश्री सुरवसे व अन्य एक या चौघाविरुध्द मंगळवेढा पोलीसात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी राजकुमार मेतकुटे (रा.लक्ष्मी दहिवडी) यांना दि.१० डिसेंबर रोजी लक्ष्मी दहिवडी येथे स्टँडवर उभे राहिले असता तु आमच्या विरोधात तक्रार करतो काय? असे म्हणून फिर्यादीच्या अंगावर धावून आले व तुला सोडणार नाही, अॅट्रासिटी व बलात्कारसारख्या गुन्हयात अडकावू अशी धमकी दिली.

# मोटर चालू केल्याच्या कारणावरुन मारहाण

**चौघा विरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १५ डिसेंबर-**

बोराळे येथे सामाईक विहिरीवरील मोटर चालू केल्याच्या कारणावरुन एकास शिवीगाळ करुत लोखंडी गजाने मारहाण करुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी शिवाजी धनवे,सचिन मुंगसे, सोजर धनवे,कमलेश जावळे यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी



वंदना धनवे (रा.बोराळे) त्यांचे पती दि.११ रोजी सकाळी ६.३० वाजता घराच्या समोर काम करत होते. फिर्यादीचे पती जनावरांचे शेणघाण काढत असताना वरील आरोपींनी येवून फिर्यादीच्या पतीस तुम्ही काल रोजी सामाईक विहिरीवरील मोटर का चालू केली होती? तुम्हाला लय मस्ती आली आहे असे म्हणून शिवीगाळ करीत आरोपींनी लोखंडी गजाने मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या तोंडावर बुक्की मारल्याने खालचा एक दात पाडून जखमी केल्याचे तक्रारीत म्हटले असून फिर्यादीच्या गळ्यातील भांडणात मंगळसुत्र तुटून पडून गहाळ झाले आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार नवले हे करीत आहेत.

# जिल्ह्यातील १० साखर कारखानदारांनी अजूनही दर केला नाही जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ डिसेंबर-**

यंदाचा साखर हंगाम सुरू होऊन दीड-दोन महिने होत आले तरी जिल्ह्यातील १० साखर कारखान्यांनी ऊसदर जाहीर केला नाही. विशेष म्हणजे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी घेतलेल्या एका बैठकीत ३० नोव्हेंबरला ऊस दर जाहीर करण्याचा शब्द कारखानदारांनी दिला होता.

दरम्यान, या कारखान्यांनी ऊस दर जाहीर न केल्याबाबत शेतकरी संघटना आक्रमक झाले आहेत.ऊस दरासंदर्भात



जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि. १४ नोव्हेंबर आणि दि.१७ नोव्हेंबर २०२५ रोजी साखर कारखानदारांची बैठक घेतली होती. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऊस दर जाहीर करण्यात येणार असल्याचे आश्वासन देत कारखान्यांनी गाळपास आरंभ केला. मात्र आणखी १० साखर कारखान्यांनी ऊसदर जाहीर केला नसल्याने जिल्हा प्रशासनाने याविषयाची गंभीर दखल घेत कडक कारवाईचा इशारा दिला आहे. सोलापूर जिल्ह्यातील ३४ साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरु झाला आहे. कोणी ऑक्टोबर अगोदर तर कोणी ऑक्टोबर महिन्यात ऊस गाळप सुरू केले आहे. तर काही जणांनी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात गाळप सुरू केले आहे. ऊस दर जाहीर केलेल्या सर्वच साखर कारखान्यांचा प्रति टन २,८०० ते ३,००० रुपयांपर्यंत दर आहे आणि गाळपही पूर्ण क्षमतेने चालू आहे. गाळप सुरू असले तरी काही साखर कारखानदार ऊस दर जाहीर करीत नाहीत व जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करीत नसल्याचे चित्र आहे. दरम्यान, ऊस दर जाहीर न केलेल्या १० साखर कारखान्यांशी आपला संपर्क सुरू आहे, असे उपजिल्हाधिकारी देशमुख यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## थंडीच्या लाटेमुळे तेरखेडा परिसरात शेकोट्यांचा आधार

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ डिसेंबर -**

राज्यात सध्या तीव्र थंडीची लाट पसरल्याने गारठा वाढला आहे. थंडीपासून बचावासाठी नागरिक उबदार कपड्यांचा वापर करू लागले आहेत.

वाशी तालुक्यातील तेरखेडा परिसरातही थंडीची तीव्रता वाढल्याने गल्लोगल्ली शेकोट्या पेटताना दिसत आहेत.



उकरंडे गल्ली परिसरात शेकोट्यांभोवती लहान-थोर एकत्र जमून थंडीपासून बचाव करताना दिसत असून, शेकोटीच्या उबेत सामाजिक एकोप्याचे आणि आपुलकीचे चित्र पाहायला मिळत आहे.

# जिल्ह्यात परराज्यांतील मुलींशी लग्न लावणाऱ्या एजंटांचा सुळसुळाट

**लाखोंची आर्थिक लूट... फसवणुकीचे प्रकार वाढले...**

**तभा वृत्तसेवा / विपीन वीर**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

जिल्ह्यात सध्या परराज्यांतील मुलींशी लग्न जमवून देतो, असा दावा करणाऱ्या एजंटांचा मोठ्या प्रमाणावर सुळसुळाट झाला असून यामधून अनेक कुटुंबांची आर्थिक व सामाजिक फसवणूक होत असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. मुलींची कमतरता, मुलांचे वाढलेले वय आणि सामाजिक दबाव या कारणांचा गैरफायदा घेत एजंटांकडून दोन ते अडीच लाख रुपयांपर्यंत दर आकारले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

हा गोरखधंदा धाराशिव तालुका, परंडा, भूम, वाशी, उमरगा या तालुक्यात सर्रासपणे सुरू आहे. ग्रामीण व निमशहरी भागात योग्य स्थळ मिळणे अवघड होत असल्याने अनेक कुटुंबे एजंटांच्या संपर्कात जात आहेत.

मात्र, या एजंटांकडून वर पक्षाच्या जखमेवर 'मीठ चोळण्याचे' व आर्थिक लूट करून पैसे उकळण्याचे काम करीत आहेत. तसेच भेटीगाठीचे वेगळे शुल्क अशा नावाखाली पैसे उकळले जात असून पैसे भरल्याशिवाय मुलगी दाखवण्यास थेट नकार दिला जातो. काही प्रकरणांमध्ये मुलीचे वय, कौटुंबिक पार्श्वभूमी, कागदपत्रे याबाबत चुकीची माहिती देण्यात येत असल्याचेही प्रकार उघडकीस येत आहेत.



लग्न ठरल्यानंतर काही दिवसांतच मुलगी परराज्यात निघून जाणे, अचानक संपर्क तुटणे किंवा नवरा-नवरीत वाद निर्माण होऊन संसार मोडीत निघणे, अशा फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मात्र, इज्जत, सामाजिक भीती आणि बदनामीच्या कारणास्तव बहुतांश वरपक्ष तक्रार करण्यास पुढे येत नसल्याने हे प्रकार दडपले जात आहेत.

या संपूर्ण प्रकारामुळे अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडत असून काही ठिकाणी मानसिक तणाव आणि सामाजिक संघर्षालाही तोंड द्यावे लागत आहे. जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांकडून या एजंटांवर कारवाईची मागणी होत आहे. विवाह लावून देण्याच्या नावाखाली सुरू असलेल्या या अनधिकृत व्यवसायावर प्रशासनाने कठोर नजर ठेवावी, एजंटांची नोंदणी, चौकशी व जनजागृती मोहीम राबवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

परराज्यांतील विवाह प्रकरणांमध्ये कायदेशीर मार्गदर्शन, पोलीस व समाजकल्याण विभागाचा समन्वय आणि तक्रारदारांचे संरक्षण या बाबींकडे जिल्हा प्रशासन काय उपाययोजना करते, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### विठ्ठल मंदिरात भगवंतांची मंगल आरती उत्साहात संपन्न

**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ म्हणजेच इस्कॉन व हरे कृष्ण भक्त तुळजापूर यांच्या वतीने श्री श्री विठ्ठल-रुक्मिणी भगवंतांची मंगल आरती उत्साहात संपन्न झाली. पहाटे ५ वा. जिजामाता नगरातील श्री विठ्ठल मंदिरात मंगल आरती, तुलसी आरती, श्री चैतन्य शिक्षा अष्टकम झाल्यानंतर सर्वांनी 'हरे कृष्ण' महामंत्राचा १६ माळा जप केला. एकादशी दिवशी सर्व पापे अन्नामधे असल्याने या दिवशी अन्न खाणे वर्ज्य करावे. एकादशी व्रताचे पालन करून जास्तीत जास्त नाम जप करावा. तसेच द्वादशीला ठराविक अशा पारण वेळेतच एकादशीचा उपवास सोडावा, असे प्रजापती विष्णुदास यांनी सांगितले.



### तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची इस्रो व औद्योगिक भेट

**परंडा, दि.१५ डिसेंबर -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकॉम विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच बंगळुरू येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) तसेच वायरलेस व व्हीएलएसआय क्षेत्रातील नामांकित कंपन्यांना औद्योगिक भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांना अंतराळ तंत्रज्ञान, उपग्रह, रॉकेट प्रक्षेपण, पृथ्वी निरीक्षण तसेच 'चंद्रयान-३' प्रकल्पाविषयी तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले. या भेटीसाठी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, विभागप्रमुख डॉ. प्रशांत कोल्हे व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला असून पालकांनीही महाविद्यालयाच्या या प्रयत्नांचे कौतुक केले आहे.



### होमगार्ड संघटनेचा ७९ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**परंडा, दि.१५ डिसेंबर -**

परंडा होमगार्ड पथक कार्यालयाच्या वतीने महाराष्ट्र राज्य होमगार्ड संघटनेचा ७९ वा वर्धापन दिन रविवारी (दि.१४) वृक्षारोपण व स्वच्छता अभियान राबवून साजरा करण्यात आला. होमगार्ड कार्यालय, पोलीस स्टेशन मैदान व मंदिर परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड व श्रमदान करण्यात आले. कार्यक्रमास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण शिरसाट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी होमगार्ड ही शिस्तप्रिय व सेवाभावी संघटना असून कायदा-सुव्यवस्था व नैसर्गिक आपत्तीमध्ये मोलाचे योगदान देते, असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले. कार्यक्रमास मान्यवर अधिकारी, होमगार्ड जवान व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.




### प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांना 'उच्च शिक्षण नेते-२०२५' पुरस्कार

**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट संचलित तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांना पुणे येथे झालेल्या सिम्पलीलर्न युनिव्हर्सिटी लीडर्स फोरममध्ये 'उच्च शिक्षण नेते-२०२५' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उद्योग व शिक्षण क्षेत्रातील दरी कमी करण्यासाठी कौशल्य विकास व पुनर्कौशल्य उपक्रमांतील त्यांच्या योगदानाची दखल या पुरस्कारातून घेण्यात आली. डॉ. माने यांनी विद्यार्थ्यांच्या कौशल्यवृद्धी, प्रशिक्षण, प्लेसमेंट, उद्योग-संस्था समन्वय, प्रमाणपत्र अभ्यासक्रम व तांत्रिक कार्यशाळांच्या माध्यमातून महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो विद्यार्थ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळाले आहे. या पुरस्काराबद्दल तुळजापूरचे आ. राणाजगजितसिंह पाटील, संस्थेचे अध्यक्ष पद्मसिंह पाटील तसेच प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी यांनी डॉ. माने यांचे अभिनंदन केले आहे.

### किसन हंगरगेकर यांचे निधन

**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**



तालुक्यातील काटी येथील किसन शंकरराव हंगरगेकर यांचे रविवारी सायंकाळी हृदय विकाराच्या तीव्र झटक्यान निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुजित हंगरगेकर यांचे ते वडील होते.

## उमरगा तालुक्यात थंडीचा कडाका वाढला



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ डिसेंबर -**

उमरगा तालुक्यात गेल्या आठवड्यापासून हिवाळ्याची तीव्रता वाढली असून वातावरणात कडाक्याचा गारठा जाणवत आहे. पहाटे व संध्याकाळच्या वेळेत थंडी अक्षरशः अंगात शिरत असल्याने नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम दिसून येत आहे. या वेळेत रस्ते, चौक व सार्वजनिक ठिकाणे तुलनेने शांत असून नागरिक शक्यतो घराबाहेर पडणे टाळत आहेत.

शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, पहाटे नोकरीसाठी निघणारे कर्मचारी तसेच दैनंदिन कामगारांना थंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दिवसा सौम्य ऊन पडत असले तरी सकाळ-संध्याकाळच्या थंडीसमोर ते अपुरे ठरत आहे. ग्रामीण भागात पहाटे दाट धुके पडत असून शेतकामावर त्याचा परिणाम होत आहे. धुक्यामुळे रस्त्यावरील दृष्यमानता कमी होत असल्याने वाहनधारकांना सावधगिरी बाळगावी लागत आहे. थंडीपासून बचावासाठी नागरिक स्वेटर, जॅकेट, मफलर, शाल, टोपी, हातमोजे यांचा मोठ्या प्रमाणात वापर करू लागले आहेत. बाजारात उबदार कपड्यांची मागणी वाढली असून घराघरात गरम पाणी व गरम अन्नपदार्थांचा आधार घेतला जात आहे.

कडाक्याच्या थंडीपासून वाचण्यासाठी शहर व ग्रामीण भागात ठिकठिकाणी शेकोट्या पेटवताना दिसत आहेत. संपूर्ण उमरगा तालुका सध्या थंडीच्या जोरदार लाटेत वेढला गेला असून पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## कर्तबगार मातांना 'राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार' देऊन गौरव

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ डिसेंबर -**

येथील कुलदैवत बहुउद्देशीय सामाजिक संस्था व ज्येष्ठ नागरिक महासंघ, तालुका वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी येथील कर्तबगार महिलांचा 'राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या मुला-मुलींना उच्च शिक्षण देत डॉक्टर, वकील तसेच विविध उच्च पदांपर्यंत पोहोचवणाऱ्या मातांना शाल, श्रीफळ, ट्रॉफी, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरवण्यात आले.



याच कार्यक्रमात संस्थेतर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या गौरी-गणपती आरास स्पर्धेतील विजेत्यांनाही बक्षीस व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अजिंक्य विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष एस. एल. पवार सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार (पुरवठा) विद्या राठोड, शिक्षण विस्तार अधिकारी विद्या टेकाळे, जिल्हाध्यक्ष ज्येष्ठ नागरिक महासंघ धाराशिव महादेव महाराज आडसूळ व ज्येष्ठ पत्रकार माधवसिंह राजपूत (कळंब) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुरस्कार व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी गीतिश रमेश गुंड (इंजिनिअर, जर्मनी) तसेच नाझिमा आझाद मुजावर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. मुजावर यांनी कॅन्सरविषयी माहिती देत वेळीच तपासणी व उपचार घेण्याचे आवाहन केले. विद्या राठोड, महादेव महाराज आडसूळ, ज्येष्ठ पत्रकार माधवसिंह राजपूत व एस. एल. पवार यांनी आपल्या भाषणात आई-वडिलांचे कष्ट, प्रेम व ममता अमूल्य असून कुलदैवत संस्था व ज्येष्ठ नागरिक महासंघाने मातांच्या कार्याची दखल घेऊन योग्य सन्मान केल्याचे गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमास भास्कर चेडे सर, लक्ष्मण शेरकर, नरसिंह अण्णा उंदरे, पांडुरंग नाना कवडे, लक्ष्मण घुले, एम.आय. मुजावर, दादासाहेब लगाडे, प्रा. विनोद पवार, तवले, प्रा. शहाजी चेडे, नगरपंचायत सदस्य विकास पवार, साळुंके, उंदरे आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

सूत्रसंचालन बजरंग शिक्षण प्रसारक मंडळ, झिन्नर यांच्या अध्यक्ष साधना विश्वेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तानाजी मोळवणे, बळीराम जगताप, बळीराम कवडे, सुधाकर देवडकर तसेच सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## दरोड्याच्या तयारीत असलेले नऊ जण अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

ढोकी पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याच्या तयारीत असलेले नऊ जण पोलिसांच्या ताब्यात आल्याची घटना दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे २.१५ वाजता घडली. ढोकी पेट्रोल पंप चौकात लातूर-बार्शी रोडवर बार्शीकडे दरोडा टाकण्याच्या उद्देशाने आरोपी एकत्र जमल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी कारवाई करत आरोपींकडून होंडा कार (क्र. एमएच १२ डीसी ९०००), लोखंडी कत्ती, सत्तूर, मार्तुळ, वायर कटर, हातोडे, रॉड, विळा, मिरची पावडर, वायर, टोपी आदी दरोड्याचे साहित्य असा एकूण ५,०५,७०४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी बापुजी गोपाळराव पुरके (सफौ, पो.ठा. ढोकी) यांच्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात आरोपींविरुद्ध भा.न्या. सं. कलम ३१०(४), ३१०(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## भाजपाच्या नवनियुक्त तालुकाध्यक्षांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

भाजपा नेते आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी भाजपा संपर्क कार्यालय, परंडा येथे भारतीय जनता पार्टी परंडा तालुक्यातील विविध मोर्चा व आघाडीच्या नवनियुक्त तालुकाध्यक्षांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. या निवडी तालुकाध्यक्ष अरविंदबप्पा रगडे यांनी जाहीर केल्या होत्या.

यावेळी युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अजित धन्यकुमार काकडे, महिला मोर्चा तालुकाध्यक्षा प्रियंका निशीकांत क्षिरसागर, किसान मोर्चा अध्यक्ष अर्जुन दत्तात्रय कोलते, ओबीसी मोर्चा अध्यक्ष तुकाराम बिरमल हजारे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष संतोष मधुकर शिंदे, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष फारूख बाशामिया मुलाणी, विधी आघाडी अध्यक्ष ॲड. लक्ष्मण सदाशिव कोकाटे, भटके-विमुक्त आघाडी अध्यक्ष राहुल आप्पासाहेब खोत, उद्योग आघाडी अध्यक्ष नागेश सुनील गर्जे, दिव्यांग आघाडी अध्यक्ष तानाजी दत्तात्रय घोडके तसेच सोशल मीडिया अध्यक्ष तुषार सिद्धेश्वर नेटके यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा सरचिटणीस ॲड. गणेश खरसडे, माजी सरचिटणीस विकास कुलकर्णी, युवा नेते समरजीतसिंह ठाकूर, तालुका पदाधिकारी, महिला मोर्चा पदाधिकारी तसेच नवनियुक्त पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

### धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

**- अनिल आगलावे**
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

## तुळजापूर विकास आराखडा, तारा व टेक्निकल टेक्सटाईल पार्कसाठी नागपूर आयआयएमचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

महायुती सरकारच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यातील अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांना गती मिळत असून जिल्ह्याचा चेहरा-मोहरा बदलणाऱ्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा, तारा प्रकल्प व टेक्निकल टेक्सटाईल पार्क या तीन परिवर्तनकारी उपक्रमांना नागपूर येथील आयआयएमचे मार्गदर्शन लाभणार आहे, अशी माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.




जिल्ह्याचे अर्थकारण सक्षम करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी, व्यावसायिक दृष्टिकोन, शाश्वत विकास व दीर्घकालीन आर्थिक परिणाम यांचा सखोल अभ्यास आयआयएम नागपूरच्या तज्ज्ञांमार्फत करण्यात येणार आहे. या अनुषंगाने आमदार पाटील यांनी आयआयएम नागपूरला भेट देऊन तज्ज्ञांशी सविस्तर चर्चा केली.

या चर्चेत तुळजापूर तीर्थक्षेत्राचा सर्वांगीण विकास, भाविकांसाठी सुविधा, पर्यटन पायाभूत सुविधा, स्थानिक व्यवसायांना संधी, टेक्निकल टेक्सटाईल पार्कमुळे होणारी औद्योगिक वाढ, रोजगारनिर्मिती तसेच तारा प्रकल्पाच्या माध्यमातून स्थानिक उद्योजकता व कौशल्यविकास यावर भर देण्यात आला.

आयआयएम नागपूरची तज्ज्ञ टीम जानेवारी महिन्यात धाराशिव जिल्ह्याचा दौरा करणार असून जिल्हा प्रशासन, शासकीय यंत्रणा व लोकप्रतिनिधींशी संयुक्त बैठक घेण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन पर्यटन, उद्योग व सेवा क्षेत्राला चालना मिळेल आणि धाराशिव जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

CMYK

धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्वेलर्स दुकान फोडून चांदीचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**



उमरगा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, गणपती मंदिराजवळ असलेल्या 'श्रीलिला ज्वेलर्स' दुकानात अज्ञात चोरट्यांनी शटर उचकटून चोरी केल्याची घटना दि. १४ डिसेंबर २०२५ रोजी पहाटे २.५२ वाजता घडली.

या प्रकरणी फिर्यादी दत्ता विलास पोतदार (वय ३५, रा. माशाळकर गल्ली, भीमनगर, उमरगा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चोरट्यांनी दुकानात प्रवेश करून ४०८३ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, अंदाजे ५,३१,०१४ रुपये किमतीचा माल चोरून नेला.

या घटनेची नोंद उमरगा पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३३१(४), ३०५(अ) अन्वये करण्यात आली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



# जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांवर कडक कारवाई होणार

### जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांचे आदेश...


**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

जिल्ह्यात वाढत्या रुग्णसंख्येचा गैरफायदा घेऊन अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टरांचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचे सक्त आदेश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले. भविष्यात कोणीही असा व्यवसाय करण्याचे धाडस करणार नाही, असा कायमस्वरूपी धडा मिळेल अशी ठोस कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित अनधिकृत वैद्यकीय व्यवसायिक (बोगस डॉक्टर) शोधन जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास, उपजिल्हा पोलीस अधीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक व गट विकास अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हरिदास यांनी माहिती देताना सांगितले की, आतापर्यंत जिल्ह्यात ६९ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली असून १७ प्रकरणांची पोलीस तपास सुरू आहे, तर ३६ प्रकरणे न्यायप्रलंबित आहेत.



यापुढे ग्रामीण व शहरी भागात विशेष मोहिमेद्वारे तपासणी करून बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. कारवाई करताना पंचनामा, व्हिडिओ शूटिंग, छायाचित्रण, मुद्देमाल जप्ती व सीलबंद प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी तसेच संबंधित पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

सध्या जिल्ह्यातील ग्रामीण भागात ८ तालुक्यांमध्ये एकूण ४७६ डॉक्टर कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली.

बोगस डॉक्टरांवर महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ व भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हे नोंदविण्याचे आदेश देण्यात आले असून फसवणूक, तोतयागिरी, बनावट कागदपत्रे व आक्षेपार्ह जाहिरातींसह संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाणार आहे.

## युवक-महिलांच्या सहभागातूनच गावाचा सर्वांगीण विकास शक्य : सुरेश बिराजदार

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ डिसेंबर -**

गावाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी युवकांसह महिलांचे सक्रिय योगदान अत्यावश्यक असून, विकासाभिमुख, विवेकी व सकारात्मक दृष्टिकोन असलेले नेतृत्व लाभल्यास निश्चितच गावात चांगला बदल घडून येतो. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा विचार हाच प्रगतीचा मूलमंत्र असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार यांनी केले.

ते मुरळी येथे ग्रामपंचायतीच्या वतीने दि.१२ रोजी आयोजित महिला आरोग्य शिबिर व शिलाई मशीन प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक पाहुणे म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच नयनाबाई कांबळे होत्या.

तर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संजय राऊत, स्पर्श रुग्णालयाच्या डॉ. सुनिता चक्रवार, भीमाशंकर पाटील, उपसरपंच शमशोद्दीन जमादार यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुरळी ग्रामपंचायतीच्या वतीने १५ व्या वित्त आयोगातून प्राप्त निधीतून शिलाई मशीन प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र वितरण तसेच महिलांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला देशाचे स्व. शिवराज पाटील (चाकूरकर) यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## उमरगा तालुक्यातील सेवानगरला स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा प्राप्त



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.१५ डिसेंबर -**

उमरगा तालुक्यातील कदेर ग्राम पंचायतीच्या महसुली दर्जेत असलेल्या सेवानगर, सरदार नगर आणि व्यंकटेश नगर या तीन बंजारा तांड्यांना 'सेवानगर' या नावाने स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा राज्य शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयाने राजपत्राद्वारे जाहीर केला आहे.

हे तीन तांडे कदेर ग्रामपंचायतीपासून लांब अंतरावर असल्यामुळे दिवंगत भगवान जाधव यांनी स्वतंत्र ग्रामपंचायतसाठी राज्य शासनाकडे सतत पाठपुरावा केला. त्याचा निकाल म्हणून २०१९ मध्ये सेवानगरला महसुली दर्जा मिळाला. त्यानंतर विकास भगवान जाधव यांनी पाच वर्षे सतत प्रयत्न केले. राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार कदेर आणि सेवानगर ही दोन गावे २५ नोव्हेंबरपासून स्वतंत्र करण्यात आल्याची अधिसूचना शासनाचे उप सचिव क. पोतदार यांनी काढली आहे.

दरम्यान, १० फेब्रुवारी २०२६ रोजी कदेर ग्रामपंचायतीचा पंचवार्षिक कालावधी संपणार असल्याने कदेरसह सेवानगर ग्राम पंचायतीसाठी स्वतंत्र निवडणुकीचा कार्यक्रम आयोजित केला जाऊ शकतो.

स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाल्याचे आनंद साजरे करण्यासाठी सेवानगरसह सरदार नगर व व्यंकटेश नगर येथील ग्रामस्थांनी सोमवारी सायंकाळी जल्लोष केला. स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठी पाठपुरावा करणाऱ्या विकास जाधव यांचा ग पेढे भरून सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच सतीश जाधव, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष माधव साखरे, माजी अध्यक्ष विजय बिराजदार, पोलिस पाटील सुनील पाटील, मुकेश पवार, जयसिंग राठोड, अमोल गायकवाड, विशाल सोमवंशी, किशोर जाधव आणि विजय राठोड यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

### धारूर शिवारातील सामाईक विहिरीवरील मोटरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

धारुर तालुक्यातील शिवारातील सामाईक विहिरीवरील मोटर चोरीचा प्रकार उघडकीस आला आहे. फिर्यादी प्रकाश गोपिनाथ पवार (वय ३२, रा. धारूर) यांनी दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, अभय मनोहर गायकवाड (रा. खाम सवाडी, ता. धाराशिव) यांच्या शेत गट क्र. ४०९ मधील सामाईक विहिरीवरील के.एस.बी. सोलार कंपनीची ५ एच.पी. क्षमतेची मोटर अंदाजे १,२०,००० किमतीची अज्ञात व्यक्तीने दि.८ डिसेंबर रोजी सकाळी ४ वाजता ते १२ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता चोरी केली.बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

## तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेची ऑनलाईन नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवींच्या सिंहासन पूजेची नोंदणी जानेवारी २०२६ मध्ये ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. मंदिर संस्थानाने भाविकांना अधिकृत संकेतस्थळावरून नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि इतर राज्यांमधून भाविक कुलाचार आणि कुलधर्म पाळण्यासाठी तुळजापूर येथे येतात. सिंहासन पूजेची नोंदणी करण्यासाठी भाविकांनी अधिकृत संकेतस्थळ http://shrituljabhavani.org या पत्त्यावर जाऊन 'सिंहासन पूजा पास बुकिंग' मेन्यूवर क्लिक करावे किंवा https://shrituljabhavanimataseva.org या लिंकचा वापर करावा.



नोंदणी कालावधी: २० डिसेंबर २०२५ सकाळी १० वाजता ते २५ डिसेंबर सकाळी १० वाजेपर्यंत. प्रथम फेरी ऑनलाईन पेमेंट: २७ डिसेंबर सकाळी ११ वाजता एसएमएसद्वारे सूचित, पेमेंट २७ डिसेंबर सकाळी ११ ते २८ डिसेंबर सकाळी १० वाजेपर्यंत. द्वितीय फेरी ऑनलाईन पेमेंट: जर प्रथम फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास २८ डिसेंबर सकाळी ११ ते २९ डिसेंबर सकाळी १० वाजेपर्यंत. तृतीय फेरी ऑनलाईन पेमेंट: जर प्रथम व द्वितीय फेरीत सिंहासन संख्या पूर्ण न झाल्यास २९ डिसेंबर सकाळी ११ ते ३० डिसेंबर सकाळी १० वाजेपर्यंत. अंतिम बुकींग यादी: ३० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता जाहीर. १ जानेवारी ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत तिन्ही पुजारी मंडळांसाठी सिंहासन पूजा आरक्षित असल्याने या कालावधीत नव्याने पूजेची नोंदणी करता येणार नाही.

सर्व भाविक, महंत, पुजारी, सेवेकरी व नागरिकांनी वरील माहिती लक्षात घेऊन वेळेत नोंदणी करावी, असे मंदिर संस्थानच्या तहसीलदार व व्यवस्थापकांनी कळविले आहे.

## जळकोट परिसरातील महिलांसाठी मोफत देवदर्शन यात्रा; ३१५ महिला अयोध्याकडे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ डिसेंबर -**

माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश सोनटक्के यांच्या पुढाकाराने जळकोट व परिसरातील महिलांसाठी मोफत देवदर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेत अयोध्या व काशी विश्वनाथाचे दर्शन घडवून आणण्याचे पुण्यकार्य गणेश सोनटक्के मित्रपरिवाराच्या वतीने करण्यात येत आहे. यात्रेच्या पहिल्या टप्प्यातील ३१५ महिला अयोध्याकडे रवाना झाल्या आहेत.



गणेश सोनटक्के हे राजकारणासोबतच सामाजिक कार्यात सक्रिय असून दिवाळीच्या निमित्ताने हजारो महिलांना साडी-चोळी व फराळ वाटप करून त्यांचा सन्मान करतात. कोरोनापूर्वी त्यांनी सुमारे १५०० महिलांना मोफत काशी विश्वनाथ दर्शन घडवले होते. यावर्षी पुन्हा ही परंपरा सुरू करत वाराणसी येथे काशी विश्वनाथ दर्शन, गंगा आरती व स्नान, तसेच अयोध्येत प्रभू श्रीराम, हनुमान गढी दर्शन व शरयू नदी आरती व स्नानाचे नियोजन करण्यात आले आहे.

यावर्षी एकूण ६६५ महिलांना देवदर्शन यात्रेसाठी नेण्यात येणार असून दुसरा टप्पा दि. १६ डिसेंबर रोजी ३५० महिलांसह रवाना होणार आहे. संपूर्ण प्रवास व यात्रेचा खर्च गणेश सोनटक्के यांच्या वतीने करण्यात येत असून मित्रपरिवाराकडून महिलांची पूर्ण काळजी घेतली जात आहे. या उपक्रमाबद्दल लाभार्थी महिलांनी गणेश सोनटक्के व त्यांच्या मित्रपरिवाराचे कौतुक केले आहे.

## 'महाविस्तार' एआय-आधारित पवर कृषी महाविद्यालयात मार्गदर्शनपर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**

व्ही.पी. शैक्षणिक संकुलातील श्री साई जनविकास कृषी महाविद्यालय व जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाविस्तार' या नव्या एआय-आधारित प संदर्भात मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात तालुका कृषी अधिकारी महेश देवकते यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना व शेतकरी बांधवांना कृषी विभागाने विकसित केलेल्या महाविस्तार पची सविस्तर माहिती दिली. हवामान अंदाज, पिकांसाठी खतांचे प्रमाण, कीड व रोग व्यवस्थापन, बाजारभाव यासह विविध शेतीविषयक सुविधा या पमध्ये उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. हे प कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असून मराठी भाषेतील चॅटबोटच्या माध्यमातून शेतकरी थेट प्रश्न विचारू शकतात, त्यामुळे शेतीकाम अधिक सुलभ होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर एआय तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. तसेच गोदाम व्यवस्था, डीबीटी योजना व शासकीय सुविधांची माहितीही या पद्वारे मिळणार आहे.





कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी महाविस्तार पचे कौतुक करत या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, डॉ. अमित गांधले, व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, सहाय्यक कृषी अधिकारी सुषमा काळे, पीएम किसान ऑपरेटर अभिमन्यू हिप्परकर, सांख्यिकी ऑपरेटर सागर एडवे, तंटामुक्त अध्यक्ष श्यामसुंदर लावंड तसेच प्रगतशील शेतकरी बाळासाहेब वीर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस.व्ही. भालेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. मोहसीन शेख यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## कळंब : राष्ट्रीय लोकअदालतीतून कोट्यवधींची तडजोड व वसुली



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१५ डिसेंबर -**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धाराशिव यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१३ डिसेंबर रोजी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, कळंब येथे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले.

या लोकअदालतीसाठी एकूण पाच पॅनल गठीत करण्यात आले होते. पॅनल प्रमुख व पंच म्हणून जिल्हा व तालुका स्तरावरील न्यायाधीश व विधिज्ञांनी कामकाज पाहिले. या लोकअदालतीत ठेवण्यात आलेल्या १२६ दिवाणी प्रकरणांपैकी २१ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली. यामध्ये मोटार अपघात विमा दाव्यांतील २ प्रकरणांत १० लाख रुपये, रक्कम वसुलीच्या एका प्रकरणात २,०३,३५९ रुपये तसेच इतर १८ दिवाणी प्रकरणांचा समावेश होता.

तसेच ७५ फौजदारी प्रकरणांपैकी कौटुंबिक हिंसाचार प्रकरणातील एका अपिलामध्ये २,२०,००० रुपयांची तडजोड करण्यात आली, तर गुन्हा कबुलीच्या ७० प्रकरणांपैकी २२ प्रकरणांतून १२,२०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

याशिवाय विविध बँका, ग्रामपंचायती, नगर परिषद व पतसंस्थांकडून एकूण १७७७ दाखलपूर्व (प्री-लिटिगेशन) प्रकरणे सादर करण्यात आली. त्यापैकी बँकांच्या १२ प्रकरणांतून १३,७९,१०० रुपये, नगर परिषद कळंबच्या ३२ प्रकरणांतून ६,६१,००० रुपये, तर तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या ४३३ प्रकरणांतून ३,८२,६०३ रुपये वसूल करण्यात आले.

ही माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ कळंब आर.के. राजेभोसले यांनी दिली. लोकअदालत यशस्वी होण्यासाठी विधिज्ञ मंडळ, न्यायालयीन कर्मचारी तसेच पोलिस प्रशासनाने मोलाचे सहकार्य केल्याचेही त्यांनी नमूद केले.

### एमपीएससी यशाबद्दल ऋतुजा जगतापचा नवनिर्मिती प्रेरणा महिला मंडळातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**

तुळजापूर येथील नागनाथ जगताप व कविता जगताप यांची कन्या ऋतुजा जगताप हिने एमपीएससी परीक्षेत तांत्रिक सहाय्यक अधिकारी पदासाठी पात्रता संपादन करून उल्लेखनीय यश मिळवले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे यश मिळवून तिने तुळजापूरच्या नावलौकिकात भर घातली आहे.

या यशाबद्दल नवनिर्मिती प्रेरणा बहुउद्देशीय महिला मंडळ सामाजिक संस्थेच्या वतीने ऋतुजा जगतापचा सत्कार करण्यात आला.

आजच्या घडीला मुली कोणत्याही क्षेत्रात कमी नसून सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत, अशा कर्तृत्ववान लेकीचा सत्कार करताना अभिमान वाटतो, असे उद्गार संस्थेच्या अध्यक्षा मिनाताई सोमाजी यांनी काढले.

यावेळी ऋतुजाची आई कविता जगताप तसेच संस्थेच्या सचिव संध्या खुरूद, सुनिता काळे, रूपाली घाडगे, राधा घोगरे, लक्ष्मी राऊत आदी उपस्थित होत्या.

## शेतकरी शेतीशाळेत एकात्मिक किड व अन्नद्रव्य व्यवस्थापनावर मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ डिसेंबर -**

तालुक्यात नैसर्गिक संसाधनांच्या विकासाद्वारे ग्रामीण समुदाय सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत शेतकरी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले. या शेतीशाळेत परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (WOTR) चे सोशल फील्ड ऑफिसर खंडू पांढरे यांच्या प्रस्ताविक भाषणाने झाली. त्यानंतर कृषी क्षेत्र अधिकारी विठ्ठल ढवळे यांनी गहू व हरभरा पिकांतील एकात्मिक किड नियंत्रण, रोग व्यवस्थापन व अन्नद्रव्य व्यवस्थापन यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

मार्गदर्शनात जैविक व यांत्रिक किड नियंत्रण उपाय, दशपर्णी अर्क, अमृतपाणी, निमास्त्र, ट्रायकोडर्मा यांचा वापर, तसेच एढङ नुसार रासायनिक कीटकनाशकांचा योग्य वापर याची माहिती देण्यात आली.

हरभरा पिकावरील घाटे अळी, मररोग, मुळकुज तसेच गहू पिकातील तांबेरा व करपा रोग नियंत्रणाबाबत उपाय सांगण्यात आले.

तसेच कंपोस्ट, गांडूळखत व जीवामृत वापराचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले.

शेवटी पाणी व्यवस्थापन, तुषार सिंचनाचे फायदे व संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी व उपजीविका उपक्रमांची माहिती देण्यात आली. हा प्रकल्प WOTR संस्थेमार्फत टाटा कम्युनिकेशन्सच्या अर्थसहाय्याने यशस्वीपणे राबविला जात आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीच्या सचिवपदी सुधीर देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१५ डिसेंबर -**
महाराष्ट्रभर लौकिक असलेल्या धाराशिव येथील मध्यवर्ती शिवजन्मोत्सव समितीच्या सन २०२६ च्या शिवजन्मोत्सवासाठी सचिवपदी सुधीर मोहनराव देशमुख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड शहरातील हॉटेल रोमा पॅलेस हॉल येथे शनिवार, दि. १३ रोजी समितीचे अध्यक्ष आकाश कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत एकमताने करण्यात आली.



दरवर्षी धाराशिव शहरात भव्य स्वरूपात साजरा होणाऱ्या शिवजन्मोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी यावेळी नियोजनास सुरुवात करण्यात आली.

सचिवपदासाठी सुचविण्यात आलेल्या सुधीर देशमुख यांच्या नावाला उपस्थित मार्गदर्शक, पदाधिकारी व शिवप्रेमींनी एकमुखी पाठिंबा दिला. त्यानंतर अध्यक्ष आकाश कोकाटे यांनी त्यांच्या निवडीची औपचारिक घोषणा केली.

या बैठकीस अध्यक्ष आकाश कोकाटे यांच्यासह पदाधिकारी भालचंद्र कोकाटे, अनंत जगताप, बळवंत घोगरे आदी मान्यवर तसेच धाराशिव शहरातील शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### शोक संदेश...



## कात्राबाद येथे अखंड हरिनाम सप्ताह; ब्रह्मानंद महाराजांचे प्रवचन

**परंडा, दि.१५ डिसेंबर -**
परंडा तालुक्यातील कात्राबाद येथे दि.१० डिसेंबर २०२५ पासून अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. यानिमित्त शनिवारी (दि. १३) कन्नूर (ता. वाई, जि. सातारा) येथील मठाधिपती हभप. प.पू. ब्रह्मानंद (स्वामी) महाराज यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रवचनात त्यांनी भक्तिमार्गाचे महत्त्व विशद करत देवाला आपलेसे कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच तरुणांनी अध्यात्माच्या मार्गाने जीवनाचा विकास करावा, असा उपदेश केला. प्रवचनानंतर उद्योजक राजाभाऊ शेळके यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास मान्यवरांसह ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तावशीगड येथे शेतकरी शेतीशाळा; एकात्मिक किड नियंत्रणावर मार्गदर्शन

**उमरगा, दि.१५ डिसेंबर -**
तालुक्यातील तावशीगड येथे नैसर्गिक संसाधनांच्या विकासाद्वारे ग्रामीण समुदाय सक्षमीकरण प्रकल्पांतर्गत शेतकरी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले. या शेतीशाळेत परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमात कृषी क्षेत्र अधिकारी विठ्ठल ढवळे यांनी एकात्मिक किड नियंत्रण पद्धती, जैविक कीटकनाशकांचा वापर, हरभरा पिकावरील किड व रोग व्यवस्थापन तसेच पाणी व अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात दशपर्णी अर्काचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टतर्फे टाटा कम्युनिकेशन्सच्या अर्थसहाय्यात प्रकल्प राबविण्यात येत आहे.




## ४८ गावांत बीपी-शुगर तपासणी; ८८५ नव्या रुग्णांचे निदान

**लोहारा, दि.१५ डिसेंबर -**
बदलत्या जीवनशैलीमुळे वाढत चाललेल्या रक्तदाब व मधुमेहाच्या पार्श्वभूमीवर कॅप्री व प्राईड इंडिया संचलित मोबाईल मेडिकल युनिटच्या माध्यमातून कार्यक्षेत्रातील ४८ गावांत गृहभेटी देऊन तपासणी मोहीम राबविण्यात आली. गेल्या आठ महिन्यांत १८ वर्षांवरील ३९,२२२ नागरिकांची बीपी व शुगर तपासणी करण्यात आली असून त्यामधून ८८५ नवीन रुग्णांचे वेळेवर निदान झाले. निदान झालेल्या रुग्णांना डॉ. वैशाली कुलकर्णी व डॉ. युवराज हाके यांनी समुपदेशन करून उपचार व जीवनशैली बदलाबाबत मार्गदर्शन केले. या मोहिमेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना घरपोच आरोग्यसेवा मिळून वेळेत उपचार घेण्यास मदत झाली.

## द्रौपदी वाघमोडे यांचे निधन

**लोहारा, दि.१५ डिसेंबर -**



लोहारा तालुक्यातील मार्डी येथील द्रौपदी सूर्यभान वाघमोडे (वय ८५) यांचे रविवारी (दि.१४) दुपारी ४ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी (दि.१५) सकाळी १० वाजता मार्डी येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या लोहारा येथील डॉ. वाघमोडे हॉस्पिटलचे सर्वोसर्वा डॉ. गुणवंत वाघमोडे यांच्या आई होत.

# तुळजापूर बदनामी प्रकरण : सर्व संशयित पोलिसांच्या रडारवर

**▶▶ चौकशी अहवालानंतर कठोर कारवाई : गृहराज्यमंत्री पंकज भोयर...**

**▶▶ गृहराज्यमंत्र्याकडून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या लक्षवेधीला उत्तर...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**
तीर्थक्षेत्र तुळजापूरची जाणीवपूर्वक बदनामी करणारे सर्व घटक आता पोलिसांच्या रडारवर आले असून, या प्रकरणी पोलिस अधीक्षकांच्या निगराणीखाली विशेष चौकशी समिती नेमण्यात आली आहे. चौकशीचा अहवाल प्राप्त होताच संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट प्रतिपादन राज्याचे गृहराज्यमंत्री ना. पंकज भोयर यांनी केले.

कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी मातेच्या महंतांनी केलेल्या तक्रारीची मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी गांभीर्याने दखल घेतली असून, या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले असल्याची माहिती गृहराज्यमंत्री भोयर यांनी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी विधानसभेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना दिली.

ड्रग्ज प्रकरणाच्या नावाखाली काही घटकांनी जाणीवपूर्वक तुळजापूर तीर्थक्षेत्र तसेच समस्त पुजारी व सेवेकरी वर्गाची बदनामी करून समाजात तेढ निर्माण करण्याचे षडयंत्र रचल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर तुळजापूरच्या महंतांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे लेखी तक्रार सादर करून सखोल चौकशीची मागणी केली होती.

या तक्रारीवर अद्याप काय कारवाई झाली, तसेच तीर्थक्षेत्र व पूजारी वर्गाची बदनामी करणाऱ्यांवर शासन कोणती भूमिका घेणार, असा थेट सवाल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सभागृहात उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना गृहराज्यमंत्री भोयर यांनी चौकशी सुरू असून अहवालानंतर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट केले.



दरम्यान, महायुती सरकारच्या कार्यकाळात तुळजापूर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, तीर्थक्षेत्र विकास आराखडा, रेल्वे प्रकल्पांसह सुमारे २२०० कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. रेल्वेसाठी स्वतंत्रपणे सुमारे ३ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले जात आहेत. त्यामुळे येत्या काळात तुळजापूरचा संपूर्ण कायापालट होणार असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

याच पार्श्वभूमीवर काही विरोधक विकासाला विरोध करण्याच्या भूमिकेतून तुळजापूरची बदनामी करत असल्याचा आरोप करण्यात आला. ड्रग्ज प्रकरणी स्थानिक माता-भगिनींनी आमदार पाटील यांच्याकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी ती माहिती पोलिस अधीक्षकांकडे दिली आणि त्यानंतरच पोलिसांनी कारवाई केल्याचेही स्पष्ट करण्यात आले. मात्र या कारवाईचा गैरवापर करून पुजारी वर्ग व तीर्थक्षेत्राची बदनामी केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### अहवाल मिळताच कारवाई : गृहराज्यमंत्री...

श्री तुळजाभवानी मंदिर, तुळजापूर येथील महंत तुकोजी बुवा, महंत मावजीनाथ महाराज, महंत इच्छागिरी महाराज, महंत चलोजी बुवा, महंत व्यंकटारण्य महाराज, महंत हमरोजी बुवा व महंत वाकोजी बुवा यांनी तुळजापूर येथील समस्त पुजारी व सेवेकरी वर्गाची बदनामी करणाऱ्या घटकांवर कडक कारवाई करण्याची मागणी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनाच्या अनुषंगाने पोलिस अधीक्षक, धाराशिव यांच्या कार्यालयामार्फत चौकशी सुरू असून, चौकशीअंती योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी स्पष्ट केले.

## लोहारा : छत्रपती शिवाजी महाराज चौकात शुक्रवारी भीषण वाहतूक कोंडी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ डिसेंबर -**
छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात शुक्रवारी पुन्हा एकदा भीषण वाहतूक कोंडी निर्माण झाली. परिणामी चारचाकी वाहनधारकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत वाहने चालवावी लागली. दर शुक्रवारी उद्भवणाऱ्या या कोंडीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून वाहतूक विभाग व नगर पंचायत प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आठवड्यातील इतर दिवशी या चौकातील वाहतूक तुलनेने सुरळीत असते. मात्र शुक्रवार हा आठवडी बाजाराचा दिवस असल्याने सकाळपासूनच चौकात दुकाने थाटली जातात.



रस्त्याच्या कडेला किरकोळ विक्रेते जागा व्यापतात, त्यामुळे रस्ता अरुंद होऊन दोन्ही बाजूंनी वाहनांचा वेग मंदावतो. त्यातच अनधिकृत पार्किंग मोठ्या प्रमाणावर होत असल्याने चारचाकी वाहनांना मार्ग काढणे कठीण बनते. ही समस्या अनेक महिन्यांपासून कायम असतानाही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

दरम्यान, उस वाहतुकीचा हंगाम सुरू असल्यामुळे डबल ट्रॉली जोडलेल्या ट्रॅक्टरची वर्दळ वाढली आहे. अरुंद चौकातून वेगात जाणारी ही वाहने अचानक कोंडीत अडकतात; वेग कमी झाल्यावर मागील वाहनधारकांना अत्यंत सावधगिरीने गाडी चालवावी लागते. परिणामी शुक्रवारी दीर्घकाळ वाहतूक ठप्प राहते. चारचाकी वाहनधारक, रुग्णवाहिका तसेच विद्यार्थ्यांना वेळेवर गंतव्यस्थानी पोहोचणे अवघड होत आहे. वाहने अक्षरशः इंच-इंच पुढे सरकत असल्याचे दृश्य नेहमीचे झाले आहे.

वाहनधारकांचे म्हणणे आहे की, शुक्रवारी बाजार भरतो, हे प्रशासनाला माहीत असूनही अतिरिक्त पोलीस बंदोबस्त किंवा नियोजनबद्ध वाहतूक व्यवस्था लावली जात नाही. किमान शुक्रवारच्या दिवशी तरी नियोजन केल्यास कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. नागरिकांच्या प्रमुख मागण्यामध्ये शुक्रवारच्या दिवशी चौकात पोलीस बंदोबस्त वाढवावा, रस्त्याच्या कडेला होणारी अनधिकृत पार्किंग तातडीने हटवावी, आठवडी बाजारासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून द्यावी, उस वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग निश्चित करावा अश्या मागण्या करण्यात आल्या आहेत.

या गंभीर समस्येकडे वाहतूक विभाग व नगर पंचायत प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी सर्व स्तरांतून मागणी होत आहे. प्रशासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## लोहारा येथे राष्ट्रीय लोकअदालत यशस्वी; १६.७३ लाखांची वसुली

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ डिसेंबर -**
तालुका विधी सेवा समिती लोहारा व विधिज्ञ मंडळ लोहारा यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी न्यायालय (क. स्तर) लोहारा येथे शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी पी. एस. बनकर, दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), लोहारा यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.



या लोकअदालतीत एकूण दिवाणी प्रकरणे यात २९ व फौजदारी प्रकरणे २५ सामंजस्याने निकाली काढण्यात आली. तसेच वादपूर्व प्रकरणांत ग्रामपंचायत कर वसुलीची १६५ प्रकरणे निकाली निघून ६,५८,९७५ रुपये जमा झाले.

भारतीय स्टेट बँक, लोहारा येथील २ प्रकरणे निकाली निघून ५,६२,००० रुपये वसूल झाले. नगर पंचायत लोहारा यांच्या कर वसुलीची ५१ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात येऊन ४,५२,९०४ रुपये वसूल झाले. अशा प्रकारे एकूण १६,७३,८६९ रुपये रकमेची वसुली करण्यात आली. फौजदारी प्रकरणांत २५ प्रकरणे निकाली निघून २,५०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

## धाराशिव शहरात घरफोडी प्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ डिसेंबर -**
धाराशिव शहरातील महात्मा गांधी नगर, मातृछाया निवास येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना उघडकीस आली आहे.

फिर्यादी विरभद्र भुजंगय्या स्वामी (वय ६९, रा. महात्मा गांधी नगर, धाराशिव) यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरातील कपाटातून १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने व ६,००० रुपये रोख रक्कम असा एकूण सुमारे ५८,००० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

ही घटना दि.९ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते दि.११ डिसेंबर रोजी सकाळी ७ या कालावधीत घडली. याप्रकरणी फिर्यादीने दि.१३ डिसेंबर रोजी दिलेल्या तक्रारीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## मैलारपुर येथे चौथ्या खेट्याला खंडोबा देवाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ डिसेंबर -**
येळकोट, येळकोट जय मल्हारच्या जयघोषात रविवारी दि. १४ डिसेंबर रोजी नळदुर्ग (मैलारपुर) येथे चौथ्या खेट्याला श्री खंडोबा देवाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

पावणेदोन महिन्यांच्या वास्तव्यासाठी श्रीक्षेत्र मैलारपुर येथील खंडोबा मंदिरात विराजमान झाल्यानंतर दर रविवारी भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असतात. चौथ्या खेट्याच्या दिवशी भल्या पहाटेपासूनच भाविकांनी मंदिर परिसर गजबजून टाकला होता. देवाला दंडवत घालणे, बाशिंग चढविणे, नैवेद्य अर्पण करणे तसेच विविध नवस फेडताना भाविक दिसून येत होते. मोठ्या प्रमाणात खोबरे



फोडणे व भंडारा उधळण्यात आला.

यावर्षी श्रीक्षेत्र मैलारपुर येथे दि.२ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री खंडोबा देवाची वार्षिक यात्रा भरणार आहे.

यात्रेला अवघे वीस दिवस शिल्लक असल्याने सध्या दर रविवारी तसेच दररोजही दर्शनासाठी भाविकांची संख्या लक्षणीय वाढली आहे. श्रीक्षेत्र मैलारपुरजवळून राष्ट्रीय महामार्ग बायपास गेल्याने भाविकांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. या मार्गावरून उमरगा, हैद्राबादकडे जाणारे भाविक येथे थांबून श्री खंडोबा देवाचे दर्शन घेत असल्याने मंदिर परिसरात दररोज गर्दी दिसून येत आहे.

यात्रेच्या काळात महाराष्ट्रासह आंध्रप्रदेश, कर्नाटक व तेलंगणा राज्यांतून सुमारे ५ ते ६ लाख भाविक उपस्थित राहतात. यात्रेपूर्वी दर रविवारी येथे जणू मिनी यात्रेचे स्वरूप प्राप्त होत आहे. नळदुर्ग शहरासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत आहेत. श्री खंडोबा देवस्थान ट्रस्टच्या वतीने दर रविवारी भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. वाढती गर्दी लक्षात घेऊन ट्रस्टने दर्शनरांग व्यवस्था सुरू केली असून त्यामुळे गर्दीतही भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन होत आहे. भाविकांच्या सुरक्षेसाठी नळदुर्ग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन यादव यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

यात्रा काही दिवसांवर आल्याने मंदिर व परिसरात हॉटेल्स, प्रसादाची दुकाने, खेळणी, लहान मुलांसाठी करमणुकीची साधने तसेच विविध व्यावसायिकांनी दुकाने थाटल्याने संपूर्ण परिसर गजबजलेला दिसून येत आहे.


### वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा
**उमरगा येथील सहदिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचे न्यायालयात**

**सीएनआर क्र.** MHOS०६००२१०५२०२५ **निशाणी क्रमांक: ८**
**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८३२/२०२५** **गणपती / निरंक**

ज्यापेक्षा मयत **कै. विश्वंभर जयवंतराव मोहिते, रा. व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव** हे **दिनांक २०/१०/२०१०** रोजी किंवा त्यासुमारास मौजे व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव येथे मयत झाले असून अर्जदार क्र. १. वसंत विश्वंभर मोहिते (मुलगा), २. गणपती विश्वंभर मोहिते (मुलगा), रा. व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव ३. सुनिता धनराज पाटील (मुलगी), ४. महानंदा दत्तात्रय पाटील (मुलगी) यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत कै. विश्वंभर जयवंतराव मोहिते यांच्या नावचे वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा अर्जदारास सदरहू प्रमाणपत्र हे **कै. विश्वंभर जयवंतराव मोहिते** यांचे मृत्यू पश्चात शासकीय व निमशासकीय कामाकरीता अर्जदारांचे नावे वारसा हक्काने नावे लावणेकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सदरहू अर्जदार मयत कै. विश्वंभर जयवंतराव मोहिते यांचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचे हक्क शाबीत दिसल्यास त्याचा सदरहू मयत **कै. विश्वंभर जयवंतराव मोहिते** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.
**दिनांक १२/१२/२०२५ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**
**पुढील नेमलेली तारीख २१/०१/२०२६.**

**स्वाक्षरित/-** **(एस. एस. गाढवे)** **कनिष्ठ लिपिक**
**स्वाक्षरित/-** **(डी.व्ही. गायकवाड)** **सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, उमरगा**


## पुजारी नगर फाऊंडेशनतर्फे महिलांसाठी हुर्डा पार्टी सहल; सोलापूर येथे आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ डिसेंबर -**
शहरातील पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने रविवारी महिलांसाठी विशेष हुर्डा पार्टी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सहल सोलापूर येथील सिनाई कृषी पर्यटन केंद्रात उत्साहात पार पडली. या उपक्रमात सुमारे ४० महिला व मुलांनी सहभाग घेत निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्त आनंद अनुभवला.

सहलीदरम्यान पारंपरिक हुर्डा पार्टीसह संगीतमय कार्यक्रम, गाणी, नृत्य तसेच विविध मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी विविध स्पोर्ट्स क्टिव्हिटींमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत दैनंदिन कामकाजातून विरंगुळा मिळवला. मुलांसाठीही खास खेळांची व्यवस्था करण्यात आल्याने त्यांच्या आनंदात भर पडली.

सिनाई कृषी पर्यटन केंद्रातील हिरवळीने नटलेल्या परिसरात ग्रामीण संस्कृती, निसर्गसौंदर्य व मनोरंजन यांचा सुंदर संगम साधण्यात आला. या सहलीमुळे महिलांमध्ये आपुलकी, सामाजिक सलोखा व सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली.

दैनंदिन संसारिक जबाबदाऱ्या व कामाच्या तणावातून काही काळ दूर जाऊन महिलांनी स्वतःसाठी वेळ काढला. हसत-खेळत घालवलेले हे क्षण महिलांसाठी अविस्मरणीय ठरले.

पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी व शुभांगी पुजारी यांनी या सहलीचे आयोजन केले होते.



महिलांसाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थित महिलांनी मनापासून कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे महिलांचे मानसिक आरोग्य सुदृढ होण्यास मदत होऊन सामाजिक सहभाग वाढतो, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.


### जाहीर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापुर यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र. ८३९/२०२५**
**प्रकरण :- जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत...**

अर्जदार **इंदुमती भीमराव धनके विवाह नंतरचे नाव लक्ष्मी इंद्रसेन गायकवाड रा. सिंदफळ ता. तुळजापुर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांचा स्वःता चा जन्म दिनांक ०५.०६.१९५७ रोजी राहते घरी सिंदफळ येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.
**आज दिनांक २०२५ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.**

Signed by
Arvind Shankarrao Bolange
Date: 10-12-2025 17:08:27
**(अरविंद बोळंगे)**
तहसिलदार तुळजापुर

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रलंबित रेल्वे प्रश्न तात्काळ सोडवा : खा. डॉ. काळगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** गेल्या पाच दशकांपासून अधिक काळ प्रलंबित असलेला लातूर रोड ते बोधन रेल्वे मार्गासह रेल्वेशी संबंधित प्रश्नांची सोडवणूक लवकरात लवकर करण्यात यावी, अशी आग्रही मागणी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी लोकसभेत लावून धरली.

खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी आपल्या मतदार संघातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यात यावी या मागणीसाठी सातत्याने लोकसभेत आवाज उठविण्याचे काम केले आहे. मराठवाड्याचे मागास-लेपण पूर्णतः दूर करण्यासाठी मराठवाड्यात रेल्वेचे जाळे निर्माण होणे आवश्यक आहे. मराठवाड्याच्या रेल्वे प्रश्नांकडे आतापर्यंत फारसे गांभीर्याने पाहिले गेले नाही. परिणामतः मराठवाडा आजही विकासापासून दूरच राहिला आहे. लातूर रोड ते बोधन या जवळप-ास १३५ किमीच्या रेल्वेमार्गासाठी केंद्राने तात्काळ आवश्यक तो निधी मंजूर करून या कामाला सुरुवात करावी, अशी मागणी खा. डॉ. काळगे यांनी लोकसभेत केली. लातूर हे राज्यात शिक्षणाचे माहेरघर म्हणून परिचित आहे. लातूरला संपूर्ण राज्यातून विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. शिक्षण व दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी रेल्वेचे जाळे मोठ्या प्रमाणात निर्माण होणे अत्यावश्यक असल्याची बाब खा. डॉ. काळगे यांनी निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.



# सिनेस्टाईल खुनाचा पोलिसांकडून २४ तासात छडा!

## ५७ लाखांच्या कर्ज फेडीसाठी आरोपीने केला स्वतःच्याच मृत्यूचा बनाव; लातूर पोलीस दलाची धडाकेबाज कामगिरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** कुटुंबियांना एक कोटीच्या टर्म इन्शुरन्सच्या रकमेचा लाभ मिळावा या स्वार्थी विचाराने ५७ लाख रुपयांच्या कर्जफेडीसाठी आरोपीने स्वतःच्याच मृत्यूचा बनाव करून एका निरपराध व्यक्तीला यमसदनी पाठविल्याच्या घटनेचा उलगडा लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सोमवारी तातडीच्या पत्रकार परिषदेत बोल-ताना केला. सिनेस्टाईल घडलेल्या या घटनेचा लातूर पोलिसांनी अवघ्या २४ तासात छडा लावण्याचे काम केले आहे. पोलिसांच्या या धडाकेबाज कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

शनिवारी मध्यरात्री औसा - तुळजापूर महामार्गावरील वानवडा रस्त्यावर एका कारमध्ये (कार क्रं. एमएच ४३ - ए बी ४२००) एका तरुणाचा जाळून मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणी कारमधील गणेश गोपीनाथ चव्हाण, रा. विठ्ठलनगर, औसा वय ३५ वर्षे हाच मृत झाल्याचा प्रथमदर्शनी अंदाज वर्तवला गेला होता. कारण जळालेल्या वाहनानजीक पोलिसांना गणेश हातात वापरत असलेले कडे




आढळून आल्याने मृत व्यक्ती गणेशच अस-ावा, असा पोलिसांचा संशय होता. मात्र, या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला असता सदर प्रकार दर्शविण्याचा प्रयत्न केला गेला आहे, त्यापेक्षा निश्चितच वेगळा असल्याची खात्री पटली.

पोलिसांनी तपासाची सूत्रे गतिमान केली असता हा प्रकार कार जळून मृत झाल्याचा नसून खुनाचा असल्याचे निष्पन्न झाल्याचे पो-लीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

आपण कारमध्ये जळून मयत झालो आहे, याचा बनाव करणारा गणेश चव्हाण हा एका फायनान्स कंपनीत कामाला आहे. तसेच त्याने स्वतःचा एक कोटी रुपयांचा टर्म इन्शुरन्सही काढला होता. त्याच्यावर ५७ लाख रुपयांचे कर्ज झाले होते. हे कर्ज कसे फेडायचे यासाठी तो मागच्या एक महिन्यापासून आत्महत्या करायची की एखाद्या व्यक्तीचा खून दतो स्वतःच असल्याचा बनाव करायचा याचा विचार करत होता.

शनिवारी रात्रीच्या दहाच्या सुमारास तो आपली गाडी घेऊन याकतपूर रोडला आला असता, त्याला गोविंद किशन यादव (वय ५० वर्षे) रा. पाटील गल्ली, औसा याने हात दाखवून लिफ्ट मागितली. त्यावेळी गोविंद यादव पूर्णपणे दारूच्या नशेत होता. लिफ्ट मागून गोविंद यादव गाडीत बसल्यावर आर-ोपी गणेशच्या डोक्यात त्याचाच खून करुन स्वतः कारमध्ये जळून मयत झाल्याचा बनाव करण्याचे खूळ आले. त्याप्रमाणे त्याने गो-विंद यादवला चालकाच्या सीटवर बसवून हा सर्व बनाव केला, असे अमोल तांबे यांनी सांगितले.

पोलिसांना वानवडा रस्त्यावर एक कार जळत असल्याची माहिती मिळाल्यावरून तप-ासाची सूत्रे फिरली. या प्रकरणी संशय आल्याने वास्तव काय आहे, हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता आरोपी गणेश चव्हाण याने हा सगळा बनाव केल्याचे कबूल केले. गणेश-ला स्थानिक गुन्हे शाखा व औसा पोलिसांनी रविवारी रात्री उशिरा कोकणातील सिंधुदुर्गमधून ताब्यात घेतले असून त्याने या खुनाची कबुलीही दिल्याचे पोलीस अधीक्षक तांबे यांनी सांगितले.

एखाद्या हिंदी चित्रपटात शोभेल असा प्रकार आरोपीकडून घडला आहे. या प्रकरणी औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, सहा. पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, औसा पोलीस निरीक्षक रे-वणनाथ ढमाले, पोलीस उपनिरीक्षक अतुल डाके, भाऊसाहेब माळवदकर यासह अर्जुन राजपूत, महादेव बिलापट्टे, युवराज गिरी, तुराब पठाण, रामलिंग शिंदे, नवनाथ हासबे, सर्जे राव जगताप, राजेश कंचे, श्रीनिवास जोंधळे, मोतीराम घुले, रामकिशन गुट्टे, मुबाज सय्यद, हणमंत पडिले, दिनेश गवळी, अशोक राठोड, रतन शेख, येनकुरे, महेश मर्डे, बालाजी चव्हाण, भरत भुरे, महेश क्षीरसागर, सोमनाथ खडके, बालिका सरवदे, सदाशिव दंतुरे, सचिन मंदाडे, भागवत मोरे, सूर्यकांत मगर, गोविंद पाटील, सायबर पोलीस ठाण्याचे शैलेश सुडे, अंजली गायकवाड या पोलीस कर्मचाऱ्यांनी धाडसी कामगिरी केली.

या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांना रिवॉर्डने सन्मानित केले जाणार असल्याचे पो-लीस अधीक्षक तांबे यांनी सांगितले.

## मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कारासाठी ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** पुरोगामी व क्रांतीकारी समाजवादी नेते मनो-हरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्कार यंदा सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधीज्ञ प्रशांत भूषण यांना प्रदान केला जाणार आहे. माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने काल ही घोषणा केली. पुरस्कार वितरण समारंभ लातूर येथे रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. तसेच या समारंभात प्रशांत भूषण 'भारतीय लोकशाही समोरील आव्हाने' या विषयावर व्याख्यान देतील.



### लातुरात २१ डिसेंबर रोजी वितरण समारंभ

मनोहरराव गोमारे पुरोगामी विचारमंच, लातूर तर्फे हा पुरस्कार दिला जा-तो. यावर्षी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून गेल्या वर्षी स्वराज इंडियाचे संयोजक व भारत ओडो अभियानाचे राष्ट्रीय संयोजक योगेंद्र यादव यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पन्नास हजार, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप असून मनो-हरराव गोमारे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तो दिला जातो.

माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने काल एकमताने ॲड. प्रशांत भूषण यांची निवड केली. निवड समितीमध्ये सर्वश्री प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, माधव बावगे प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, शिवाजी शिंदे, उदय गवारे, सूर्यकांत वैद्य, डॉ. बी. आर. पाटील, दिलीप आरळीकर, श्याम जैन, डॉ. कोमल गोमारे, ॲड. विश्वास मोमले, डॉ. गणेश गोमारे यांचा समावेश आहे.

## एकाच दिवसात २ लाख १२ हजार ५०० रु.ची दंड आकारणी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** लातूर शहरातील वाहनांना शिस्त लावण्यासाठी शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून विशेष मोहिम राबविण्यात येत असून रविवारी एकाच दिवसात २ लाख १२ हजार ५०० रु.ची दंड आकारणी करण्यात आली आहे. दुचाकीवर ट्रिपल सीट जाणाऱ्या तसेच बुलेटला कर्णकर्कश हॉर्न लावून चालणाऱ्या वाहनांवरही कठोर कारवाई केली जात आहे. लातुरातील वाहनधारकांना शिस्त लावण्याच्या उद्देशाने सदर मोहिम राबविली जात आहे.

लातूर शहरातील वाहतूक व्यवस्था मागच्या काही दिवसात अत्यंत बेशिस्त झाल्याच्या तक्रारी वाढल्या होत्या. दुचाकीवरून ट्रिपल सीट प्रवास , तोही चक्क



वाहतूक पोलिसांच्या समोरून करणाऱ्यांचीही संख्या वाढली होती. याबाबत पोलीस प्रशासनाने आता कडक धोरण अवलंबले आहे. शहरात ऑटोचालक आपल्या पुढील सीटवर प्रवाशी बसवून घेणे, गणवेश परिधान न करणे, रस्त्यावर अचानक कोठेही ऑटो थांबवून प्रवाशी चढ - उतार करणे, चौका - चौकामध्ये वळणावर प्रवासी घेण्यासाठी घेण्यासाठी ऑटोची दुहेरी रांग करून थांबणे, या सारख्या कारणावरून सामान्य नागरिक त्रस्त झाले होते. त्यांनी याबाबत पोलीस प्रशासनाकडे तक्रारी केल्या जात होत्या.

### लातूर शहर वाहतूक पोलिसांची विशेष मोहिम; ऑटोचालकांविरुद्ध ई - चलान मशिनद्वारे दंडात्मक कारवाई

त्यामुळे शहर उपविभागीय पो-लीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनखाली व वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या नेतृत्वात ही विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

रविवारी, दि. १४ डिसेंबर रोजी बेशिस्त वाहने चालविणाऱ्या अनेक वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली. विविध कारणावरून एकाच दिवशी तब्बल १२४ऑटो चालकांवर केसेस करून त्यांच्याकडून १ लाख ६ हजार ५०० रुपयांची दंड आकारणी करण्यात आली. तर क्षमतेपेक्षा अधिक गतीने वाहने चालविणाऱ्या वाहनांवर एकूण ५३३ केसेस करण्यात आल्या असून त्या माध्यमातूनही लाख ६ हजार रुपयांची दंड आकारणी केली गेली आहे. ही मोहीम यापुढील काळातही चालूच ठेवली जाणार आहे. ज्या ऑटोचे अनपेड ई चलान भरणे थकीत आहे त्यांच्याविरुद्ध न्यायालयात खटले दाखल करण्यात येत आ-हेत. शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्याच्या उद्देशाने सदर मोहिम राबविली जात आहे.

## डॉ. यतिशकुमार जोशींच्या रिसर्च पोस्टरला प्रथम पुरस्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** इंडियन ऑर्थोडोंटिक सोसायटी यांच्या वतीने ५९ वी राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषद नुकतीच विशाखापट्टणम येथे घेण्यात आली. या परिषदेत लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उप प्रचार्य तथा ऑर्थोडोंटिक तज्ज्ञ प्रा. डॉ. यतिशकुमार जोशी यांनी सादर केलेल्या रिसर्च पोस्टरला प्रथम पुरस्कार मिळाला आहे.

विशाखापट्टणम येथे पार पडलेल्या तीन दिवशीय राष्ट्रीय ऑर्थोडोंटिक परिषदेत डॉ. यतिशकुमार जोशी यांनी परिषदेच्या तिसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात शिक्षक प्रवर्गात 'डीएमआयएमएस सुधारित एईटीकॉम मॉड्यूलद्वारे



दंत विद्यार्थ्यांच्या संज्ञानात्मक क्षेत्रात प्रशिक्षणाच्या परिणामाचे मूल्यांकन' या विषयावर रिसर्च पोस्टर सादर केले. या रिसर्च पोस्टर साठी डॉ. जोशी यांना प्रथम पुरस्कार मिळाला असून मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, डॉ. आनंद आंबेकर, डॉ. गणेश डांगे व एम.डी.एस. ऑर्थोडोंटिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ. दिशा खंदाडे, डॉ. रिया गाला, डॉ. सुमित होनराव, डॉ. गजानन वाघमोडे, डॉ. अनिरुद्र जगताप, डॉ. श्रीकांत श्रृंगारे, डॉ. ऋषभ बागडिया, डॉ. पृथ्वीराज करहाळे, डॉ. अजित सोमवंशी यांनी सहभाग नोंदवला.

या यशाबद्दल डॉ. यतिशकुमार जोशी यांचे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील डॉक्टर व विद्यार्थ्यांकडून अभिनंदन होत आहे.

## विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या वरवंटी शिवारात एका २५ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली आहे. या आत्महत्या प्रकरणी मृत्यूस कारणीभूत ठरल्याच्या कारणावरून पतीसह सासऱ्याविरुद्ध एमआयडीसी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, वरवंटी गावालगत असलेल्या गोकुळनगर, रायवाडी रोड ला-तूर या ठिकाणी राहणारी विवाहिता आरती रामेश्वर उरगुंडे ( २५ वर्षे ) हिच्या चारित्र्यावर संशय घेऊन पती रामेश्वर सिद्धेश्वर उरगुंडे हा तिचा शारीरिक व मानसिक छळ करत असे. तिने पतीकडे काहीही मागणी केली की तिला माहेरहून आणा असे सांगून देणे टाळत असे. तसेच चारित्र्याच्या संशयावरून आरतीला मारहाणही करत असे. आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेणाऱ्या नवऱ्याच्याच मोबाईलमध्ये आरतीला शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी तिचा नवरा दुसऱ्या महिलेशी बोलतानाचे चॅटिंग सापडले.

ही बाब लक्षात येताच आरतीने रामेश्वरला याचा जाब विचारण्याचा प्रयत्न केला. तेव्हा तुला काय करायचे ते कर असे सांगून रामेश्र्वरने आरतीला पुन्हा मारहाण केली. या नवरा बायकोचे भांडण सोडविण्यासाठी आर-तीचे वडील राजेंद्र दरेकरही आले व त्यांनी दोघांनाही समजावून सांगितले.

वडिलांनी समजावून सांगितल्यानंतरही आरतीचा त्यांना अजूनही पती मारहाण करत असल्याचा फोन आला. आरतीचा फोन आल्याबरोबर तिचे वडील लगेच तिच्या घरी गेले. पण त्यावेळी आरतीने स्वतःला एका खोलीत कोंडून घेतले होते. पती रामेश्वरनेही दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत आरतीने स्वतःला गळफास लावून आत्महत्या केली होती.

आपल्या मुलीने आत्महत्या केल्याचे पाहताच दरेकर यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून रामेश्वर सिद्धेश्वर उरगुंडे व सासरा सिद्धेश्वर रानबा उरगुंडे या दोघांविरुद्ध तक्रार दाखल केली. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक तपास करत आहेत.

## जि.प. शाळेत जनजागृती अभियानास प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** लातूर शहरापासून जवळच असलेल्या सोनवती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकताच बाळ सुर-क्षा, बालहक्क, कायदे, शारीरिक व मानसिक अत्याचाराविषयी जनजागृतीविषयक अभियान राबविण्यात आले. या अभियानास उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

याप्रसंगी एड. सुजाता माने, एड. सरोजा पवार, पोलीस कर्मचारी काळे, मुख्याध्यापक संजय वाडकर, डॉ. स्मिता मामिलवाड, कल्पना कोरे, छाया पवार यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना एड. सुजाता माने यांनी बाल सुरक्षितता, बाल संरक्षणात तरतुदींची माहिती दिली. ॲड. सरोजा पवार यांनी बाल अधिकार, अत्याचारांचे प्रकार आणि पोलिसांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. या उपक्रमास अत्यंत चांगला प्रतिसाद मिळाला.

## शहर जिल्हा भाजपाने घेतल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १५ डिसेंबर :** स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच महानगरपालिकेच्या निवडणूक लवकरच होऊ घातल्या आहेत. त्या अनुषंगाने लातूर शहर जिल्हा भाजपाने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांचे अर्ज मागितले होते. या प्रक्रियेला मोठा प्रतिसाद मिळाला असल्याने ९०० पेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शहर जिल्हा भाजपाच्यावतीने पार पडल्या आहेत.

महानगरपालिका निवडणूकीचे वेध सर्वांनाच लागले असून लातूर शहर जिल्हा भाजपाने या निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. निवडणूकीसाठी उमेदवारांची निवड सर्वात कठीण प्रक्रिया आहे. प्रदेश भाजपने दिलेल्या सूचनेनुस-ार शहर जिल्हा भाजपने मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांचे अर्ज शहर जिल्हा भाजपा कार्यालयात दाखल करण्यास सांगितले होते. याकरिता शहरा-तील इच्छुकांनी मोठा प्रतिसाद देत ७० जणांसाठी ९०० पेक्षा अधिक उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. ज्या इच्छुकांनी पक्षाकडे अर्ज दाखल केले आहेत त्यांच्या मुलाखती घेण्याच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर शहर भाजपाने त्या इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. या मुलाखतीसाठी प्रत्येकी दोघांचे असे चार पॅनल नियुक्त करण्यात आले होते. यामध्ये माजी खा. डॉ. सुनील गायकवाड, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, गुरुनाथ मगे, देविदास काळे, प्रेरणा होनराव, सुधीर धुत्तेकर शैलेश गोजमगुंडे, दिपक मठपती, आदींचा समावेश होता. या मुलाखती ईशान स्क्वेअर येथे घेण्यात आल्या आहेत.

या मुलाखतींमध्ये इच्छुकांना कोणते





प्रश्र्न विचारायचे आणि त्यांच्याकडून कोणती माहिती घ्यायची याबाबत प्रदेश भाजपने सूचना केल्या होत्या. त्या सूचनेन-ुसार मुलाखत घेणारी इच्छुक उमेदवारांकडून प्रश्नांची उत्तरे जाणून घेत त्यांच्याकडून आवश्यक असणारी माहिती संकलित केली.

मुलाखत देण्यासाठी आलेले इच्छुक मोठ्या उत्साहाने आणि आत्मविश्वासाने मुलाखतीस सामोरे जाताना दिसले. मुलाख-तीला येताना कोणतेही शक्तीप्रदर्शन करू नये अशा सूचना दिल्यामुळे हि प्रक्रिया अतिशय शांततेत पार पडली.

मुलाखती घेतल्यानंतर या सर्व उमेदवारांची माहिती प्रदेश भाजपकडे पाठवण्यात येणार असून या नंतर प्रदेशच्या वतीने उमेदवार निवडीसाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या अहवालानुसार निकषात बसणाऱ्या पात्र उमेदवारींची निश्र्चिती होईल आणि त्यानंतर प्रदेशकडूनच उमेदवारींची घोषणा होईल असे शहर जिल्हा भाजपाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे.